कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः
रामटेकम्

वार्षिक अहवाल २०१५-२०१६

His Excellency Hon'ble Shri C. Vidyasagar Rao
Governor of Maharashtra
and
Chancellor of Universities in Maharashtra

संदेश
चराति चरतो भगः।

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या सत्र २०१५-१६ च्या वार्षिक अहवालाद्वारे विश्वविद्यालयाच्या विविधांगी प्रगतीचा आलेख आपल्यासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. भारतातील सर्व संस्कृत विश्वविद्यालयांमध्ये सर्वांच्या परिश्रमाने उत्कर्षाप्रत जात असलेले हे विश्वविद्यालय निश्चितच अभिमानाचा विषय आहे. २०१५-१६ या वर्षात विश्वविद्यालयाने विविध क्षेत्रात केलेली प्रगती पुढीलप्रमाणे-

- विश्वविद्यालयाच्या भौतिक आणि शैक्षणिक प्रगतीकरिता महाराष्ट्र शासनाने नुकतीच वारंगा येथे ५० एकर जागा मंजूर केली आहे.
- महाराष्ट्र शासनाने विश्वविद्यालयाचे पारंपरिक शास्त्रसंवर्धन, संरक्षण आणि संक्रमण या संदर्भातील महत्त्व लक्षात घेऊन विश्वविद्यालयाला Knowledge Resource Centre म्हणून मान्यता दिली आहे. हा विद्यापीठाच्या कार्याचा गौरव आहे असे मी मानते.
- विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडून प्राप्त निधीद्वारे विश्वविद्यालयाच्या रामटेक येथील मुख्यालयात विविध पायाभूत सुविधांची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच शैक्षणिक इमारतीचे भूमिपूजन स्थानिक रामटेक मतदारसंघाचेआमदार मा. श्री. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.
- सेवार्थ प्रणाली राबविणारे क.का.संस्कृत विश्वविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे.
- नागपूरच्या स्थानिक जिल्हा प्रशासन कार्यालयाने कालिदास समारोहाच्या आयोजनात विश्वविद्यालयाला सन्मानपूर्वक सहभागी करून घेतले हे साभिमान नमूद करते. या समारोहामध्ये 'महाकवी कालिदास संस्कृतव्रती राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आले तसेच मेघदूतम् नृत्यनाटिका, एका गुराख्याचे महाकाव्य हे संस्कृत नाटक आणि ''अष्टपैलू कालिदास'' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन असा सांस्कृतिक आणि साहित्यिक नजराणा रसिकांसाठी सादर करण्यात आला.
- भारतीय शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या 'रिसर्च फॉर रिसर्जन्स' या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये विश्वविद्यालयाचा सक्रिय सहभाग होता.
- सदर सत्रापासून 'प्राचीन भारतीय पर्यावरण शिक्षा' या पदविका अभ्यासक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांचा लाभलेला उत्स्फूर्त सहभाग हे या अभ्यासक्रमाचे वैशिष्टय ठरले.
- षष्ठ दीक्षांत समारोहाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.
- संस्कृत दिनानिमित्त आयोजित संस्कृत नाटक स्पर्धेत तसेच इंद्रधनुष्य, तिरुपती प्रातिभ समारोहामध्ये विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.
- विश्वविद्यालयाला प्राप्त देणग्यांना ८० जी ही आयकर सवलत प्राप्त झाली आहे. ही सवलत प्राप्त करणारे क.का. संस्कृत विश्वविद्यालय महाराष्ट्रातील दुसरे आणि विदर्भातील पहिले विद्यापीठ ठरले आहे, हे विशेष!

एकूण शैक्षणिक, संशोधन, प्रशासन अशा तीनही आघाडयांवर विश्वविद्यालयाचा प्रगतीरथ अग्रेसर होत आहे. जो निरंतर मार्गक्रमणा करीत राहतो त्याच्या परिश्रमाचे चीज होतच असते. विश्वविद्यालयाची अशीच प्रगती होत राहो ही हार्दिक शुभकामना!

डॉ. उमा वैद्य

कुलगुरू

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक मराठी	इंग्रजी
❖ मा. कुलगुरूंचे मनोगत	03	03
❖ संस्कृतविषयी.....	04	04
❖ विश्वविद्यालयाविषयी.....	05	05
❖ व्यवस्थापन परिषद् सदस्य	06	06
❖ विद्वत्परिषद् सदस्य	07	07
❖ विद्यापीठ नियोजन विकास मंडळ सदस्य	08	08
❖ **प्रकरण पहिले - विभागनिहाय अहवाल**		
वेद तथा व्याकरण	10	85
संस्कृत भाषा तथा साहित्य	13	88
भारतीय दर्शनशास्त्र	18	95
वेदांग ज्योतिष	23	98
शिक्षणशास्त्र विभाग	25	101
क.का.सं.वि. चे अध्यापक महाविद्यालय	27	103
❖ **प्रकरण दुसरे - विस्तार सेवा अहवाल**		
राष्ट्रीय सेवा योजना	31	108
हस्तलिखित स्रोत केंद्र	41	112
छात्र कल्याण	42	114
क्रीडा विभाग	43	115
करिअर व कौन्सिलिंग कक्ष	43	115
प्राचीन भारतीय पर्यावरण विद्या अभ्यासक्रम	44	116
डिजिटल इंडिया कार्यक्रम	45	118
इंटर्नल क्वालिटी ॲश्युरन्स सेल (आयक्यूएसी कक्ष)	46	119
संक्रमणोत्सव	47	120
डॉ. आंबेडकर 125 वे जयंती वर्ष कार्यक्रम	48	121
❖ **प्रकरण तिसरे - प्रशासकीय अहवाल**		
आस्थापना विभाग	51	124
विद्या विभाग	58	127
विद्यापीठ नियोजन विकास मंडळ	64	133
वित्त विभाग	65	134
अभियांत्रिकी विभाग	66	135
परीक्षा विभाग	69	140
ग्रंथालय व प्रकाशन विभाग	71	142
❖ **विश्वविद्यालयातील विशेष उपक्रम आणि उपलब्धी**		155

कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः

रामटेकम्

वार्षिक अहवाल

(२०१५-२०१६)

Kavikulaguru Kalidas Sanskrit University

Ramtek Office : Administrative Building, Mauda Rd., Ramtek 441 106 Dist. - Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur - 440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph. No.: (0712) 2560992 Fax : (0712) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email : kksuregistrar1997@gmail.com

कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः, रामटेकम्

वार्षिक अहवाल

ANNUAL REPORT

(2015-2016)

Committee

Dr. Kavita Holey	-	Chairperson
Dr. Shivram Bhat	-	Member
Prof. Parag Joshi	-	Member
Dr. Renuka Bokare	-	Member
Prof. Anagha Ambekar	-	Secretary

Published by
Dr. Aravind Joshi
Registrar
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Coverpage - Paper 300 gsm.

Paper - Maplitho 80 gsm. / Art Paper 130 gsm.

Size - A4

Printed at :

Durga Printer
Netaji Market, Sitabuldi, Nagpur.

Kavikulaguru Kalidas Sanskrit University

Ramtek Office : Administrative Building, Mauda Rd., Ramtek 441 106 Dist. - Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur - 440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No. : (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph. No.: (0712) 2560992 Fax : (0712) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email : kksuregistrar1997@gmail.com

संस्कृतविषयी.....

संस्कृत ही भारताच्या अनमोल ठेवा असणा–या प्राचीन ज्ञानभांडाराच्या ज्ञानप्राप्तीची एकमेव व म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण भाषा आहे. संस्कृत म्हणजे ज्ञानवारसा संक्रमित, संरक्षित व संवर्धित करणारी भाषा! . प्राचीन काळीही नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशी नावाजलेली विद्यापीठे भारतात होती. या विद्यापीठांद्वारेच पाणिनी, पतंजली, कौटिल्य यांच्यासारखे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या, ग्रंथकर्तृत्वाच्या जोरावर चिरायु कीर्ती मिळवणारे विद्वान निर्माण झाले. हा अभिमानास्पद व तेजोमय ज्ञानवारसा जतन व वृद्धिंगत करण्यासाठी संस्कृत भाषेचे अध्ययन करणे अनिवार्य आहे. म्हणूनच संपूर्ण भारतात संस्कृतचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता एकूण 15 संस्कृत विश्वविद्यालये कार्यरत आहेत.

भारतातील संस्कृत विश्वविद्यालये

- संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तरप्रदेश)
- श्री जगन्नाथ संस्कृत विश्वविद्यालय, पुरी (ओरिसा)
- राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश)
- **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक(महाराष्ट्र)**
- श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालय, कालडी(केरळ)
- लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- कामेश्वर संस्कृत विश्वविद्यालय, दरभंगा(बिहार)
- राष्ट्रिय संस्कृत संस्थान विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- जगद्गुरू रामानंद आचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर (राजस्थान)
- सोमनाथ संस्कृत विश्वविद्यालय, गुजरात
- महर्षी पाणिनी संस्कृत विश्वविद्यालय, उज्जैन(मध्यप्रदेश)
- उत्तराखंड संस्कृत विश्वविद्यालय, हरिद्वार(उत्तराखंड)
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बंगलोर (कर्नाटक)
- कुमार भास्कर वर्मा संस्कृत व प्राचीन शिक्षा विद्यापीठ, नालबारी (आसाम)
- वेंकटश्वर वैदिक विद्यापीठ, तिरुपती (आंध्रप्रदेश)

✦✦✦✦✦

विश्वविद्यालयाविषयी.....
(कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक)

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी महाराष्ट्रात संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या सततच्या आग्रहाने व प्रेरणेने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय श्री. सुधाकरराव नाईक यांनी ज्ञानयोगी स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांची एक सदस्यीय समिती गठित करून संस्कृत विश्वविद्यालयाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. जिचकार यांनी भारतातील सर्व विश्वविद्यालयांचे अध्ययन करून शासनाला एक विस्तृत अहवाल सादर केला.

सदर अहवालाच्या अनुषंगाने व इतर शिक्षणशास्त्रतज्ज्ञांच्या अभ्यासाधारे महाराष्ट्र शासनाने दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी नागपूर जिल्हयातील रामटेक येथे महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना केली. महाकवी कालिदासाच्या अभिधानाने स्थापन झालेले हे महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत विश्वविद्यालय असून या विश्वविद्यालयाला संपूर्ण भारतात व भारताबाहेर शैक्षणिक संस्थांना संलग्निकरण देण्याचा अधिकार आहे.

The former Prime Minister of India, Hon'ble Shri P.V. Narasimha Rao is a great scholor of Sanskrit, always insisted that Maharashtra has a great tradition of Sanskrit learning hence it shouldhave an independent University. With his encouragement late Chief Minister of Maharashtra Hon'ble Shri Sudhakarraoji Naik took up the issue and appointed Dr. Shrikant Jichkar as one man committee to give a study report for establishing the Sanskrit University in Maharashtra. Dr. Jichkar prepared the study report and non-Formal University Act for the establishment of Sanskrit University in Maharashtra.

The Government of Maharashtra took up the issue and appointed a committee comprising of Sanskrit scholors and other educationists. On the basis of the report of the committee the State Government established the Sanskrit University at Ramtek and named it as Kavikulaguru Kalidas Sanskrit University. The University was established on 18th September 1997. The place Ramtek, which is a township in Nagpur district, was selected because it is connected to the name of great poet of the world Kavikulaguru Kalidas. This is the only Sanskrit University in Maharashtra. This university has right to give affiliation to other Educational Institutes within India & ouside the India.

संकाय
Sankayas (Faculties)

वेदविद्या	Faculty of Vedavidya
संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा	Faculty of Sanskrit & other languages
भारतीय दर्शन, तत्त्वज्ञान तथा संस्कृती	Faculty of Indian Religion, Philosophy & Culture
प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे	Faculty of Ancient Indian Science & Humanities
शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा	Faculty of Education & Miscellaneous Faculties

शैक्षणिक विभाग
Teaching Departments

वेद तथा व्याकरण	Dept. of Veda & Vyakarana
संस्कृत भाषा तथा साहित्य	Dept. of Sanskrit Language & Literature
दर्शनशास्त्र	Dept. of Darshanshastra
वेदांग ज्योतिष	Dept. of Vedanga Jyotisha
ललितकला	Dept. of Fine Arts
मानव्यशास्त्रे	Dept. of Humanities
शिक्षणशास्त्र	Dept. of Education
ग्रंथालय वार्ताशास्त्र	Dept. of Library & Information Science
संकीर्ण विद्या	Dept. of Miscellenous Subjects

List of Management Council

Sr. No.	Name	Position
1	**Dr. Uma Vaidya,** Hon'ble Vice-chancellor, KKSU, Ramtek	Chairperson
2	**Dr, Madhusudan Penna,** Dean, Indian Religion, Philosophy & Culture	Member
3	**Dr. Kamal Singh,** Ex Vice-chancellor, Sant Gadgebaba Amravati University, Amravati	Member
	Dr. Ashish Deshmukh Member, Maharashtra Legislative Council	Member
4	**Shri. Niranjan Davkhare,** Member, Maharashtra Legislative Assembly	Member
5	**Shri Sitaram Kunte,** Principal Secretary, Department of Higher & Technical Education, Mumbai,	Member
6	**Dr. Anajali Rahatgaokar,** Joint Director, Higher Education, Nagpur	Member
7	**Dr. Kavita Holey,** HoD, KKSU, Nagpur	Member
9	**Dr. Nanda Puri,** Dean, KKSU, Nagpur	Member
10	**Dr. Kala Acharya,** Director, K.J.Somaiya Sanskriti Peetham, Mumbai	Member
11	**Dr. Dilip Dabir,** 29, Devarshi, Gajanandham, Sahakar Nagar, Nagpur	Member
12	**Dr. Indumati Bharambe,** Professor & Head, KKSU, Nagpur	Member
13	**Dr. C.G.Vijaykumar,** Director, Board of University Planning & Development	Member
14	**Dr. Ramchandra Joshi,** Finance Officer (Off.), KKSU, Ramtek	Permanent Invitee
15	**Dr. Umesh Shivhare,** Controller of Examination, KKSU, Ramtek	Permanent Invitee
16	**Dr. Aravind Joshi,** Registrar, KKSU, Ramtek	Secretary

List of Members of Academic Council

N.	Name	Position	S.N.	Name	Position
1.	**Dr. Uma Vaidya,** Hon'ble Vice-Chancellor, KKSU, Ramtek	Chairperson	12	**Dr. Lalita Chandratre,** Dean, faculty of Education and Miscellaneous, KKSU, Nagpur	Member
2.	**Dr. Bhagylata Pataskar,** Dirctor, Vaidic Sanshodhan Mandal (Adarsh Sanskrt Shodha Sansatha) T.M.V. Cooney, Mukund Nagar, Pune – 411 006	Member	13	**Dr. Lalita Namajoshi,** K. J. Somaiya Bhartiya Sanskriti Peetham, Somaiya Vidyavihar, 1st Floor, Institute of Manegment of Studies Building, Vidyavihar, Mumbai.- 77	Member
3	**Dr. Kala Acharya,** K. J. Somaiya Bhartiya Sanskriti Peetham, Somaiya Vidyavihar, 1st Floor, Institute of Manegment of Studies Building, Vidyavihar, Mumbai.- 77	Member	14	**Dr. Dilip Dabir,** Vaidadarbhiya Harikirtan Sanstheche Kirtan Mahavidyalaya, Rajat Mahostsav, Dharmpeth Mulanchi Shala, Dharmpetha, Nagpur	Member
4	**Dr. Devendra Chaugule,** 202, Krushana Plaza, In front of R.C.F. colony, Vaishvi Nivas, Alibag, Dist Raigarh – 402 209	Member	15	**Shri Chandrakant Channe** 103,Nirman Enclave, 86 –A ,Gajanan Nagar, Wardha Road,Nagpur-15	Member
5	**Dr. Anjali Rahatgaonkar,** Joint Director, (Higher Education), Nagpur	Member	16	**Dr. Dipak Kapade,** Librarian (Acting), Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
6	**Dr. Kusum Patoria,** Azad Chowk, Sadar, Nagpur – 440001	Member	17	**Shri. Satish Naidu,** C/o – Dr. Mukund Shastri, Plot No. 115, Bajiprabhu Nagar, Nagpur.	Member
7	**Dr. Leena Rastogi,** 86 Madhav Nagar, Nagpur -10	Member	18	**Dr. B. R. Sharma,** G.S.College of Yoga and Cultural Synthesis, Kaivalyadham B. R. Sharma, G.S.College of Yoga and Cultural Synthesis, Kaivalyadham yoga institute, Swami Kuwalayanand marg] Lonavala, Distt. Pune	Member
8	**Dr. C.G.Vijaykumar,** Dean, Vedvidhya faculty, KKSU, Nagpur	Member	19	**Dr. Indumati Bharmbe,** Co-ordinator, Internal Quality Assurance Cell, KKSU, Nagpur	Member
9	**Dr. Nanda J. Puri,** Dean, faculty of Sanskrit and other Languages KKSU, Nagpur	Member	20	**Dr. Kavita Holey,** Director, Vistar Seva Mandal, KKSU, Ramtek	Member
10	**Dr. Madhusudan Penna,** Dean, faculty of Indian Religion, Philosophy and culture, KKSU, Nagpur	Member	21	**Dr. Aravind Joshi,** Registrar, KKSU, Ramtek	Secretary
11	**Dr. Krishnakumar Pandey,** Dean, faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Nagpur	Member			

Board of University Planning & Development (BUPD)

Sr.No.	Name	Position
1.	**Dr. Uma Vaidya,** Hon'ble Vice-Chancellor, Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Chairperson
2.	**Dr. Nanda Puri,** Associate Professor & Dean Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
3.	**Dr. Madhusudan Penna,** Associate Professor & Dean Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
4.	**Dr. Kalapani Agasti,** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
5.	**Prof. Anagha Ambekar,** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
6.	**Dr. Balchandra Khandekar,** 152, Metta Laghu Vetan colony, Kamptee road, Nagpur	Member
7.	**Dr. Sharada Gadge,** HoD Sanskrit Dept., LAD college Shankar nagar, Nagpur.	Member
8.	**Dr. Dnyaneshwar Kulkarni,** 215, Siddhi Vinayak, North Bazar road, Gokulpeth Nagpur.	Member
9.	**Dr. Merry Benni,** Chatraveer Raje Sambhaji college of civil Services, Morwa, Dist - Chandrapur.	Member
10.	**Dr. Vibha Kshirsagar,** Plot no. 12, Ganesh colony, Rana pratap nagar, Shriram Urban Bank, ring road, Nagpur.	Member
11.	**Dr.Vijaykumar C.G.** Director (I/c), Board of planning and Development Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Secretary

Board of Examination

Sr. No	Name	Position
1	**Dr. Uma Vaidya** , Hon'ble Vice-Chancellor Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek	Chairperson
2	**Hon'ble Joint Director** (Higher Education) Nagpur Division, Nagpur	Member
3	**Dr. Nanda Puri** Dean, Faculty of Sanskrit & other languages Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
4	**Dr. Madhusudan Penna** Dean, Faulty of Indian Religion, Philosophy & culture Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
5	**Dr. C.G Vijaykumar** Dean, Faculty of Ved Vidya Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
6	**Dr. Krishna Kumar Pandey** Dean, Faculty of Ancient Indian Science & Humanities Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
7	**Dr. Lalita Chandratre** Dean, Faculty of Education & Sankirna Vidya shakha Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
8	**Dr. Merry Benni** Principal, Chatraveer raje Sambhaji College of civil Services. Morwa, District Chandrpur	Member
9	**Dr. Prasad Gokhale** Assistant Proffessor Kavikulaguru Kalidas Sanskrit Unversity, Ramtek	Member
10	**Dr. Umesh Shivhare,** Controller of Examination, Kavikulaguru Kalidas Sanskrit Unversity, Ramtek	Secretary

वार्षिक अहवाल — मराठी

प्रकरण पहिले

विभागनिहाय अहवाल

वेद तथा व्याकरण विभाग

1. संस्कृत संभाषण वर्ग—दिनांक 26.06.2015 ते 05.07.2015 पर्यंत

मा. कुलगुरुंच्या प्रेरणेने व मा. अधिष्ठाता, वेदविद्या संकाय यांच्या मार्गदर्शनाखाली क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे दिनांक 26.06.2015 ते दिनांक 05.07.2015 या कालावधीत दहा दिवसांचा संस्कृत संभाषण वर्ग पदव्युत्तर वेद तथा व्याकरण विभाग , 5 वा माळा, ना.सु.प्र. संकुल, सीताबर्डी नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. या संस्कृत संभाषण वर्गाचे उद्घाटन डॉ. शारदा गाडगे, पूर्व विभाग प्रमुख, निवृत्त प्राध्यापिका संस्कृत विभाग, एल.ए.डी. महाविद्यालय, नागपूर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान डॉ. सी. जी.विजयकुमार यांनी भूषविले. संभाषण वर्गाचे प्रास्ताविक डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले. संस्कृत संभाषण वर्गाचे समन्वयक डॉ. शिवराम भट्ट यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. धन्यवाद समर्पण डॉ. जयवंत चौधरी, सहसमन्वयक यांनी केले. या दहा दिवसांच्या वर्गामध्ये संस्कृत संभाषण कौशल्य व भारतीय संस्कृतीचे सखोल ज्ञान वाढविण्यासाठी विभागातर्फे जिज्ञासू विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. हा वर्ग दररोज सकाळी 11.00 ते 01.00 या वेळेत घेण्यात आला. या वर्गामध्ये संस्कृत संभाषणासोबत इतर विषयांच्या जसे कथा श्रवण, संस्कृत क्रीडा, भगवद्गीता पठन, वर्णोच्चारण शिक्षा, संस्कृत व विज्ञान, संस्कृताद्वारे व्यक्तिमत्त्व विकास, संस्कृत वाङ्मयातील विविध विषयांबद्दल व्यक्तींद्वारे तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या दहा दिवसांच्या संस्कृत संभाषण वर्गामध्ये श्री. रूपेश रुद्रकार व श्रीवरदा माळगे यांनी विद्यार्थ्यांना संस्कृत संभाषण शिकविले. या वर्गामध्ये खालील मान्यवरांकडून मार्गदर्शन व शिक्षण देण्यात आले.

तसेच डॉ. शिवराम भट्ट, प्रा. पराग जोशी, डॉ. राजेंद्र जैन, डॉ. दिनकर मराठे, डॉ. जयवंत चौधरी, कु. यशःश्री कुळकर्णी , रूपेश रुद्रकार,श्रीवरदा माळगे यांनी कथाकथन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. शिवराम भट्ट यांनी P.P.T.च्या माध्यामातून संस्कृत सुभाषित, भगवद्गीता पठन, वर्णोच्चारण शिकविले.

दिनांक 06.07.2015 रोजी संभाषण वर्गाचा समारोप कार्यक्रम होता.

अ.क्र.	व्याख्यातृनाम	विषयः	दिनाङ्कः	समयः
01	डॉ. नंदा पुरी	संस्कृत नाट्याचा इतिहास	27.06.2015	12.30—01.0(
02	डॉ. कृष्णकुमार पाण्डेय	ज्योतिष एक जीवन शैली	28.06.2015	12.30—01.0(
03	डॉ. मधुसूदन पेन्ना	भारतीय दर्शन का परिचय	29.06.2015	12.30—01.0(
04	डॉ. हरेकृष्ण अगस्ती	संस्कृत व्याकरण का परिचय	30.06.2015	12.30—01.0(
05	डॉ. कलापिनी अगस्ती	योगशास्त्राचा परिचय	01.07.2015	12.30—01.0(
06	प्रा. पराग जोशी	संस्कृत साहित्याचा परिचय	02.07.2015	12.30—01.0(
07	डॉ. प्रसाद गोखले	ज्योतिष शास्त्र का परिचय	03.07.2015	12.30—01.0(
08	डॉ. विजयकुमार सी.जी	संस्कृतव्याकरणस्य महत्त्वम्	04.07.2015	12.30—01.0(

समारोप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व बी.पी.डी. प्रभारी संचालक डॉ. सी.जी. विजयकुमार यांनी भूषविले. मुख्यातिथी म्हणून संस्कृत भारती पत्राचार माध्यमाचे विभागप्रमुख, महाराष्ट्र विद्युत मंडळाचे निवृत्त अभियंता, संस्कृत उपासक, श्री. नरेश पाण्डे उपस्थित होते. वर्गाचे इतिवृत्त समन्वयक डॉ. शिवराम भट्ट यांनी केले. काही विद्यार्थ्यांनी अनुभव कथन केले. मान्यवरांच्या हस्ते संभाषण शिकविलेल्या प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. या वर्गात एकूण 90 सहभागी उपस्थित होते. सर्व प्रशिक्षण वर्गामध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या प्रमाणे दहा दिवसांचा संस्कृत संभाषण वर्ग यशस्वीपणे पार पडला.

2.संस्कृत सप्ताह –दिनांक 26.08.2015 ते 01.09.2015 पर्यंत

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली वेदविद्यासंकायाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांच्या सहकार्याने दिनांक 26.08.2015 ते दि.01.09.2015पर्यंत, 5 वा माळा , ना.सु.प्र, संकुल, सीताबर्डी , नागपूर येथे संस्कृत सप्ताहाचे आयोजन केले होते. संस्कृत सप्ताह – 2015–16 अन्तर्गत नागपुरस्थ विविध महाविद्यालय, क.का.सं. विश्वविद्यालयाशी संलग्नित महाविद्यालय व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, कथाकथन, संस्कृतनिबन्धलेखन, प्रश्नमंजूषा, संस्कृत श्लोक अन्त्याक्षरी, शुभेच्छा पत्र निर्माण, ललितगीत गायन स्पर्धा,एकपात्राभिनय स्पर्धांचे आयोजन केले होते. या विविध स्पर्धांमध्ये एकूण 140 विद्यार्थी सहभागी होते.

उद्घाटन : –दिनांक 26.08.2015 रोजी संस्कृतसप्ताहाचे उद्घाटन संस्कृत अध्यापन केंद्राच्या प्रमुख डॉ. हंसश्री मराठे यांच्या हस्ते झाले. संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी व्यासपीठावर उपस्थित होत्या. या औपचारिक उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजेंद्र जैन यांनी केले.

दिनांक 26.08.2015 रोजी विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे संस्कृत सप्ताहान्तर्गत सर्व विद्यार्थ्यांसाठी संस्कृत कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालय व विश्वविद्यालयांमधून एकूण 11 विद्यार्थी सहभागी होते परीक्षक म्हणून डॉ. हंसश्री मराठे व डॉ. नंदा पुरी उपस्थित होत्या. या स्पर्धेमध्ये तीन पुरस्कारांची उद्घोषणा केली. प्रथम पुरस्कार–श्री. वरदा माळगे (रु. 250/–), द्वितीय पुरस्कार – यशःश्री कुळकर्णी (रु. 150/–), तृतीय पुरस्कार – सत्यजीत खताळ (रु. 100/–) यांना प्रमाणपत्र, पुस्तक व धनराशी समारोप कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

दिनांक 28.08.2015 रोजी विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे संस्कृतश्लोक अन्त्याक्षरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालय व विश्वविद्यालयातून एकूण 12 विद्यार्थी सहभागी होते. परीक्षक म्हणून डॉ. हरेकृष्ण अगस्ती व डॉ. दिनकर मराठे उपस्थित होते. विजेत्या विद्यार्थ्यांना तीन पुरस्कार घोषित केले. प्रथम पुरस्कार – अनुज शर्मा (रु. 250/–), द्वितीय पुरस्कार – यशश्री कुळकर्णी (रु. 150/–), तृतीय पुरस्कार – विजया जोशी (रु. 100/–) यांना सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, पुस्तक व धनराशी देण्यात आली. या दोन स्पर्धांचे समन्वयक डॉ. शिवराम भट्ट व सहसमन्वयक डॉ. जयवंत चौधरी होते.

समारोप कार्यक्रम –क.का.सं.विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे सर्व शैक्षणिक विभागांच्या सहकार्याने दिनांक 26.08.2015 ते दिनांक 01.09.2015 पर्यंत आयोजित संस्कृत सप्ताहाच्या समारोप कार्यक्रम दिनांक 01.09.2015 रोजी सकाळी 10.00 वा. "अर्पण" सभागृह, विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलन, झांसी राणी चौक ,सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. समारोप कार्यक्रमाचे मुख्यातिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विश्वविद्यालयाचे पूर्व प्र–कुलगुरु डॉ. योगानंद काळे उपस्थित होते. मा. कुलगुरुंच्या निर्देशानुसार मराठी व हिंदी गाण्यांच्या संस्कृत रूपांतर प्रस्तुतीकरण करण्याकरीता व विशिष्टातिथि म्हणून मध्यप्रदेश राज्यातील भोपाळ मधून श्री.रत्नाकर दाबके उपस्थित होते. संस्कृत सप्ताहाचे इतिवृत्त वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व संचालक ,बी.पी.डी. डॉ. विजयकुमार सी.जी यांनी सादर केले. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्षपद क.का.सं.विश्वविद्यालयाच्या मा.कुलगुरु डॉ. उमा वैद्य यांनी भूषविले. समारोप कार्यक्रमात विश्वविद्यालयाच्या विविध विभागांच्या प्राध्यापकांनी स्वरचित कविता सादर केल्या. जसे डॉ. नंदा पुरी, डॉ. मधुसूदन पेन्ना, डॉ. हरेकृष्ण अगस्ती,

प्रा.पराग जोशी, डॉ.राजेंद्र जैन यांनी स्वरचितकविता वाचन केले. विविध स्पर्धांमध्ये विजेता विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र , पुस्तक व धनराशी देण्यात आली.

डॉ. मधुसूदन पेन्ना, डॉ. शिवराम भट्ट व प्रा. पराग जोशी यांनी विजेत्या विद्यार्थ्यांसाठी पुरस्कार म्हणून पुस्तके दान दिली. विश्वविद्यालयातर्फे प्रत्येक प्रथम पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्याला रु. 250/–, द्वितीय पुरस्काराला रु. 150/–, तृतीय पुरस्काराला रु. 100/– देण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे संचालन संस्कृत सप्ताहाचे समन्वयक डॉ. श्विराम भट्ट यांनी केले. अभारप्रदर्शन संस्कृत सप्ताहाचे सहसमन्वयक डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाचे समापन झाले. अशाप्रकारे संस्कृत सप्ताह – 2015 सुरळीतपणे पार पडला.

3.ग्रन्थप्रदर्शनी –दिनांक – 16.02.2016

दिनांक 16.02.2016 रोजी कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे ग्रंथालय विभागाच्या मदतीने ग्रंथप्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. वेद व व्याकरणसंबधी सर्व ग्रंथप्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आले होते. या ग्रन्थप्रदर्शनीचे उद्घाटन क.का. संस्कृत विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य यांच्या हस्ते झाले. वेदविद्या संकायाचे प्रमुख डॉ. सी.जी.विजयकुमार व सर्व प्राध्यापक व वेद तथा व्याकरण विभागाचे सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. मा. कुलगुरुंनी विविध ग्रंथाबद्दल व वेदार्थक आधुनिक ग्रंथकारांबद्दल सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, व त्यांनी संस्कृतविषयक शब्दकोशाच्या आधुनिकीकरणाबद्दल खंत व्यक्त केली. एम.ए. संस्कृत वेद व व्याकरण शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी याचा पूर्णपणे लाभ घेतला. एम. ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या प्रथम वर्षाच्या दोन दोन विद्यार्थ्याचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आलेल्या पुस्तकांच्या आधारे अ.क्र., पुस्तकाचे नाव, व्याख्याता, संपादक,टीका,प्रकाशक,विषयसूची, मूल्य अशा प्रकारचे एक प्रारूप तयार करण्यासाठी सूचना देण्यात आली होती. तसेच एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या द्वितीय वर्षाच्या दोन दोन विद्यार्थ्यांचा गट तयार केला होता. त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवलेल्या पुस्तकांच्या आधारे एका ग्रन्थाची किती टीका व टिकाकार आहेत. याबद्दल माहिती भरुन ठेवण्यासाठी सूचना दिली होती. सूचने प्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी हे काम पूर्ण केले. अशाप्रकारे ग्रन्थप्रदर्शीनी सुरळीतपणे पार पडली.

4. विद्यार्थी सहभाग :

वेद तथा व्याकरण विभागातील एम.ए. विद्यार्थ्यांनी इन्द्रधनुष्य, आविष्कार, तिरुपति छात्र प्रातिभ समारोह, नाटकस्पर्धा, संक्रमणोत्सव, संस्कृत सप्ताह इ. शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला व पुरस्कार आणले.

❖❖❖❖❖❖

वेदोऽखिलो धर्ममूलम्

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच विभागाद्वारे राबविलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल पुढील प्रमाणे –

1) कालिदास अभ्यास वर्ग :

दरवर्षी विश्वविद्यालयातील पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाच्यावतीने कालिदास दिवसाच्या निमित्ताने विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या शैक्षणिक वर्षी या निमित्ताने कालिदास अभ्यासवर्गाचे दिनांक 09 ते 17 जुलै 2015 पर्यंत यशस्वी आयोजन केले. कालिदास अभ्यासवर्गाचा विषय महाकवि कालिदास विरचित साहित्याचा अभ्यासष असा होता. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयाचे सल्लागार ग्रंथपाल श्री दिलीप म्हैसाळकर हे आमंत्रित होते. अभ्यासवर्गाचे उद्घाटन श्री दिलीप म्हैसाळकर यांनी तर, अध्यक्षीय पद माननीय अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना (भारतीय धर्म तत्वज्ञान व संस्कृती संकाय) यांनी भूषविले. प्रमुख अतिथींनी कार्यक्रमाचे महत्व सांगून अशा कार्यक्रमाच्या पुन्हा – पुन्हा आयोजनाची आवश्यकता वर्तविली. एवढेच नव्हे तर अभ्यास वर्गात स्वतः ची उपस्थिती देखील दर्शविली. माननीय अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी अभ्यासवर्गाच्या सफल संपन्नेतेकरिता प्रेरक भाषण दिले. कार्यक्रमात विश्वविद्यालयातील सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम सात सत्रांमध्ये आयोजित करण्यात आला.उद्घाटन सत्रानंतर पहिले सत्र म्हणजे प्रथम पुष्प मा. अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी यांनी गुंफले. त्यांनी अभिज्ञान– शाकुंतलम् या नाटकाविषयी सखोल व रोचक अशी माहिती दिली. याचप्रमाणे इतर सत्रांमध्ये डॉ. रेणुका बोकारे, डॉ. कविता होले, डॉ. विभा क्षीरसागर, डॉ. लीना रस्तोगी, प्रो. पराग जोशी व डॉ. राजेन्द्र जैन यांनी महाकवी कालिदासाच्या उर्वरित कृतींवर सविस्तर प्रकाश टाकला.

सर्व सत्र समाप्तीनंतर दि. 16 जुलै रोजी मा. कुलगुरु, डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत समापन समारोह पार पडला. सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांनी अभ्यास वर्गात शिकत असतांनाचे अनुभव कथन केले. मा. कुलगुरू यांनी आपल्या भाषणातून कार्यक्रमांची प्रशंसा केली व असे कार्यक्रम निरंतर राबवू अशी ग्वाही दिली. समारोहात सर्व माननीय अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. पराग जोशी यांनी कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार मानले.

2) कालिदास दिवस समारोह –

दि. 16 ते 18 जुलै 2015 दरम्यान कालिदास दिवसाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने वरिष्ठ संस्कृत तज्ज्ञ व समाजसेवक डॉ. मा.गो. वैद्य यांनी कालिदास ग्रंथ–प्रदर्शनीचे उद्घाटन केले. ही प्रदर्शनी विभागाच्या सहयोगाने विदर्भ साहित्य संघ, नागपूर येथे आयोजित करण्यात आली. या प्रसंगी श्री.मा.गो. वैद्य यांनी उपस्थितांकरिता कालिदास ग्रंथविषयक प्रेरक भाषण दिले. या निमित्ताने दुस–या दिवशी दि. 17 जुलै रोजी विश्वविद्यालयाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांच्या भाषणाचा लाभ श्रोत्यांना झाला.या प्रसंगी डॉ. स्मिता होटे व त्यांचे सहयोगी यांनी मेघदूत समश्लोकी गायनाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचा तिसरा दिवस मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या व्याख्यानाने संपन्न झाला तसेच समापनाने या समारोहाची सांगता झाली.

3) संस्कृत सप्ताह उत्सव –

संस्कृत वाङ्मयाच्या प्रचार व प्रसाराकरिता विश्वविद्यालयात संस्कृत सप्ताह उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. यावर्षी हा उत्सव सर्व विभागांच्या वतीने दि. 26 जुलै ते 01 ऑगस्ट पर्यंत साजरा करण्यात आला. संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाने संस्कृत उत्सवात प्रश्नमंजूषा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. दोन्ही स्पर्धेचे समन्वयक व सह–समन्वयक क्रमशः डॉ कविता होले व डॉ. राजेन्द्र जैन होते. स्पर्धांमध्ये विभागाचे सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे समापन मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत दि. 01 ऑगस्ट 2015 रोजी झाले. समापन समारोह प्रसंगी स्पर्धांमधील विजेत्यांना पुरस्कार व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

4) कालिदास समारोह व राष्ट्रीय संस्कृत परिषद् –

महाकवी कालिदास व त्याच्या साहित्याशी अपरिचित असा विरळाच कोणी असावा. कालिदासांनी अनुपम अशी सात काव्ये संस्कृतात लिहिली. मेघदूत हे याचे प्रेमकाव्य. हे काव्य त्याने रामटेक मधील रामगिरी पर्वतावर बसून लिहिले. याच निमित्ताने महाराष्ट्र राज्यशासनाने कालिदास व संस्कृत विषयक अभ्यासाकरिता रामटेकच्या भूमीवर स्वतंत्र कालिदास संस्कृत विश्वविद्यालय स्थापन केले. यावर्षी शासनाच्या व विश्वविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने रामटेक तसेच नागपूर येथे "कालिदास समारोहाचे" आयोजन दिनांक 20 ते 23 नोव्हेंबर 2015 या कालावधीत आयोजन करण्यात आले. या दरम्यान विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांच्या आयोजनाने रामटेक व नागपुरनगरी कालिदासमय झाली. संस्कृत, नाट्य, गीत, नृत्य इ. कार्यक्रमांनी समारोहाची शोभा वृद्धिगत झाली.

याप्रसंगी विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाने एकदिवसीय राष्ट्रीय संस्कृत परिषदेचे आयोजन केले. परिषदेचा विषय अष्टपैलू कालिदास असा होता. परिषदेत मा. कुलगुरू तसेच इतर सात संस्कृत विद्वान् 1) डॉ. लीना रस्तोगी, 2) डॉ. नन्दा पुरी, 3) डॉ. कविता होले, 4) डॉ. विभा क्षीरसागर, 5) प्रा. पराग जोशी, 6) प्रा. सुरज पण्डित यांनी शोधपत्रांचे वाचन केले. 7) डॉ. मिथिलाप्रसाद त्रिपाठी यांनी बीजभाषण दिले.

5) एम.ए. संस्कृत सप्ताहान्त (विकेन्ड) वर्ग –

विश्वविद्यालयाने संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाच्या वतीने सप्ताहाच्या शेवटी शनिवार व रविवार या रोजी एम.ए. संस्कृत सप्ताहाना विकेन्ड वर्ग चालविले. हे वर्ग गेल्या दोन वर्षांपासून विभागामार्फत सुरळीत चालविले जातात. नोकरी करीत असणा–यांकरिता संस्कृत शिकणे सुलभ होण्याच्या दृष्टीने सप्ताहाअंती हे वर्ग सुरु करण्यात आले. दरम्यान 40 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या कोर्समध्ये प्रवेश घेतला.

6) ग्रंथालय भेट –

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय व ग्रंथालयातील पुस्तकांविषयक अपेक्षित माहिती मिळण्याकरिता ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालय भेटीने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयातील पुस्तकांविषयक माहिती व जागृती निदर्शनास आली. पुस्तकांचे आदान – प्रदान करण्याबाबत ज्ञान मिळाले.

7) संक्रमण उत्सव –

विद्यार्थ्यांमधील सांस्कृतिक कलागुणांना वाव मिळावा याकरिता विश्वविद्यालयाद्वारे आयोजित संक्रमणोत्सवात विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विभागाच्या वतीने सर्व विभागीय विद्यार्थ्यांच्या हस्तलिखितांचे प्रकाशन 'धिषणा नावाने झाले. 'धिषणा प्रकाशनाकरिता मा. अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी यांचे मार्गदर्शन लाभले व डॉ. राजेन्द्र जैन यांनी सम्पादन केले. विभागप्रमुख डॉ. कविता होले यांनी अन्त्याक्षरी स्पर्धांचे तर प्रा. पराग जोशी यांनी सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांचे सफल आयोजन केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धामध्ये पारितोषिके मिळविली. तसेच विभागातील विद्यार्थ्यांनी संस्कृत नाटक, नृत्य, एकपात्राभिनय इत्यादींचे सादरीकरण करुन या उत्सवाची शोभा वाढविली.

8) तिरुपती छात्र प्रातिभ समारोह –

दि. 28 ते 31 जानेवारी 2016 रोजी तिरुपती येथील राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठामध्ये आयोजित अखिल भारतीय संस्कृत छात्र प्रातिभ समारोहात विभागातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शास्त्र–भाषण, नृत्य,संस्कृत गीत व नाटक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व विभागातील कु. शिवानी कामडी या विद्यार्थिनीला भाषणस्पर्धेमध्ये पारितोषिकही प्राप्त झाले.

9) डॉ. एस.ए.डांगे स्मृती व्याख्यानमाला–

महाराष्ट्रातील आधुनिक संस्कृतज्ज्ञ व त्यांच्या संशोधनाचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने विश्वविद्यालयाने साहित्य विभागाच्या वतीने डॉ. एस.ए. डांगे स्मृती व्याख्यानमालेचा प्रारंभ केला. डॉ. डांगे हे महाराष्ट्राचे प्रख्यात संस्कृतज्ज्ञ होते. नागपूर विद्यापीठातून त्यांनी डी. लिट्. पदवी प्राप्त केली. तसेच नागपूर मधील संशोधन कार्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागात प्राध्यापक व विभागप्रमुख

म्हणून कार्य केले. त्यांची 260 पेक्षा अधिक शोधपत्रे प्रकाशित झालेली आहे. त्यांनी केलेल्या प्राचीन संशोधनाची व वेदविद्येची नोंद पाश्चात्य विद्यापीठांनी देखील घेतली आहे. अशा संस्कृतज्ज्ञांच्या शोधकार्यांचा विद्यार्थ्यांकरिता लाभ होण्यासाठी या व्याख्यानमालेची सुरूवात करण्यात आली आहे.

उद्घाटन कार्यक्रमात मा. कुलगुरु यांनी अध्यक्षपद भूषविले. डॉ. गौरी माहुलीकर (संस्कृत विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ) यांनी पौराणिक साहित्यात वैदिक घटकांचे विवेचन या विषयावर व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प आणि 'यज्ञाचे बदलते स्वरूप' या विषयावर व्याख्यानमालेतील दुसरे व्याख्यान दिले. व्याख्यानमालेत सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, विभाग प्रमुख, अधिष्ठाता उपस्थित होते. सदर व्याख्यानमालेचे आयोजन विस्तारसेवा मंडळ क.का.सं.वि. च्यावतीने व संस्कृत भाषा व साहित्य विभागाच्या सहयोगाने करण्यात आले होते.

10) पत्रकारितेवर विशेष व्याख्यान–

विभागाने दि. 6.02.2016 रोजी संस्कृत पत्रकारिता या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन केले. आकाशवाणी व दूरदर्शनमधील वार्तांचे संपादक व संस्कृत प्राध्यापक डॉ.चन्द्रभूषण झा यांना व्याख्याता म्हणून आमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी विद्यापीठाच्या मा. कुलगुरु उपस्थित होत्या. डॉ. झा यांनी पत्रकारितेच्या सद्यःस्थितीचे वर्णन करत संस्कृतातील पत्रकारितेबद्दल मार्गदर्शन केले. सर्वांसोबत समूहचर्चा घडवून आणली. कार्यक्रमाला संस्कृत भाषा प्रचारिणी सभेचे सचिव डॉ. चन्द्रगुप्त वर्णेकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

11) विद्यार्थ्यांचे यश, पुरस्कार व बक्षीसे–

खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी पुरस्कार व बक्षीसे प्राप्त करून यश संपादित केले.

1.Yashasri Kulkarni, M.A.II nd year

1. Natyapravesh spardha	14.9.15	C.P. &Berar College,Skt Dept.	III prize
	26-1.8.15		
2.kathakathan spardha	26-1.8.15	Sanskrit Saptah,KKSU	II prize
3.Antyakshari	26-1.8.15	Sanskrit Saptah,KKSU	II prize
4.Quiz Completion	26-1.8.15	Sanskrit Saptah,KKSU	III prize
5. Ekapatrabhinay	26-1.8.15	Sanskrit Saptah,KKSU	II prize
6. Debate Competition	10.2.15	Education Dept, KKSU	Participation
7.The late, Dahake smriti	- 29.9.15	Dharampeth M.P.D.- Smriti vijnyan College,	Debate Competition Participation
8. Lit Masters Competition,	14.10.15	Hislop College,Nagpur	I prize
9. Natyapravesh spardha(Group)	14.9.15,	C.P. &Berar College,Skt Dept.,	II prize
10.Vivekanand smriti Debate	- 10.1.16	Lotus Cultural & sporting association,	Excellent- Speaker

2. Akanksha Suryavanshi, M.A.II nd year

1.Ellocution 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU II prize

2.Quiz 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU III prize

3.Dr.Ambedkar essay writing, 14/4/16, KKSU, Ramtek III Prize

3.Shrivarada Malge, Visharad Sanskrit III year

1.kathakathan spardha 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU I prize

2.Lit Masters competition 14.10.15 Hislop College,Nagpur II Prize

3. Natyapravesh spardha 14.9.15, C.P. &Berar College,Skt Dept., Participation

4.Vijaya Joshi, M.A.II nd year

1. Antyakshari 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU III prize

5.Suwarna Gaydhane, M.A.II nd year

1.Quiz 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU III prize

2. Dr.Ambedkar essay Writing, 14/4/16, KKSU, Ramtek II Prize

6.Prajakta Khedikar, M.A.II nd year

1.Quiz 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU II prize

2.Shubhecchapatranirman, 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU III prize

7.Rohini Deshmukh, M.A.I year

1.Quiz 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU I prize2.Lalitagitagayan,26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU I prize

8.Madhura Kayande, M.A.I year

1.Quiz 26-1.8.15 Sanskrit Saptah,KKSU II prize

2.Natyapravesh spardha 14.9.15, C.P. &Berar College,Skt Dept., Participation

9.Madhuri Vaidya, M.A. Ist

1.Natyapravesh spardha 14.9.15, C.P. &Berar College,Skt Dept., Participation

10.Shivani Kamdi,M.A. Ist

1.Natyapravesh spardha 14.9.15, C.P. &Berar College,Skt Dept., Participation

2. Ellocution 31.1.2016 Rashtriya Sanskrit Vidyapeeth,TPT, III Prize

11.Bhushan Muley,B.A.II

1.Lit Masters competition 13.10.15 Hislop College,Nagpur II Prize

12.Rupesh Rudrakar,B.A.II

1.Lit Masters competition 13.10.15 Hislop College,Nagpur Participation

13.Alka Lute, M.A.I Year

1.Bhartiya Sanskriti spardha, 12.9.15Vivekanand Kendra,Nagpur II Prize

14.Sau.Sarita Gillurkar, M.A.Ist Year

1.Dr.Ambedkar essay writing, 14/4/16, KKSU, Ramtek I Prize

2.Geeta Swadhyay Prakalp 10/2/2016Ramkrishna Math, Dhantaili Vishesh- Praviny-V

14.Mrunmai Kulsunge, M.Phil.

1.Geeta Swadhyay Prakalp,10/2/2016Ramkrishna Math, Dhantaili, Protsahan-

Dvitiya Puraskar

❖❖❖❖❖❖

सतां संगो हि भेषजम्

भारतीय दर्शनशास्त्र विभाग

विभागाद्वारे घेण्यात आलेले कार्यक्रम.:–

1. आंतरराष्ट्रीय योग दिवस
2. प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराज जन्मशताब्दी महोत्सव
3. निबन्धलेखन व शुभेच्छापत्र निर्माण स्पर्धा
4. आधुनिक काळात उपनिषदांची प्रासंगिकता – सप्तदिनात्मक व्याख्यानमाला
5. राष्ट्रीय योगासन स्पर्धा
6. विभागातील विद्यार्थ्यांचा सहभाग

1. आंतरराष्ट्रीय योग दिवस

दिनांक 21.06.2015

शासनाद्वारे दिनांक 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जाहीर करण्यात आला आहे. तदनुषंगाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन व योगशास्त्र विभागाद्वारे सामाजिक स्तरावर योगविषयक जनजागृती करण्यासाठी जुन 2015 या महिन्यात एकूण दहा विविध ठिकाणी समाजातील विविध घटकांसाठी 15 दिवसांचे योगशिबिर कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन तथा योगविभागाद्वारे आयोजित करण्यात आले होते. हे प्रशिक्षण शिबिर योगविभागातील खालील विद्यार्थ्यांद्वारे चालविण्यात आले.

शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 21 जून 2015 रोजी सकाळी 07.00 वा पदव्युत्तर शैक्षणिक विभागात क.का.संस्कृत विश्वविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरिता योगाभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना यांच्यासह प्राध्यापकवर्ग अधिकारीवर्ग, व शिक्षकेतर कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. योगशास्त्र विभागाची विद्यार्थिनी कु. सूजाता द्रव्यकार हिने विविध योगासनांची प्रात्याक्षिकांसह माहिती दिली. व उपस्थितांकडून योगाभ्यास करून घेतला.

यानंतर सकाळी 10.00 वा मधुरम सभागृह हिंदी साहित्य सम्मेलन, मोरभवन, नागपूर येथे कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे,सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया, नागपूर यांच्या सहप्रायोजकत्वाने जनसामान्यामधे योगविषयक जागृती करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या पार्श्वभूमीवर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य तर प्रमुख अतिथी म्हणून रामकृष्ण मठाचे अध्यक्ष प.पू. स्वामी ब्रह्मस्थानंद, विशेष अतिथी म्हणून सेंट्रल बॅंक ऑफ इंडियाचे वरिष्ठ प्रादेशिक प्रबंधक मा.विपनकुमार, विश्वविद्यालयाचे मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता तसेच या कार्यक्रमाचे संयोजक डॉ. मधुसूदन पेन्ना व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास विश्वविद्यालयातील सर्व संकायाचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, अधिकारी वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद, विश्वविद्यालयातील विद्यार्थी, तसेच जून 2015 मधे घेण्यात आलेल्या योगशिबिरांचे प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी व अन्य श्रोतृ वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता तसेच या कार्यक्रमाचे संयोजक डॉ.

मधुसूदन पेन्ना यांनी केले. या प्रसंगी त्यांनी विश्वविद्यालयाच्या योगविभागाद्वारे आयोजित विविध उपक्रमांचा आणि अभ्यासक्रमांचा आढावा घेतला तसेच प्राचीन योगपरंपरेचे जतन करण्यासाठी विश्वविद्यालय पूर्वीपासूनच कटिबध्द असल्याचे प्रतिपादीत केले. प्रास्ताविकातच त्यांनी विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या दहा योगशिबिरांचा अहवाल पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सादर केला.

त्यानंतर विश्वविद्यालयाच्या योगविभागातील विद्यार्थ्यांनी योगविषयक जनजागृती व्हावी यास्तव "योगाचा जोगवा" सादर केला. त्यानंतर या विद्यार्थ्यांनी योगासनांचे प्रात्यक्षिक मनोरा रचून सादर केले. विशेषतः पी.जी. डिप्लोमा इन योगिक सायन्स या अभ्यासक्रमाचा विद्यार्थी चि. लोकेश चवरे याने अत्यंत कठीण असा आसनांचे प्रात्यक्षिक सहजतेने सादर केले. त्याच्या आसन प्रदर्शनाने व शरीर संतुलनाने उपस्थित श्रोते भारावून गेले.

योगप्रशिक्षणा दरम्यान युनिटी स्पोर्ट असोसिएशन , बापु नगर, नागपूर येथे आयोजित प्रशिक्षण वर्गातील किशोरवयीन मुलांनी या कार्यक्रमात योगासन प्रात्यक्षिक सादर केले.

प्रात्यक्षिक प्रदर्शनानंतर कार्यक्रमाचे विशेष अतिथी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ प्रादेशिक प्रबंधक मा.विपनकुमार यांनी आपल्या भाषणात "योग ही जीवनशैली असून प्रत्येकाने तिला आपल्या दिनचर्येचा भाग बनविला पाहिजे. योगाभ्यासाने व्यक्ती अनुशासनयुक्त होवून जीवन तणावमुक्त होते". असे प्रतिपादित केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते, रामकृष्ण मठाचे अध्यक्ष प.पू. स्वामी ब्रह्मस्थानंद यांनी प्राचीन भारतीय परंपरा आणि संस्कृती यांचा आढावा घेत आजच्या विज्ञानयुगातही प्राचीन भारतीय योगशास्त्र आपले स्थान अबाधित टिकवून आहे व विज्ञाननिष्ठ मानवाच्या जीवनाला अधिक सुखदायक व समाधानी करण्यासाठी ही शास्त्रे सक्षम आणि उपयुक्त आहेत या विषयावर आपल्या अध ययनपूर्ण वक्तव्याने प्रकाश टाकला.

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरु यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात "संपूर्ण जगात भारतीय धर्म, संस्कृती आणि योगशास्त्राला विशेष महत्व आहे. अनेक राजकीय परंपरा आल्या आणि गेल्या परंतु भारताची अध्यात्मविद्यातिच्या अंगभूत वैशिष्ट्यांमुळे आजतागायत प्रवाहित व टिकून आहे. प्रत्येकामध्ये असलेल्या चैतन्याचा अनुभव करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने अंतर्मुख होवून योगाभ्यास करावा असे आवाहन या प्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी योगप्रशिक्षकांना आणि प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. तसेच उत्कृष्ट योगप्रात्यक्षिक सादर केल्याबद्दल योगविभागातील विद्यार्थी चि. लोकेश चवरे याला स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे संचालन डॉ. दिनकर मराठे यांनी केले तर आभारप्रदर्शन दर्शन व योगशास्त्र विभागच्या विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

2. प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराज जन्मशताब्दी महोत्सव

दिनांक 06.07.2015

वर्ष 2015 हे प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराज यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून सर्वत्र साजरे केले आहे. यानुषंगाने आधुनिक दार्शनिक असलेल्या श्रीगुलाबराव महाराजांचे दर्शनशास्त्राला मिळालेले योगदान समाजापुढे मांडण्यासाठी आणि त्यांनी लिहिलेल्या 134 ग्रंथांचे विविध दृष्टिकोनातून संशोधन व्हावे या उद्देशाने कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा भारतीय दर्शन तथा योग विभागाद्वारे द्विदिवसीय विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

या व्याख्यानमालेचा उद्घाटन सोहळा कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक आणि समदृष्टी, क्षमता विकास एवम् अनुसंधान मंडळ (सक्षम) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 06 जुलै 2015 रोजी संध्याकाळी 06.00 वा. मुंडले सभागृह, दि. बी.आर.ए.मुंडले विद्यालय दक्षिण अंबाझरी मार्ग नागपूर येथे मा.डॉ. मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून विश्वविद्यालयाचे प्रभारी कुलगुरु व भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे

अधिष्ठाता मा. डॉ. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते. मुख्य अतिथी म्हणून मा. डॉ. (उपाख्य भैयासाहेब) घटाटे व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ.मिलिंद कसबेकर उपस्थित होते.

या कार्यक्रमात सर्वप्रथम पंडित प्रभाकर धाकडे गुरूजींनी व्हायोलियन वर लघु बंदिशीद्वारे महाराजांना अभिवादन केले.संत गुलाबराव महाराजांच्या साहित्याचे ब्रेल लिपी, श्रवणग्रंथ व मुद्रित ग्रंथाचे व डॉ. मधुसूदन पेन्ना विरचित " प्रज्ञाचक्षुषम् " या संस्कृत महाकाव्याचे प्रकाशन करण्यात आले. "आंधळी गौळण" मधील काही गीतांचे सादरीकरण श्रीनिधी घटाटे व अंध कलाकारांनी केले.

या कार्यक्रमाचे संचालन सौ. रेणुका देशकर यांनी केले या कार्यक्रमाला मोठया संख्येने श्रोतृ वर्ग उपस्थित होता. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

3. निबन्धलेखन व शुभेच्छापत्र निर्माण स्पर्धा

दिनांक 28.08.2015

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाद्वो दिनांक 26.08.2015 ते दि.01.09.2015पर्यंत, 5 वा माळा , ना.सु.प्र, संकुल, सीताबर्डी , नागपुर येथे संस्कृत सप्ताहाचे आयोजन केले होते. या संस्कृत सप्ताहांतर्गत भारतीय दर्शन विभागातर्फे खालील दोन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

1) संस्कृत निबन्धलेखन स्पर्धा

संस्कृत सप्ताह – 2015–16 अन्तर्गत दिनांक 28.08.2015 रोजी विश्वविद्यालयाच्या दर्शन विभागातर्फे खालील विषयावर निबन्धलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

1) प्राचीनभारतीयशिक्षणपद्धतेः मूल्यानि ।

2)वैश्विकीकरणम् – आधुनिकशिक्षणपद्धतौ तस्य प्रभावः ।

3) प्राचीनभारतीयविज्ञानम् ।

वरील तीन पैकी एका विषयावर निबन्ध लिहायचा होता. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालय, विश्वविद्यालयातून एकूण 08 विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेचे परीक्षण प्रा.पराग जोशी यांनी केली.

या स्पर्धमध्ये खालील दोन विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले.

1) प्रथम पुरस्कार– अक्षय कथले	वसन्तराव नाईक प्रशासकीय महाविद्यालय,नागपूर	रु. 250/–
2) द्वितीय पुरस्कार– दिलीप सेनाड	पद.शै.विभाग,क.का.सं.वि,रामटेक	रु. 150/–

या विद्यार्थ्यांना रोख रक्कमेच्या पारितोषिकासह प्रमाणपत्र व पुस्तक मान्यवरांच्या हस्ते समारोप कार्यक्रमात देण्यात आले.

2)शुभेच्छा पत्र निर्माण स्पर्धा

संस्कृत सप्ताह – 2015–16 अन्तर्गत दिनांक 28.08.2015 रोजी विश्वविद्यालयाच्या दर्शन विभागातर्फे शुभेच्छा पत्र निर्माण स्पर्धाया स्पर्धेमध्ये एल.ए.डी. महाविद्यालय, नागपूर, बिंझाणी महाविद्यालय व इतर महाविद्यालय व विश्वविद्यालयामधून एकूण 33 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त व सक्रिय रूपाने सहभाग घेतला होता. परीक्षक म्हणून डॉ. नंदा पुरी, डॉ. कविता होले व प्रा.पराग जोशी उपस्थित होते. विद्यार्थ्यांची कल्पना, प्रस्तुती व रचनात्मक दृष्टिकोन पाहतांना परीक्षकांनी प्रत्येक

पुरस्कारात दोन – दोन पुरस्कारांची घोषणा केली. सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते खालीलप्रमाणे पुरस्कार देण्यात आले.

प्रथम पुरस्कार –	1. रूमा रहांगडाले, हिस्लॉप महाविद्यालय	रु. 250/– प्रमाणपत्र , पुस्तक
	2. अंबालिका सेठिया, क.का.सं.वि, रामटेक	रु. 250/– प्रमाणपत्र , पुस्तक
द्वितीय पुरस्कार –	1. कल्याणी चौरे, वसंतराव नाईक प्रशासकिय महाविद्यालय, नागपूर	रु. 150/– प्रमाणपत्र , पुस्तक
	2. स्नेहल गादेवार, एल.ए.डी. महिला महाविद्यालय, नागपूर	रु. 150/– प्रमाणपत्र , पुस्तक
तृतीय पुरस्कार –	1. अपेक्षा भोपळे, श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर	रु. 100/– प्रमाणपत्र , पुस्तक
	2. प्राजक्ता खेडीकर, क.का.सं.वि,,रामटेक	रु.100/– प्रमाणपत्र , पुस्तक

अशाप्रकारे वरील दोनही स्पर्धा भारतीय दर्शन विभागातर्फे यशस्वीरित्या संपन्न झाल्या.

4. आधुनिक काळात उपनिषदांची प्रासंगिकता सप्तदिनात्मक व्याख्यानमाला दिनांक 28 डिसेंबर 2015 ते 04 जानेवारी 2016

प्राचीन संस्कृत साहित्यातील उपनिषद् वाङ्मय अत्यंत समृद्ध आणि ज्ञानगर्भ साहित्य म्हणून आजही लोकप्रिय आहे. उपनिषदांबाबत अत्यंत जिज्ञासा असूनही त्यातील तत्त्वज्ञान गूढ असल्याने तसेच संस्कृत भाषेतून असल्याने त्याचे आकलन करणे अनेकांना कठीण वाटते. त्यामुळे असा जिज्ञासूंची, अभ्यासकांची जिज्ञासा पूर्ण करण्याच्या हेतुने तसेच प्राचीन उपनिषदातील सारगर्भ तत्त्वज्ञानाची उकल अत्यंत सोप्या पद्धतीने करण्याच्या उद्देशाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय अंतर्गत असलेल्या भारतीय दर्शन विभागाद्वारे दिनांक 28 डिसेंबर 2015 ते 04 जानेवारी 2016 या कालावधीत "आधुनिक काळात उपनिषदांची प्रासंगिकता " या विषयावर आधारित सप्तदिनात्मक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानमालेचे उद्घाटन दिनांक 28 डिसेंबर 2015 रोजी प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्र संकायाचे मा. अधिष्ठाता, डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि भारतीय धर्म तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे मा. अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दर्शनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी उपनिषदांची प्रासंगिकता आणि त्याचे आधुनिक काळातील संदर्भ यांचा मेळ आपल्या भाषणात व्यक्त केला. तसेच असाप्रकारच्या व्याख्यानमालेच्या आयोजनाची आवश्यकता ही स्पष्ट केली. डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी अध्यक्षीय भाषणात या व्याख्यानमालेची भूमिका व आवश्यकता मांडली.

त्यानंतर व्याख्यानमालेचे मुख्य व्याख्याते डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी 06 दिवसांमध्ये अनुक्रमे ईशावास्योपनिषद्, केनोपनिषद्,कठोपनिषद्,प्रश्नोपनिषद्, मुंडकोपनिषद्, मांडुक्योपनिषद्, तैत्तिरीयोपनिषद् आणि छांदोग्योपिनषद् या प्रमुख उपनिषदांची आजच्या काळातील प्रासंगिकता अत्यंत सुलभरीतीने व्यक्त केली. तसेच उपनिषदातील प्राचीन तत्त्वज्ञानाला विविध वैज्ञानिक संदर्भाद्वारे पुष्टी दिली.

या व्याख्यानमालेचे सातवे पुष्प डॉ. लीना रस्तोगी यांनी दिनांक 04 जानेवारी 2016 रोजी "बृहदारण्यकोपनिषदाची प्रासंगिकता" या विषयावरील व्याख्यानाद्वारे गुंफले.

व्याख्यानमालेचा समापन कार्यक्रम दिनांक 04 जानेवारी 2016 रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य यांनी भूषविले. या कार्यक्रमाला प्रमुखातिथी म्हणून डॉ. लीना रस्तोगी उपस्थित होत्या. या समापन कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी केले. अध्यक्षीय भाषणात मा. कुलगुरु महोदयांनी उपनिषदांच्या सारगर्भतेवर तसेच शैलीवर प्रकाश टाकला. तसेच स्वरचित एका आधुनिक संस्कृती पनिषदाचे वाचनही केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विभागप्रमुख डॉ. कलापिनी अगस्ती यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. रेणुका करंदीकर यांनी केले.

या व्याखनमालेत एकूण 65 विद्यार्थी व प्रतिनिधींनी सहभाग घेतला. सर्व सहभागी विद्यार्थी व प्रतिनिधी यांना प्रथमदिवशी नामांकन साहित्य देण्यात आले व व्याख्यानमालेच्या समापनानंतर प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले तसेच सर्वांसाठी विभागाद्वारे फलाहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

5. राष्ट्रीय योगासन स्पर्धा

योगशिक्षण व योगाभ्यासाला प्रेरणा मिळावी यास्तव विविध संस्थांद्वारे योगविषयक उपक्रम राबविले जातात. याच उद्देशाने विद्यार्थ्यांना योगाभ्यासात प्रोत्साहित करण्यासाठी योगासनांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते.

नागपूर जिल्हा योग फेडरेशनद्वारे दरवर्षी जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत निवड झालेल्या स्पर्धकांना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळते. या राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झालेले स्पर्धक राष्ट्रीय स्तरावर आयोजित योगासन स्पर्धेत सहभागी होतात.

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातील एम.फिल. योगशास्त्र अभ्यासक्रमाचा विद्यार्थी श्री. रवी रामटेके याने नागपूर जिल्हा योग फेडरेशन द्वारे आयोजित योगासन स्पर्धेत आपले स्थान निर्माण करून गोंदिया येथे झालेल्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत सहभागी झाला व राष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी त्याची निवड करण्यात आली.

दिनांक 10.01.2016 ते 14.01.2016 या कालावधीत मंगलुर येथे 40 व्या नॅशनल योग स्पोर्ट चॅम्पीयनशिपचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय स्पर्धेत श्री. रवी रामटेके याने आपला सहभाग नोंदवून. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे प्रातिनिधित्व केले. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी श्री. रवी रामटेके यास विश्वविद्यालयाद्वारे ट्रॅक सूट देण्यात आला तसेच आर्थिक सहाय्य करण्यात आले.

6. विभागातील विद्यार्थ्यांचा सहभाग व प्रावीण्य

भारतीय दर्शन व योग विभागातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेवून प्रावीण्य प्राप्त केले यात राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे आयोजित स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. संक्रमणोत्सव 2015 मध्ये दर्शन विभागातील श्री. दिलीप सेनाड यांनी कविता वाचन, वक्तृत्व स्पर्धा,या स्पर्धांमध्ये पारितोषिक प्राप्त केले.

❖❖❖❖❖❖

सा विद्या या विमुक्तये

वेदांग ज्योतिष विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायातील वेदांग ज्योतिष विभागाचा शैक्षणिक सत्र 2015–16 चा अहवाल पुढीलप्रमाणे –.

सप्त दिवसीय वेदांग ज्योतिष व वास्तुविषयक जागृती अभियान
दि. 10.07.2015 ते दि. 16.07.2015.

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग –ज्योतिष विभागातर्फे दि. 10.07.2015 ते 16.07.2015 या कालावधीत वेदांग–ज्योतिष व वास्तुविषयक जागृती अभियान नागपुरातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. समाजात ज्योतिष व वास्तुविषयासंबंधी असलेले गैरसमज दूर करणे, विभागातील अभ्यासक्रमांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविणे व शास्त्राचा प्रचार व प्रसार करणे हे अभियानाचे उद्देश होते. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, डॉ. दिनकर मराठे, व डॉ. प्रसाद गोखले यांचे अभियानाच्या उद्देशाला अनुसरुन 7 वेगवेगळया ठिकाणी व्याख्याने झाली.

स्थान – श्री अयाचित मंदिर , महाल, नागपूर

विषय – पौरोहित्य क्षेत्रात ज्योतिष शास्त्राचा उपयोग व खगोल परिचय

स्थान – राजस्थानी महिला मंडळ व अखिल भारतीय मारवाडी सम्मेलन

विषय– पारिवारिक सुख समृध्दी में ज्योतिष एवं वास्तुशास्त्र का योगदान

स्थान – श्री श्री रविशंकर आश्रम, पडोळे चौक, नागपूर

विषय – दैनंदिन जीवनात वास्तु शास्त्रीय सिध्दान्तांचा समन्वय व वैदिक ज्योतिष

स्थान – श्री हनुमान मंदिर, मानकापूर, नागपूर

विषय – ग्रह नक्षत्र दर्शनाचे महत्त्व व ज्योतिष व वास्तुविषयक भ्रान्ति निवारण

स्थान – श्री वीर हनुमान मंदिर, गोपालनगर, नागपूर

विषय – त्रिस्कंध ज्योतिष व वास्तुच्या प्रमुख सिद्धान्तांवर संवाद

स्थान – कल्याणेश्वर मंदिर, तेलंगखेडी, नागपूर

विषय – ज्योतिष वेधशाळा परंपरा व वास्तुदृष्टया मंदिराचे अध्ययन

स्थान – पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, एन.आय.टी. संकुल, नागपूर

समापन कार्यक्रम – अध्यक्ष मा. डॉ. उमा वैद्य, कुलगुरू, क.का.सं.वि. रामटेक

या अभियानाला जिज्ञासूंचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. वेदांग ज्योतिष विभागाकडून हा एक नवीन उपक्रम घेतला गेला. हे जागृती अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आयोजकांचे तसेच समन्वयक व व्याख्याते यांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले.

दिनांक 16.07.2015 रोजी मा. कुलगुरू, डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली विश्वविद्यालय परिसरात समापन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समन्वयक व प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायाचे अधिष्ठाता डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख ,डॉ. दिनकर मराठे मंचावर उपस्थित होते. समापन कार्यक्रमात सप्तदिवसीय अभियानाचे इतिवृत्त डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी सादर केले.कार्यक्रम आयोजित केलेल्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींचा मा. कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थी प्रतिनिधींनी मनोगत व्यक्त केले. सर्वांनी असे कार्यक्रम वारंवार आयोजित करावे अशी मागणी केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी असलेल्या मा. कुलगुरु यांनी या सफल अभियानासाठी आयोजकांचे अभिनंदन केले. समाजात जाऊन अशा प्रकारचे जागृती अभियान आयोजित करण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे व पुढेही अशा कार्यक्रमांचे आयोजन विभागाद्वारे करावे अशी सूचना

त्यांनी दिली. डॉ. दिनकर मराठे यांनी आभार प्रदर्शन केले. डॉ. प्रसाद गोखले यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. नागपूरातील विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमात एकूण 500 संस्कृत जिज्ञासू सहभागी होते.

भास्कराचार्य व्याख्यानमाला–2

क.का. संस्कृत विश्वविद्यालयातील, प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायान्तर्गत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे सतत दुस–या वर्षी दि. 26 फेब्रुवारी ते 4 मार्च 2016 पर्यन्त भास्कराचार्य व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानमालेमध्ये ज्योतिष शास्त्रान्तर्गत ज्योतिष, खगोल, गणित, वास्तु इत्यादी विविध विषयांवर तज्ज्ञांनी व्याख्याने दिली.उद्घाटक व्याख्यान डॉ. के.के. पाण्डेय, अधिष्ठाता, प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकाय यांनी दिले. उद्घाटनाच्यावेळी डॉ. विनीता फाटक, डॉ. प्रसाद गोखले, डॉ. दिनकर मराठे उपस्थित होते. डॉ. के.के. पाण्डेय यांनी प्रश्नमार्ग, लीलावती, जातकशास्त्र, वास्तुशास्त्र या विविध विषयांवर व्याख्यान दिली. डॉ. विनीता फाटक यांनी के. पी पध्दति, डॉ. प्रसाद गोखले यांनी खगोल, डॉ. दिनकर मराठे यांनी भास्कराचार्य परिचय या विषयावर व्याख्यान दिले. समापन कार्यक्रमात डॉ. ज्ञानेश्वर कुळकर्णी यांनी समाज आणि ज्योतिष या विषयावर व्याख्यान दिले. विशेषतः प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन डॉ. दिनकर मराठे, विभाग प्रमुख यांनी केले. या व्याख्यानमालान्तर्गत 50 प्रतिभार्गीनी भाग घेतला. या कार्यक्रमाचे संचालन विभाग प्रमुख डॉ. दिनकर मराठे आणि प्राध्यापक डॉ. प्रसाद गोखले यांनी या कार्यक्रमाची पूर्ण व्यवस्था केली. ही व्याख्यानमाला प्रख्यात आचार्य भास्कराचार्य यांना शब्दसुमनांजली म्हणून समर्पित करण्यात आली. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. कृष्णकुमार पाण्डेय होते. या व्याख्यानमालेमध्ये सर्व संकाय, शैक्षणिक विभाग आणि प्रशासकीय विभाग, व इतर विभागांचे सहकार्य प्राप्त झाले.

नक्षत्रमंडळाचे निरीक्षण

दिनांक 10 सप्टेंबर 2015 रोजी विभागातील सर्व प्राध्यापक व शोधविद्यार्थ्यांनी विश्वविद्यालयाच्या मुख्यालयाला भेट दिली व नक्षत्रमंडळचे अध्ययन केले. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय व डॉ. प्रसाद गोखले यांनी या वर्षी घटित होणा–या घटनांचे नक्षत्र मंडळाच्या साहाय्याने विवरण दिले. सर्व प्राध्यापक व शोध विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.

ओंकारनगर येथील निर्माणाधीन प्रकल्पाचे वास्तुशास्त्रदृष्टया परिशीलन

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागाद्वारे दि. 13.02.2016 रोजी ओंकारनगर, नागपूर येथील निर्माणाधीन प्रकल्पात वास्तुशास्त्रीय दृष्टिकोणातून परिशीलन करण्यासाठी भेट देण्यात आली. यामध्ये वास्तु डिप्लोमा अभ्यासक्रमांतर्गत 30 विद्यार्थी व वेदांग ज्योतिष विभागाचे सर्व प्राध्यापक यांचा समावेश होता. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांच्या मार्गदर्शनात भूमिपरीक्षण, दिक्निर्णय मातीचे परीक्षण, भूगर्भजलज्ञान परीक्षणाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रकल्पाचे वास्तुशास्त्रीय दृष्टिकोणातून परिशीलन केले व भेटीचा अहवाल सादर केला. हा उपक्रम सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी उपयोगी सिध्द झाला.

रमण विज्ञान केन्द्राला भेट

दिनांक 9.05.2016 रोजी विभागातील प्राध्यापक व शोध विद्यार्थ्यांनी नागपूर स्थित रमण विज्ञान केन्द्राला भेट दिली. सूर्यावर झालेल्या बुध संक्रमणाचे परिशीलन करणे या भेटीचा मुख्य उद्देश होता. विभागाच्या सर्व प्राध्यापक व शोध विद्यार्थ्यांनी या सुंदर आकाशीय घटनेचा आनंद घेतला.

अभ्यासक्रम –2015– 16 या शैक्षणिक वर्षात एम. फिल. वेदांग ज्योतिष ,बी.ए. वेदांग ज्योतिष, एम. ए. वेदांग ज्योतिष, पी.जी. डिप्लोमा इन वेदांग ज्योतिष, व वास्तुशास्त्र पदविका हे अभ्यासक्रम चालविण्यात आले .

विद्यार्थ्यांची उपलब्धी–विभागाचा विद्यार्थी श्री. सौरभ बेहरे, याने मोरवा, चंद्रपूर येथे आयोजित विश्वविद्यालयस्तरीय रा.से.यो. शिबिरात भाग घेतला.

विभागाचा विद्यार्थीश्री. अनुज शर्मा, याने तिरुपती येथील राष्ट्रिय संस्कृत विद्यापीठाव्दारे आयोजित All India Sanskrit Students Talent Festival मध्ये ज्योतिषभाषण व अंताक्षरी या विषयात भाग घेतला.

शिक्षणशास्त्र विभाग

शिक्षणशास्त्र विभागात शैक्षणिक सत्र 2015–16 मध्ये खाली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

1) बी.एड् व एम.एड् पुनर्रचित अभ्यासक्रम उद्बोधन वर्गः ऑगस्ट 5–6, 2015

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (विनिमय मानदंड आणि क्रियाविधी) विनिमय 2014 या अधिसूचनेनुसार बी.एड व एम.एड हे दोन्ही अभ्यासक्रम दोन वर्षाचे करण्यात आले आहे. या अधिसूचनेतील एन.सी.टी.ई च्या निकषानुसार बी.एड दोन वर्ष व एम.एड दोन वर्ष अशा प्रत्येक प्रोग्रॅमच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली. सदर अभ्यासक्रम प्रत्यक्ष राबवतांना अडचणी वा समस्या येऊ नयेत म्हणून विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यापीठ संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी ऑगस्ट 5–6, 2015 या दोन दिवसात बी.एड व एम.एड नवीन अभ्यासक्रम उदबोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत वर्गाचे उद्घाटन मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांचे हस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर दि.05.08.2016 रोजी पुढील सत्र घेण्यात आले.

1) Choice Based Credit System - डॉ. उमेश शिवहरे, परीक्षा नियंत्रक, क.का. संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

2) B.Ed. Curriculum Framework - डॉ. अर्चना अलोणी, नागपूर.

3) B.Ed. Curriculum : Core Subject- डॉ. ललिता चंद्रात्रे,

4) B.Ed. Curriculum : EPC, Internship & Question Paper Pattern - डॉ. ह्रषिकेश दलाई,

दि. 06.08.2015 रोजी पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

1) M.Ed. Curriculum Framework and Dissertation- डॉ.इंदुमती भारंबे, विभाग प्रमुख,

2) M.Ed. Curriculum Sessional Work - प्रा. अनघा आंबेकर,

3) M.Ed. Field Work & Internship - डॉ. कीर्ती सदार ,

सदर उद्बोधन वर्गाचा समारोप, डॉ. विजयकुमार सी.जी, संचालक, विद्यापीठ नियोजन व विकास मंडळ, ककासंवि रामटेक यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आला.

2) अभ्यासक्रम व क्षेत्रियकार्य उद्बोधन वर्गः ऑक्टोंबर 26, 2015

एम.एड पुनर्रचित अभ्यासक्रम व क्षेत्रिय कार्य या विषयी एम.एड प्रशिक्षणार्थ्यांसाठी ऑक्टोंबर 26, 2015 रोजी एका उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या उद्बोधन वर्गात पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले.

1) M.Ed. Curriculum Framework- डॉ.इंदुमती भारंबे

2) Field work - प्रा. अनघा आंबेकर

3) C-I Sessional work - डॉ. राजश्री मेश्राम

4) C-II Sessional work - डॉ. अमोल मांडेकर

5) C-III Sessional work - डॉ. कीर्ती सदार

6) C-IV Sessional work - डॉ. ह्रषिकेश दलाई,

3) शैक्षणिक संशोधन उद्‌बोधन कार्यक्रम : ऑक्टोंबर 27, 2015

एम.एड् प्रशिक्षणार्थ्यांना लघुसंशोधन कार्यासंबंधी मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळावे या हेतूने ऑक्टोंबर 27, 2016 रोजी शैक्षणिक संशोधन उद्‌बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात पुढीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले.

1) शैक्षणिक संशोधन संकल्पनाः– डॉ. ललिता चंद्रात्रे

2) शैक्षणिक संशोधनाची क्षेत्रे :– डॉ. उशशी गुहा, नागपूर.

3) संशोधन संबधित साहित्याचा अभ्यास :– डॉ. शशी वंजारी, विभाग प्रमुख शिक्षणशास्त्र विभाग, रा.तु.म विद्यापीठ, नागपूर.

4) संशोधन समस्या निवडः–डॉ.इंदुमती भारंबे

4) शैक्षणिक संशोधन पध्दती कार्यशाळाः फेब्रुवारी 13–15, 2016

एम.एड प्रशिक्षणार्थ्यांसाठी फेंब्रुवारी 13–15, 2016 या दोन दिवसात शैक्षणिक संशोधन पध्दती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत फेंब्रुवारी 13, 2016 रोजी पुढील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

1) शैक्षणिक संशोधन उद्दिष्टे व परिकल्पना – डॉ. अमोल मांडेकर

2) संबंधित साहित्याचा अभ्यास – डॉ. ह्रषिकेश दलाई,

3) संशोधनाची साधने – प्रा. अनघा आंबेकर

4) जनसंख्या व न्यादर्श – डॉ.इंदुमती भारंबे

फेब्रुवारी 15, 2016 रोजी पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली.

1) संशोधन पध्दती :– डॉ. ललिता चंद्रात्रे

2) शैक्षणिक संख्याशास्त्र :– डॉ. कीर्ती सदार

3) संदर्भ व संदर्भ ग्रंथसूची :– डॉ. राजश्री मेश्राम

या कार्यशाळेत प्रशिक्षणार्थ्यांकडून गटकार्य करवून घेण्यात आले.

❖❖❖❖❖❖

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

कालिदास अध्यापक महाविद्यालय

बी.एड्. / एम.एड्. अभ्यासक्रम उद्बोधन कार्यशाळा

05,06 ऑगस्ट 2015

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे पदव्युत्तर शिक्षण विभाग व कालिदास अध्यापक महाविद्यालयाद्वारे दि. 05 व 06 ऑगस्ट 2015 रोजी बी. एड्. व एम. एड्. च्या नवीन अभ्यासक्रावर दोन दिवसीय उद्बोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन विश्वविद्यालयाच्या कुलगुरू, मा. डॉ. उमा वैद्य यांच्या हस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी विश्वविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक, मा. डॉ. उमेश शिवहरे, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता व या कार्यशाळेच्या समन्वयिका मा. डॉ. ललिता चंद्रात्रे , पदव्युतर शिक्षणशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख मा. प्रा. डॉ. इंदुमती भारंबे व अभ्यासमंडळाचे सदस्य डॉ. अर्चना अलोणी मंचावर उपस्थित होते.

आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. उमा वैद्य यांनी आजची सामाजिक व जागतिक परिस्थिती तसेच या जागतिकीकरणाच्या युगात आपल्याला प्रत्येक बाबतीत अद्यावत राहणे आवश्यक आहे व त्या अनुषंगाने आपल्या अभ्यासक्रमांमध्येही बदल करणे गरजेचे आहे हे सांगितले.

उद्घाटनकार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ललिता चंद्रात्रे यांनी, संचालन प्रा. आशा नासरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.जयश्री भगत यांनी केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेत दि. 05 ऑगस्टला विश्वविद्यालयाचे परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे यांचे 'Discussion on CBCS Pattern' या विषयावर, डॉ. अर्चना अलोणी यांचे 'B. Ed. Curriculum Frame work' या विषयावर, डॉ. ललिता चंद्रात्रे यांचे 'Information Regarding B. Ed. Curriculum' या विषयावर, डॉ. ह्रषिकेश दलाई यांचे 'EPC, School Internship & Question Paper Pattern' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित कले गेले.

कार्यशाळेच्या दुस–या दिवशी दि. 06 ऑगस्टला एम. एड्. अभ्यासक्रमाशी निगडीत डॉ. इंदुमती भारंबे यांचे 'Preliminary Information, Curriculum Frame work, (CBCS) & Dissertation' या विषयावर, प्रा. अनघा आंबेकर यांचे 'Theory papers, sessional work & Question Paper pattern' या विषयावर डॉ. किर्ती सदार यांचे 'Field work & Internship' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले गेले.

कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून, संचालक, बी. पी. डी. मा. डॉ. सी. जी. विजयकुमार मंचावर उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यापीठाद्वारे चालविले जाणारे विविध अभ्यासक्रम, भविष्यात राबविले जाणारे उपक्रम, संस्कृतच्या प्रचार व प्रसारासाठी विश्वविद्यालयाद्वारे राबविले जाणारे उपक्रम व बी. एड्. व एम. एड्. उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी भविष्यात राबविल्या जाणा–या विविध योजना यावरही प्रकाश टाकला.

या कार्यशाळेसाठी संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नित बी. एड्. महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व संस्थाचालक तसेच अभ्यासमंडळाचे सदस्य उपस्थित होते.

संस्कृत सप्ताह

26.08.2015 ते 01.09.2015

कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात दि. 26.08.2015 ते 01.09.2015 दरम्यान संस्कृत सप्ताहाच्या निमित्ताने विश्वविद्यालयाच्या विविध विभागांतर्फे विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात वक्तृत्व, कथाकथन, प्रश्नमंजूषा, निबंध लेखन, शुभेच्छापत्र तयार करणे, गीतगायन, एकपात्री प्रयोग, संस्कृत श्लोक अंताक्षरी इ. स्पर्धांचा समावेश होता. कालिदास विश्वविद्यालयाच्या अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

संस्कृत सप्ताहाचा समारोपीय कार्यक्रम दि.01.09.2015 रोजी घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू, डॉ. उमा वैद्य होत्या. प्रमुख अतिथि म्हणून रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. योगानंद काळे व विशेष अतिथि म्हणून भोपाळ येथील बँक अधिकारी व संस्कृत भाषा अनुरागी श्री रत्नाकर दाबके यांची उपस्थिती होती. विद्यापीठ नियोजन विकास मंडळाचे संचालक डॉ. सी.जी. विजयकुमार मंचावर उपस्थित होते.

संस्कृत भाषा ही मानवावर संस्कार करणारी भाषा असल्याने या भाषेतील मूल्यविचारांचे अनुसरण करणे हे संस्कृत भाषा शिकणा–याचे कर्तव्य आहे, नव्हे ते त्याने सुजाणपणे केले पाहिजे' असे डॉ. योगानंद काळे म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, संस्कृत भाषे संदर्भात जे चांगले आहे त्याचे मंथन समाजासमोर करणे स्वागतार्ह आणि औचित्यपूर्ण आहे, पण संस्कृत भाषेच्या शुध्दीविषयक तसेच तिच्या सुचारू वापराबाबत आपण अधिक जागरूक असण्याची गरज आहे.'

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवराम भट, इतिवृत्त वाचन डॉ. सी.जी. विजयकुमार यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. कार्यक्रमाला सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् ने झाली.

शिक्षक दिन

दि.05.09.2015

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे अध्यापक महाविद्यालय व सर्व विभागांद्वारे दि.05.09.2015 रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलसचिव मा. डॉ. अरविंद जोशी व अध्यक्ष मा. डॉ. मधुसूदन पेन्ना, अधिष्ठाता, दर्शन विभाग, मंचावर उपस्थित होते. अन्य मान्यवरांमध्ये डॉ. सी. जी. विजयकुमार, बी. पी. डी. संचालक, क. का. सं. वि., डॉ. इंदुमती भारंबे, विभाग प्रमुख, पदव्युत्तर शिक्षण विभाग मंचावर उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. अरविंद जोशी हयांनी आजच्या बदलत्या परिस्थितीत शिक्षकांच्या वाढत्या जबाबदा–यांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी आजचे विद्यार्थी कसे प्रत्येक बाबतीत जागरूक झालेले आहेत आणि त्या अनुषंगानेच शिक्षक घडवले गेले पाहिजेत हे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कीर्ती सदार यांनी, संचालन प्रा. आशा नासरे यांनी व आभार प्रदर्शन डॉ. अमोल मांडेकर यांनी केले. या प्रसंगी सर्व विभागांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम् ने झाली.

सूक्ष्म अध्यापन कार्यशाळा

21.10.2015 ते 30.10.2015

कालिदास विश्वविद्यालयाच्या अध्यापक महाविद्यालयात दि. 21.10.2015 ते 30.10.2015, या कालावधीत सात दिवसीय सूक्ष्म अध्यापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. ललिता चंद्रात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेत बी.एड्. व एम.एड्. च्या शिक्षकांनी सूक्ष्म अध्यापनाची विविध कौशल्ये प्रात्याक्षिकांसह विद्यार्थ्यांना शिकविली. शिक्षकांच्या कौशल्य सादरीकरणानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने एक–एक कौशल्यावर प्रभुत्व मिळेपर्यंत कौशल्याचा सराव केला. या कार्यशाळेत डॉ. ललिता चंद्रात्रे यांनी 'सूक्ष्म अध्यापनाची संकल्पना' यावर मार्गदर्शन केले. प्रा. आशा नासरे यांनी 'प्रस्तावना कौशल्य' , डॉ. अमोल मांडेकर यांनी 'प्रश्नोत्तर कौशल्य', प्रा. वैशाली सांबरे यांनी 'फलक लेखन कौशल्य', डॉ. हृषिकेश दलाई यांनी 'चेतक बदल कौशल्य', प्रा. हर्षा पाटील यांनी 'स्पष्टीकरण कौशल्य' व प्रा. जयश्री भगत यांनी 'सेतुपाठ' सादर केले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्यापनाविषयी आत्मविश्वास निर्माण झाला व मनातील भीती कमी झाली. ही त्यांच्या अध्यापनाची पहिली पायरी होती.

हस्तकला कार्यशाळा

23.11.2015

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या अध्यापक महाविद्यालयात दि.23.11.2015 रोजी एक दिवसीय हस्तकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळे करिता प्रमुख अतिथी म्हणून सुरभी कला प्रशिक्षण केंद्र देवनगर, नागपूर येथील श्री. संदिप देशमुख व श्रीमती अंजली मॅडम उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना Poster Making, Chalk Making, Clay Modeling, Envolop Making, Greeting Making, Candle Making ई. विषयांवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. या कार्यशाळे तबी.एड्. च्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

बी.एड्. व एम.एड्.चे सर्व प्राध्यापक यावेळी उपस्थित होते.

अतिथी व्याख्यान 23/02/2016

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या अध्यापक महाविद्यालयात दिनांक 23/02/2016 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. हे व्याख्यान दोन सत्रात ठेवण्यात आले होते.

प्रथम सत्राच्या अतिथी मा. डॉ. ललिता चंद्रात्रे (अधिष्ठाता, पदव्युत्तर शिक्षण विभाग, क.का.स.वि.) यांनी पाठ नियोजन, उद्दिष्टे व स्पष्टीकरणांवर आपले व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानात उत्तम पाठाचे नियोजन कसे करावे, चांगल्या पाठनियोजनामध्ये उद्दिष्टांचे महत्व आणि पाठाचे स्पष्टीकरण कसे करावे याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

व्दितीय सत्राचे अतिथी मा. प्रा. श्याम निकोसे (सेवानिवृत्त प्राध्यापक, सेवासदन डी. एड. कॉलेज, नागपूर) यांनी आपल्या व्याख्यानात शैक्षणिक साहित्य निर्मिती व उपयोजन यावर व्याख्यान दिले.त्यांनी शैक्षणिक साहित्याचा उपयोग कशाप्रकारे करावा, उत्कृष्ट साहित्य कमी खर्चात व कमी वेळात पाठानुरूप कसे तयार करावे, त्याचप्रमाणे घरातील किंवा परिसरातील टाकावू वस्तूंचा उपयोग शैक्षणिक साहित्य बनविण्याकरिता कसा करावा हे प्रत्यक्ष करून दाखविले व पाठाला शैक्षणिक साहित्य कसे पूरक ठरतात हे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

या व्याख्यानामध्ये अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. हृषिकेश दलाई यांनी अध्यक्षपद भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की या अतिथी व्याख्यानांचा मूळ उद्देश पाठनियोजन व शैक्षणिक साहित्यनिर्मिती तर आहेच पण त्यापेक्षाही त्यांचे जास्त उपयोग प्रभावी शिक्षण देण्याकरिता कशाप्रकार करता येईल हा त्यामागचा मुख्य उद्देश्य होता.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. हर्षा पाटील यांनी तर आभार प्रदर्शन अध्यापक महाविद्यालयाचा विद्यार्थी धनाजी जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अध्यापक महाविद्यालयाच्या संपूर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांनी मोलाचे योगदान दिले.

✦✦✦✦✦

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः

प्रकरण दुसरे

विस्तार सेवा अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना

राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक दोन दिवसीय
कार्यशाळा व आढावा आणि नियोजन बैठक
दिनांक 09–10 जुलै 2015

उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक यांची राज्यस्तरीय कार्यशाळा व नियोजन बैठक **दिनांक 09 जुलै व 10 जुलै 2015** रोजी बाहे अकादमी ,पाचगणी येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेत विश्वविद्यलयाचे डॉ. दिनकर मराठे, कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत राज्य स्तरावरच्या विविध उपक्रमांची चर्चा तसेच विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या 5 गावांमधील कृती आराखडा कार्यान्वयीत करणारी चर्चा करण्यात आली.रा.से.यो.पथके मुनीजन अंतर्गत दरवर्षी गाव दत्तक घेऊन विविध उपक्रम राबवितात. सत्र 2015 –16 मध्ये रा.से.यो. पथकांनी घेतलेल्या दत्तक गाव तसेच तेथे राबविलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला

रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांची सभा

दिनांक 20.07.2015

दि. 20 जुलै 2015 रोजी पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, एन. आय.टी. संकुल, नागपूर येथे सत्र 2015–16 साठी सर्व रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेसाठी डॉ. हरेकृष्ण अगस्ती ,डॉ. दिनकर मराठे, डॉ. रेणुका बोकारे,डॉ. दिलीप चौधरी, प्रा.अनुप सायरे ,प्रा. विजय मते सदस्य उपस्थित होते. सदर सभेत दत्तक ग्राम योजना , नियमित व विशेष शिबिरांचे आयोजन, रा.से.यो स्वयंसेवकांसाठी डायऱ्यांची खरेदी, सत्र 2015–16 अंकेक्षण अहवाल, कार्यक्रम अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण या विषयांवर चर्चा करण्यात आली.

उद्‌बोधन वर्ग

दिनांक 03.08.2015

शैक्षणिक सत्र 2015–16 मध्ये क.का. संस्कृत विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसरातील रा.से.यो. पथकासाठी दि. 03.08.2015 रोजी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रा.से.यो.समन्वयक डॉ. हरेकृष्ण अगस्ती तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. दिनकर मराठे आणि डॉ. रेणुका बोकारे उपस्थित होते. सुरुवातीला सत्र 2015–16 मध्ये रा.से.यो मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचा परिचय करून दिला.नंतर रा.से.यो. समन्वयकांनीरा.से.यो. चा इतिहास ,उद्‌दिष्ट आणि राष्ट्रीय स्तरावर रा.से.यो. उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यापीठामध्ये मागील वर्षामध्ये रा.से.यो.ची वाटचाल बद्‌दल विद्यार्थ्यांना कल्पना दिली. रा.से.यो. ची कार्यप्रणाली तसेच नियमित व विषेश उपक्रमांच्या आयोजनाबाबत डॉ.मराठे यांनी सविस्तर माहिती दिली. डॉ. बोकारे यांनी आभार प्रदर्शन केले.

आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर

दिनांक 15.09.2015

दि. 15.09.2015 रोजी विश्वविद्यालयातर्फे विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसरात विश्वविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन मा. कुलगुरू कुलसचिव आणि आरोग्य शिबिरासाठी डागा

हॉस्पीटल नागपूर येथुन आलेली वैद्यांची चमू, प्राध्यापक, अधिकारी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात वैद्य चमूचे प्रमुख डॉ. नलिनी मेश्राम यांनी मार्गदर्शन केले. उद्घाटनानंतर प्रत्यक्ष तपासणीचे काम सुरु झाले. रक्तगट तपासणी , सिकलसेल या आजाराची तपासणी करण्यात आली होती. रक्तदान शिबिराची संपूर्ण जबाबदारी रा.से.यो पथकाकडे होती. या रक्तदान शिबिरात विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी उत्साहपूर्वक रक्तदान केले. एकूण 26 युनिट रक्त गोळा करण्यात आले.

रा.से.यो. स्थापना दिवस
दिनांक 24.09.2015

दिनांक 24.09.2015 रोजी विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसरात कार्यरत रा.से.यो. पथकातर्फे रा.से.यो. स्थापना दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर उपक्रमात प्रमुख वक्ता म्हणून डॉ. सूभाष तोषिणवाल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या नियोजन व विकासमंडळाचे निर्देशक डॉ. विजयकुमार सी.जी. उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. समन्वयक डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी केले. प्रमुख वक्तांनी आजच्या काळात युवा विद्यार्थ्यांसमोरील आव्हानांचा आढावा घेतांना त्या समस्यांवर मात करून विद्यार्थ्यांनी समाजकार्यात कक्षा प्रकारे स्वतःला नियोजित करावे आणि स्वतःच्या व्यक्तिमत्व विकसित करावे या विषयावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात डॉ. विजयकुमार यांनी शिक्षणासोबत समाजसेवेचा बाळकडू विद्यार्थ्यांनी या वयात घेतला तर भावी जीवनात उत्तम नागरिक म्हणून समाजाच्या प्रगतीत हातभार लावू शकतील असा विश्वास येथे व्यक्त केला.

रा.से.यो. कार्यप्रसिद्धी सप्ताह
दिनांक 24.09.2015 ते 02.10.2015

दिनांक 24.09.2015 ते 02.10.2015 या कालावधीत रा.से.यो कार्यप्रसिद्धी सप्ताह रा.से.यो. पथकातर्फे साजरा करण्यात आला. या सप्ताहा अंतर्गत दिनांक 29.09.2015 रोजी निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सोत्साह सहभाग नोंदविला आहे. वक्तृत्व स्पर्धेसाठी " स्वच्छ भारत अभियानात युवकांची भूमिका " हा विषय ठेवण्यात आला होता. परीक्षक म्हणून आर.एस.मुंडले , धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय येथील दर्शन विभागातील प्राध्यापिका डॉ. वर्षा जपे तसेच क.का.संस्कृत विश्वविद्यालयाचे वेदांग ज्योतिष विभागाचे डॉ. प्रसाद गोखले हे उपस्थित होते. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. सुरभी भाके, द्वितीय क्रमांक श्री शुभम डांगे आणि तृतीय क्रमांक श्री. दिलीप सेनाड यांनी प्राप्त केला. निबंध स्पर्धेसाठी भारताच्या प्रगतीसाठी डिजीटल इंडिया या संकल्पनेचा योगदान" हा विषय होता.

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस व गांधी जयंती निमित्त
1) सामान्य ज्ञान स्पर्धा
दिनांक 01.10.2015

क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या रा.से.यो. तर्फे गांधी जयंती निमित्य दिनांक 01.10.2015 रोजी गांधीजींचे जीवन,कृती आणि कार्य या विषयाला अनुसरून एका सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नागपुरातील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच क.का.संस्कृत विश्वविद्यालयाचे रा.से.यो. स्वयंसेवक आणि विद्यार्थी असे एकूण 350 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. यात प्रथम , द्वितीय ,तृतीय आणि प्रोत्साहनपर 05 असे गुणवत्ता यादीत एकूण 08 विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देण्यात आले.

2) स्वच्छता अभियान
दिनांक 02.10.2015

गांधी जयंतीला अनुसरून दिनांक 02.10.2015 रोजी सकाळी स्वच्छता अभियान राबविण्यात आला होता. विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसराची स्वच्छता करण्यात आली. यात विश्वविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवक ,इतर विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सकाळी 7 ते 9 या वेळेत हे अभियान पार पडले.

3) विशेष व्याख्यान
दिनांक 02.10.2015

गांधीजयंती आणि आंतराष्ट्रीय अहिंसा दिवसाला अनुसरून विश्वविद्यालयाच्या रा.से.यो. पथकातर्फे दिनांक 02.10.2015 रोजी विश्विद्यालयाच्या शैक्षणिक परिसरात व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित कण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून गांधी विचार धाराचे सुप्रसिद्ध अभ्यासक श्री. श्रीपाद कोठे तर विशेष अतिथि म्हणून विश्वविद्यालयाचे वित्त व लेखाधिकारी डॉ. रामचंद्र जोशी हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय दर्शन,धर्म व तत्त्वज्ञान संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते. महात्मा गांधी एक व्यक्ती नसून तत्त्व आहेत हे सर्वांनी अनुभवला पाहिजे असे मत प्रमुख वक्ता श्री कोठे यांनी मांडला. संस्कृत ,संगीत ,स्वच्छता, साधेपणा आणि सत्य या पाच "स कारांचा" प्रत्येकाने अवलंब केला तर प्रत्यकाचे जीवन सार्थक होईल असा आशावाद श्री.कोठे यांनी व्यक्त केला. गांधीजींचा स्वच्छताबद्दलचे विचार मांडतांना असे म्हणाले की, स्वच्छता ही स्वस्थ असण्याची गुरुकिल्ली आहे. बाहय स्वच्छतेसोबत अध्यात्म मार्गाने आंतरिक स्वच्छता टिकवून ठेवली तर व्यक्तिमत्त्व विकासात भर पडेल असे मत त्यांनी व्यक्त केले. महात्मा गांधीजींचे संस्कार हृदयात स्थापित करून प्रत्येक नागरिकाने मी म्हणजे भारत देश असा विचार केल्यास आपल्याला आजच्या विदारक स्थितीतून बाहेर पडणे शक्य होईल असे अध्यक्षीय भाषणात डॉ. पेन्ना म्हणाले. या प्रसंगी स्वच्छता आणि अहिंसाची प्रतिज्ञा उपस्थितांनी घेतली. या कार्यक्रमात विश्वविद्यालयाचे विद्यार्थी,अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

राज्यस्तरीय रा.से.यो. समन्वयकांची बैठक
दिनांक 19 –20 डिसेंबर 2015

रा.से.यो. कक्ष, महाराष्ट्र शासन यांच्याकडून राज्यस्तरीय रा.से.यो. समन्वयकांची बैठक व कार्यशाळा दि. 19–20 डिसेंबर 2015 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षणावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या बैठक आणि कार्यशाळेसाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. श्री. नंदकुमार, शिक्षण आयुक्त मा. अनुप कुमार आणि महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव डॉ. सुवर्णा खरात आणि रा.से.यो. चे राज्य संपर्क अधिकारी मा. डॉ. अतुल साळुंके उपस्थित होते. सदर बैठकीत शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण, राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर, उत्कर्ष, प्रेरणा आणि साहसी क्रीडा शिबिर, लेखे अहवाल 2014–15 सादर करण्याबाबत, इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांची सभा
दिनांक 30.12.2015

दि. 30 डिसेंबर 2015 रोजी पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, एन. आय.टी. संकुल, नागपूर येथे सत्र 2015–16 साठी विश्वविद्यालयस्तरीय रा.से.यो. विशेष शिबिराचे तसेच शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण आणि इतर काही महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा करण्यासाठी सर्व रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेसाठी डॉ. हरेकृष्ण अगस्ती, डॉ. विजयकुमार सी.जी , डॉ.

दिनकर मराठे, डॉ. दिलीप चौधरी ,प्रा.अनुप सायरे सदस्य उपस्थित होते. सदर सभेत विद्यापीठस्तरीय रा.से.यो. विशेष शिबिराचे आयोजन, शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षण,दत्तक गावांमध्ये स्वच्छ भारत अभियान राबविणे ,रा.से.यो. कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण, आपत्ति व्यवस्थापन कक्ष स्थापना इ. विषयांवर चर्चा करण्यात आली.

राज्यस्तरीय रा.से.यो. समन्वयकांची बैठक

दिनांक 15 –16 जानेवारी 2016

रा.से.यो. कक्ष, महाराष्ट्र शासन यांच्याकडून राज्यस्तरीय रा.से.यो. समन्वयकांची बैठक दि. 15–16 जानवारी 2016 रोजी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेत क.का.संस्कृत विद्यापीठाचे रा.से.यो. समन्वयक डॉ. हरेकृष्ण अगस्ती सहभागी झाले होते. गोंडवाना विद्यापीठाचे मा. कुलगुरु, रा.से.यो.राज्य संपर्क अधिकारी मा. डॉ. अतुल साळुंके उपस्थित होते. सदर बैठकीत विद्यापीठ दत्तक गावांमध्ये राबविलेल्या उपक्रमांबाबत, मुनीजन अंतर्गत दत्तक गावांमध्ये उपक्रमांच्या आढावा ,विशेष शिबीरांचे आयोजन, लेखे अहवाल 2014–15, राज्यस्तरीय शिबीरांमधील सहभाग इ. विषयांवर चर्चा करण्यात आली.

विद्यापीठस्तरीय रा.से.यो.विशेष वार्षिक शिबीर

दि. 12 फेब्रुवारी 2016 ते 18 फेब्रुवारी 2016

विषयः– ग्रामस्वच्छतेसाठी लोकनिर्धार

स्थळः–विद्यापीठ दत्तक ग्राम, जि.प.उ.प्राथ. शाळा मोरवा, त. जि. चंद्रपूर

अहवाल

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक व छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय, मोरवा जि. चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ दत्तक ग्राम जि.प.उच्च प्राथमिक शाळा मोरवा ता.जि. चंद्रपुर येथे 12 फेब्रुवारी ते 18 फेब्रुवारी 2016 या कालावधीत सात दिवसीय निवासी विशेष वार्षिक शिबीर संपन्न झाले. त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे.

पूर्वतयारी :–

गुरुवार दि. 11 फेब्रुवारी 2016 सकाळी 11 वाजता शिबिरार्थ्यांनी निवास व्यवस्था, स्नान गश्हाची व्यवस्था, भोजनगश्हाची व्यवस्था, इंधनाची व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, कार्यक्रमासाठी पेंडालची व्यवस्था, गावात बॅनर लावणे, गावातील लोकांना कार्यक्रम पत्रिका वाटणे इ. शिबीराची पूर्वतयारी केली.

शुक्रवार दि. 12 फेब्रुवारी 2016

शिबीराचा पहिल्या दिवशी सकाळी 8:00 वाजता शिबीरार्थी गावात दाखल झाले. स. 9:00 ते 10 शिबीर स्थळाच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ केला. पहिल्या दिवशी गावातील उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वच्छतेसाठी उत्फूर्त प्रतिसाद दिला.

10:30 वाजता विद्यापीठातील इतर शिबीरार्थी शिबीरस्थळी दाखल झाले. सकाळी 11:00 ते 12:00 पर्यंत उद्घाटन कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यात आली. दुपारी 1:00 वाजता शिबीराचा उद्घाटन समारंभ सुरू झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजमाता जिजाऊ बहुद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष मा. सुभाषराव ठोंबरे होते तर उद्घाटक म्हणून मा. ना. हंसराजजी अहीर, केंद्रीय रसायन व खते राज्यमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली, मुख्य अतिथी म्हणून मा. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, अधिष्ठाता क.का.सं.वि, रामटेक, विशेष अतिथी म्हणून मा. डॉ. हरेकृष्ण अगस्ती समन्वय रा.से.यो. क.का.सं.वि. रामटेक हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणुन मा. देवराव भोंगळे, सभापती अर्थ व बांधकाम जि.प.चंद्रपूर,मा. नानाजी पाटील थेरे सरपंच ग्रामपंचायत मोरवा, मा. शंकर खंडाळकर उपसरपंच ग्रामपंचायत मोरवा, मा. महादेवजी पिदुरकर, मा. शोभाताई पिदुरकर अध्यक्ष तंटामुक्त समिती मोरवा, मा. भगवती पिदुरकर ग्रामपंचायत सदस्य मोरवा, मा. शामकांतजी थेरे माजी सरपंच मोरवा, मा. कांताबाई खोब्रागडे ग्रामपंचायत सदस्य मोरवा, मा. रत्नाकर चौधरी संचालक रा.जि.ब.शि.प्र.मं.मोरवा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व शिबिर प्रमुख प्रा. दिलीप चौधरी व सूत्रसंचालन प्रा. सारिका मेश्राम सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. संदेश

वनकर यांनी केले यावेळी गावकरी व स्वयंसेवक बहुसंखेने उपस्थित होते. उद्घाटन समारंभानंतर स्वयंसेवकांनी ग्राम सर्वेक्षण केले सायंकाळी 6:00 ते 8:00 वाजता गट विभागणी व गट प्रमुखाची निवड व कामाचे वाटप करण्यात आले.

शनिवार दि. 13 फेब्रुवारी 2016

दिनांक 13 फेब्रुवारी 2016 रोजी शनिवारी स्वयंसेवकांनी सकाळी 5.30 ते 6:00 जागरण केले. सकाळी 6:00 ते 6:15 वाजता प्रार्थना व तुकारामाचे अभंग वाचन केले. 6:15 ते 7:00 दरम्यान प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीत राष्ट्रीय सेवा योजनेचे नारे लावून लोकांना शिबीराकडे आकर्शित करण्यात आले. 7:00 ते 7:30 दरम्यान स्वयंसेवकांना चहा व नास्ता देण्यात आला.

श्रमदानः—

सकाळी 8:00 ते 11:00 या दरम्यान श्रमदानातून गावातील संपूर्ण रस्त्याची स्वच्छता, नाल्याची स्वच्छता करण्यात आली. त्याच प्रकारे गावातील लोकांना स्वच्छतेबद्दल प्रेरित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी घनकचरा व्यवस्थापनाकरीता कचऱ्याचे टाके बांधकामासाठी एक ट्रॅक्टर रेती जमा करून भरणे व शिबीर स्थळी आणून खाली करण्याचे काम केले.

बौद्धिक सत्रः—

दुपारी 2 ते 3 वाजता या उपक्रमाअंतर्गत **''स्पर्धा परीक्षेतील संधी आणि ग्रामीण विद्यार्थी''** या विषयावर ना. नितेश गोहणे पोलीस उपनिरीक्षक, आष्टी यांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये MPSCo UPSC यासारख्या स्पर्धा परीक्षांची तोंडओळख करून दिली, त्याची पूर्व तयारी करताना कोणते पुस्तक वाचावेत, वयाच्या कोणत्या वयापासुन सुरूवात करावी यांचे मार्गदर्शन करण्यात आले होते. त्याच प्रकारे जि.प.उच्च प्राथमिक शाळा मोरवा येथील शिक्षक आणि गावकरी उपस्थित होते.

सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमः—

दुपारी 3 ते 6 वाजता या उपक्रमांतर्गत **महिला मेळावा'बालसंगोपन— शिक्षण व संस्कार'** या विषयावर मा. इंजि. चंद्रकांत जाधव, उर्जानगर यांनी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनातून मुलांना कसे घडवायचे व संस्कार कसे करायचे याचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी गावातील जवळपास 800 महिलांची उपस्थिती होती.

लोकजागरः—

सायं 7 ते 8 वाजता या उपक्रमांतर्गत '**मी गाडगे बाबा बोलतोय'** हा ग्रामस्वच्छतेवर आधारित एकल पात्री प्रयोग मा. गजानन घुमे, शिक्षक, भद्रावती यांनी सादर केला. या एकलपात्री प्रयोगातून गावाच्या स्वच्छतेवर, अंधश्रध्देबद्दल ग्रामस्थांना प्रबोधित केले. या कार्यक्रमास गावकऱ्यांनी उत्कृष्ठ प्रतिसाद दिला.

लोकरंजनातून लोकप्रबोधनः—

रात्रि 8:00 ते 10:00 या उपक्रमाला दिलेल्या नावाप्रमाणे लोकरंजनाचे व लोकप्रबोधनाचे कार्य स्वंयसेवकांनी केले. यात स्वंयसेवकांनी नृत्य त्याच प्रकारे प्रामुख्याने व्यसन मुक्तीवर नाटिका सादर करून लोकांचे प्रबोधन केले.

रविवार दि. 14 फेब्रुवारी 2016

दिनांक 14 फेब्रुवारी 2016 रोजी रविवार ला शिबिराचा तिसरा दिवस होता. या दिवशी स्वयंसेवकांनी 5:30 ते 6:00 प्रातःविधी व जागरण केले. सकाळी 6:00 ते 6:15 या कालावधीत प्रार्थना, राज्यघटना, तुकारामाचे अभंग वाचन केले. यानंतर 6:15 ते 7:00 या दरम्यान प्रभात फेरी काढण्यात आली स्वच्छतेचे नारे देण्यात आले. सकाळी 7:00 ते 7:30 दरम्यान आरोग्याची समृध्दता राखण्यासाठी योगासन करण्यात आले. सकाळी 7:30 ते 8:00 दरम्यान चहा व नास्ता केला.

श्रमदानः—

सकाळी 8:00 ते 11:00 या दरम्यान श्रमदानातून मोरवा गाव ते चारगाव हा रस्ता स्वच्छ करण्यात आला तसेच वृक्षारोपणासाठी 20 खड्डे खोदण्यात आले. घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खत टाके निर्मितीची जागा स्वच्छ करून ले—आऊट टाकण्यात आले.

बौद्धिक सत्र —

दुपारी 2:00 ते 3:00 या दरम्यान '**बदलते जागतिक अर्थकारण आणि भारतीय युवकांपुढील आव्हाने**' या विषयावर मा. प्रा. मनोज ढोलणे छा.रा.सं.प्र.से.महा. मोरवा यांनी मार्गदर्शन करून भारतातील युवकांना समोर येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याचा मार्ग सांगितला.

सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमः—

दुपारी 3:00 ते 6:00 या दरम्यान '**शेतकरी मेळाव्याचे आयोजन**' करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मा. पी.एन. येरगुडे, तालुका कृषी अधिकारी चंद्रपूर उद्घाटक म्हणुन उपस्थित होते. तसेच मार्गदर्शक म्हणून मा. सतीश पिंपळे, प्रयोगशील शेतकरी वणी यांनी फायद्याची शेती कशी करावी याचे उदाहरणासहीत उत्तम असे मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी म्हणून मा. सुधाकरजी खरवडे, उपाध्यक्ष, रा.जि.ब.शि.प्र, मं, मोरवा उपस्थित होते.

लोकजागरः—

सायंकाळी 7:00 ते 8:00 या दरम्यान लोकजागर या उपक्रमातून **अंधश्रद्धा भ्रम व वास्तव '** या विषयावर चमत्काराचे प्रयोग सादर करून मा. इंजि. प्रदीप अडकीने, कनिष्ठ अभियंता सा.बा.विभाग चंद्रपुर यांनी मार्गदर्शन केले. यात गावकऱ्यांचा मोठया प्रमाणात सहभाग होता.

लोकरंजनातून लोकप्रबोधनः—

रात्रि 8:00 ते 10:00 या दरम्यान स्वयंसेवकांनी लोकरंजनाचे व लोकप्रबोधनाचे कार्य केले. यात स्वयंसेवकांनी अंधश्रद्धेवर नाटिका सादर करून लोकांचे अंधश्रद्धेवर प्रबोधन केले.

सोमवार दि. 15 फेब्रुवारी 2016

दिनांक 15 फेब्रुवारी 2016 रोजी सोमवारी शिबीराच्या चौथ्या दिवशी स्वयंसेवकांनी सकाळी 5:30 ते 6:00 या दरम्यान प्राथविधी व जागरण केले. तसेच 6:00 ते 6:15 या दरम्यान प्रार्थना, राज्यघटना, व तुकारामाचे अभंग वाचन केले. सकाळी 6:15 ते 7:00 या दरम्यान प्रभात फेरी काढुन पथनाटयाद्वारे लोकांचे प्रबोधन केले. सकाळी 7:00 ते 7:30 दरम्यान आरोग्याचे समृध्दता राखण्यासाठी योगासने केली. यानंतर 7:30 ते 8:00 दरम्यान स्वयंसेवकांनी चाहा व नास्ता केला.

श्रमदान :—

सकाळी 8:00 ते 11:00 या दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदानातून वृक्षारोपणासाठी 40 खड्डे खोदले. तसेच रस्त्याची स्वच्छता करून रस्ता सुंदर केला. चारगांव व मोरवा येथे नाली सफाई केली. कंपोस्ट खताच्या टाक्याच्या बांधकामासाठीचे 8 फुट 4फुट चे 4 खड्डे (चार फूट खोल) असे तयार केले.

बौद्धिक सत्र :—

दुपारी 2:00 ते 3:00 या दरम्यान बौद्धिक उपक्रमा द्वारे '**समाज माध्यमांचा भडिमार आणि आजचा युवक**' या विषयावर मा. नरेन गेडाम, निरीक्षक आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालय चंद्रपुर यांनी मार्गदर्शन केले.

सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमः—

दुपारी 3:00 ते 6:00 या दरम्यान **'उद्योजकता मार्गदर्शन शिबीर'** संपन्न झाले. यात मार्गदर्शक विनायकराव धोटे संचालक वनीता उद्योग समुह चंद्रपुर यांनी उद्योग कसा उभारावा यावर मार्गदर्शन केले. या शिबीराचे उद्घाटक म्हणून मा. प्रविण शंकर, महाव्यवस्थापक, धारीवाल इंन्फ्रा. प्रा. लि. चंद्रपूर हे उपस्थित होते

लोकजागरः—

सायंकाळी 7:00 ते 8:00 या कालावधीत **'पर्यावरण व मानव'** या विषयावर मार्गदर्शक मा. प्रा. वाय. वाय. दुधपचारे जनता महाविद्यालय चंद्रपुर यांनी मार्गदर्शन केले. यात त्यांनी पर्यावरणीय समस्या व त्यावर उपाय व यात मानवाची भूमिका स्पष्ट केली.

लोकरंजनातून लोकप्रबोधनः—

रात्री 8:00 ते 10:00 या कालावधीतून लोकरंजनातून लोकप्रबोधनाद्वारे स्वयंसेवकांनी नृत्य स्त्रियांच्या समस्या व आजचा युवक यावर नाटय सादर करून लोकांचे प्रबोधन केले.

मंगळवार दि. 16 फेब्रुवारी 2016

दिनांक 16 फेब्रुवारी 2016 रोज मंगळवार शिबीराचा पाचवा दिवस या दिवसी सकाळी 5:30 ते 6:00 या दरम्यान स्वयंसेवकांनी प्रातंविधी व जागरण, सकाळी 6:00 ते 6:15 या दरम्यान प्रार्थना, राज्यघटना व तुकारामाचे अभंग वाचन करून राष्ट्रीय सेवा योजनेचे नारे देवून लोकांचे प्रबोधन केले. सकाळी 7:00 ते 7:30 दरम्यान सम्रृध्द आरोग्यासाठी योगासने केली व 7:30 ते 8:00 दरम्यान स्वयंसेवकांनी चहा व नास्ता केला.

श्रमदानः—

सकाळी 8:00 ते 11:00 दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदानातून चारगाव येथील भूमिगत बंधाऱ्याचे काम केले. यात अंदाजे 20 फूट लांब व 4 फुट रूंद, 2 फुट खोल दोन भूमिगत बंधारे बांधण्यात आले. वृक्षारोपणासाठी 45 खड्डे तयार करण्यात आले. व संपूर्ण 105 खड्डयांमध्ये खत भरण्यात आले.

बौद्धिक सत्रः—

दुपारी 2:00 ते 3:00 वाजता बौध्दिक उपक्रमाद्वारे **'व्यसनमुक्ती एक आव्हान'** या विषयावर डॉ. सी.जी. विजयकुमार, क.का.सं. वि.रामटेक यांनी मार्गदर्शन केले यातून त्यानी व्यसनाचे विविध प्रकार व दुष्पपरिणाम सांगीतले तसेच यापासून तरूणांनी कसे दूर राहावे याचे उपाय देखील सांगितले.

सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमः—

दुपारी 3:00 ते 6:00 या कालावधीत सामाजीक उत्तरदायित्व उपक्रमाद्वारे **'आरोग्य तपासणी शिबिराचे'** आयोजन करण्यात आले. उद्घाटक म्हणुन डॉ. संजय घाटे प्रसिध्द सिव्हील सर्जन हे उपस्थित होते. या शिबीरात डॉ. चेतन खुटेमाटे, प्रसिध्द नेत्र रोग तज्ञ चंद्रपुर मा. डॉ. सचिन भेदे प्रसिध्द मेंदु व मानसिक रोग तज्ञ चंद्रपुर मा. डॉ. विनोद माहुरकर प्रसिध्द चर्मरोग तज्ञ चंद्रपूर मा. डॉ. सुशील बलकी, जनरल फिजीशियन, चंद्रपुर, मा. डॉ. प्रमोद भोयन, बालरोग तज्ञ, चंद्रपुर उपस्थित होते. या शिबीरात डोळयाचे आजार, त्वचेचे आजार, छोटया मुलांचे आजार, बी.पी मधुमेह, मेंदूचे आजार,पोटाचे व किडनीचे आजार इ. आजारांची तपासणी केली. यात 350 रूग्णांची तपासणी करण्यात आली.

लोकजागरः—

सायंकाळी 7:00 ते 8:00 वाजता '**पाणी व घनकचरा व्यवस्थापन**' या विषयावर मा. संजय वैद्य, नगर सेवक म.न.पा. चंद्रपूर यांनी या विषयाचे महत्व पटवून देवून लोकांना जागृत केले.

लोकरंजनातून लोकप्रबोधनः—

रात्री 8:00 ते 10:00 या दरम्यान स्वयंसेवकांनी नृत्य कला,नाटिका व गीते सादर करून लोकांचे प्रबोधन केले.

बुधवार दि. 17 फेब्रुवारी 2016

दिनांक 17 फेब्रुवारी 2016 रोजी बुधवारला शिबीराचा सहावा दिवस या दिवशी स्वयंसेवकांनी सकाळी 5:30 ते 6:00 प्रातविधी व जागरण केले सकाळी 6:00 ते 6:15 वाजता प्रार्थना, राज्यघटना व तुकारामाचे अभंग वाचन केले 6:15 ते 7:00 दरम्यान प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरी राष्ट्रीय सेवा योजनेचे नारे लावून लोकांना शिबीराकडे आकर्षित करण्यात आले. 7:00 ते 7:30 दरम्यान योगासने करण्यात आली 7:30 ते 8:00 या दरम्यान स्वयंसेवकांना चाय व नास्ता देण्यात आला.

श्रमदानः—

सकाळी 8:00 ते 11:00 या दरम्यान श्रमदानातून 105 वृक्षांची रस्त्याच्या दुतर्फा लागवड करण्यात आली. कम्पोस्ट खतासाठी करण्यात येणाऱ्या सिमेंट व विटांच्या टाकीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. तसेच जि. प. उच्च प्राथमिक शाळेच्या आवारातील फुलझाडांच्या कॅरी मध्ये खते व माती भरण्यात आली.

सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमः—

दुपारी 2:00 ते 3:00 वाजता सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमाद्वारे '**रक्तदान व रक्तगट तपासणी**' शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यात मार्गदर्शक व सहभाग म्हणून जिल्हा सामान्य रूग्णालय चंद्रपूर येथील चमू उपस्थित होते. यात एकूण 35 गावकरी व शिबीरार्थ्यांनी रक्तदान केले.

समारोप समारंभः—

सायंकाळी 5:00 वाजता शिबीराच्या समारोपीय कार्यक्रमास सुरूवात झाली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. सी.जी. विजयकुमार, संचालक, विद्यापीठ नियोजन व विकास मंडळ, क.का.सं. विद्यापीठ रामटेक, नागपुर, विशेष अतिथी डॉ. हरेकृष्ण अगस्ती, समन्वयक, रा.से.यो, क.का.सं.वि.रामटेक हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणुन मा. शिवाजीराव ढुमणे, सचिव रा.जि.ब.शि.प्र.मं. मोरवा सरपंच नानाजी थेरे, उपसरपंच शंकर खांडारकर, मा. सुरेखाताई पाटील, जि.प. सदस्य चंद्रपूर, मा. दिनेश चोखारे माजी बांधकाम सभापती जि.प. चंद्रपुर मा. प्रा. डॉ. एन.एस. गिरडे जिल्हा समन्वय रा.से.यो. चंद्रपूर मा. नरेद्र डोर्लीकर पोलीस पाटील मोरवा प्रा. भैसारे सर इत्यादी उपस्थित होते. शिबीराचे अहवाल वाचन प्रा. मनोज ढोलणे यांनी केले त्यावेळी शिबीरात सहभागी स्वयंसेवकांनी आपले अनुभव कथन केले व गावाचे प्रतिनिधी म्हणून शंकर खांडाळकर उपसरपंच मोरवा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला गावातील नागरिक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

शिबिरातील विशेष स्मरणीय नोंदी

वृक्षारोपणः—

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने जि. प. उच्च प्राथमिक शाळा, मोरवा च्या पटांगणात तसेच मोरवा ते चारगांव या रस्त्याच्या दोन्ही बाजूने शोभेच्या 105 पॉम वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच यातील 36 वृक्षांना ग्रामपंचायतीच्या सहकार्याने लोखंडी ट्री —गार्ड व उर्वरीत 59 वृक्षांना श्रमदानातून बांबूचे ट्री—गार्ड तयार करून लावण्यात आले.

कंपोस्ट खताचे खड्डे निर्मितीः—

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने जि. प. उच्च प्राथमिक शाळा, मोरवाच्या पटांगणात गावातील घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने कचऱ्यातून कंपोस्ट खत निर्मितीसाठी खड्डे खोदून त्यावर बांधकाम करण्यात आले. यात ओला व सुखा कचरा यापासून कंपोस्ट खत तयार करण्यासाठी 8 फूट x 4 फूट आकाराचे 4 फूट खोल असे सिमेंट विटांचे पक्के बांधकाम असलेले चार कंपोस्ट बेड तयार करण्यात आले.

उत्स्फूर्त लोकसहभागः—

या शिबीरासाठी गावातील नागरिक व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त रीत्या प्रतिसाद दिला. कामासाठी आवश्यक साहित्य, श्रमदानातील सहभाग, विविध कार्यक्रमातील उपस्थिती इत्यादी महत्वाच्या बाबी होत. त्याचप्रमाणे शिबीरार्थ्यांनी गावातील गावकऱ्याची मने जिंकली याचीच पावती म्हणून सर्व शिबीरार्थ्यांना गावातील काही कुटुबांनी स्नेह भोजनाचे निमंत्रण दिले. यामध्ये महादेव सखाराम पिदुरकर, शामकांत थेरे, महादेव नागोबा पिदुरकर यांनी शिबीर स्थळी भोजन दिले. तसेच मा. वरभे साहेब, तलाठी व माणीकराव थेरे यांनी नास्ता दिला. हा अनुभव लोक सहभागाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व वेगळा होता.

समारोपः—

सत्र 2016 मध्ये आयोजित वरील विद्यापीठस्तरीय विशोष वार्ष्किक शिबीरा दरम्यान अनेक महत्वपूर्ण नोंद घेण्यासारख्या घटना व अनुभव आले. विशेष म्हणजे वरील शिबीर संपूर्णपणे स्वंयसेवक व स्वंयसेविका यांच्या नियोजनातून व उत्कृष्ठ व्यवस्थापनातून यशस्वीरित्या संपन्न झाले. या शिबीरातील बौद्धिक, सामाजिक उत्तरदायित्व व लोकजागर या वैशिष्ट्यपुर्ण उपक्रमातुन गावकऱ्यांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला. महिला मेळावा, शेतकरी मेळावा, उद्योजकता शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, कंपोस्ट खत निर्मिती करीता बेड निर्मीती, भूमिगत बंधारे निर्मिती, गावातील कुटुंबासोबत स्नेह भोजन इत्यादी अविस्मरीणीय बाबी आहेत.

शिबीराला भेट देणाऱ्या अनेक मान्यवरांनी विशेषता मा. डॉ. सी. जी. विजयकुमार, मा. डॉ. हरेकृष्ण अगस्ती, डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, माजी आमदार वामनरावजी चटप, व आमच्या संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी केलेले शिबीराचे कौतुक उत्साहवर्धक होते. या शिबीराच्या यशस्वीतेकरीता सर्व शिबीरार्थी व गावकरी यांचे योगदान आहे. तरी यामध्ये मा. भगवती पिदुरकर, उपसरपंच शंकरजी खांडाळकर, डॉ. दिनकर मराठे, प्रा. अनुप सायरे, प्रा. मनोज ढोलणे, प्रा. सुनिल खरवडे, प्रा. विष्णू बोरकर, प्रा. सारीका मेश्राम, प्रा. चंदनखेडे मॅडम, प्रा. संदेश वनकर, प्रा. लक्ष्मण खंडागळे, मा. नानाजी पाटील थेरे, सरपंच मोरवा ग्रामपंचायत, साहील येलेट्टीवार, कु. मृणाल खोब्रागडे, प्रणय चुदरी, मोहित बाचिकवार, नितीन धगडी यांचे विशेष योगदान आहे.

हे शिबीर आयोजित करण्याची परवानगी देवून शिबीराच्या यशस्वीतेकरीता मार्गदर्शन केल्याबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरु तसेच विद्यापीठातील सर्व अधिकारी, महाविद्यालय आणि त्याची संस्था, शिबिर प्रमुख डॉ. दिलीप चौधरी आणि त्यांची चमू व छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाच्या प्राचार्या सर्व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांचे मनःपूर्वक आभार.

हस्तलिखित स्रोत केंद्र

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे राष्ट्रीय पाण्डुलिपी मिशन नवी दिल्ली, यांचे मान्यताप्राप्त हस्तलिखित स्रोत केंद्र, वर्ष 2004 पासून कार्यरत आहे. विदर्भ व मराठवाडा या भागातील हस्तलिखितांच्या माहिती संग्रहणाचे काम व हस्तलिखितांची उपलब्धता व त्यांच्या बद्दलची समाजात जागृती निर्माण करण्याचे काम हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक व्दारा करण्यात येत आहे.

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेंक व राष्ट्रीय पांडुलिपी मिशन, नवी दिल्ली यांच्या नावे दि. 28.09.2015 रोजी कराराचे नवीनीकरण करण्यात आले तसेच रु. 4.5 लाख निधी सद्य केन्द्राला प्राप्त झाला आहे.

हस्तलिखितांची माहिती संग्रहण व संग्रहित माहिती राष्ट्रीय पांडुलिपी मिशन नवी दिल्ली यांना पाठवावयाची जबाबदारी हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक ची आहे. तसेच हस्तलिखितांची सूची तयार करणे, माहिती संग्रहित करणे, हस्तलिखितांबद्दलची समाजात जागृती निर्माण करणे इ. सद्यस्थितीत हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक येथे 1 समन्वयक व 2 सर्व्हेअर कार्यरत आहेत.

समन्वयकः

डॉ. मधुसूदन पेन्ना – नोव्हेंबर 2004 ते नोव्हेंबर 2006

डॉ. विजयकुमार– डिसेंबर 2006 ते नोव्हेंबर 2007

डॉ. हर्षिदा दवे – डिसेंबर 2007 ते जानेवारी 2009

डॉ. दीपक कापडे – फेब्रुवारी 2009 ते मार्च 2013

डॉ. प्रसाद गोखले – मार्च 2013 पासून अद्याप पर्यन्त कार्यरत आहे.

जागृती अभियानः

व्याख्यानमाला –

हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक व्दारा व्दारा समाजात हस्तलिखितांची जागृती निर्माण व्हावी या दृष्टीकोणातून वर्ष 2015–16 साली हस्तलिखितांचे महत्त्व, लेखन कलेचा इतिहास, प्राचीन भारतातील लेखन सामुग्री, ब्राह्मी व खरोष्ठी लिपिंचा परिचय, तसेच ग्रंथ व मोडी लिपींचा परिचय, हस्तलिखितांचे संरक्षण व संवर्धनाचे उपाय, लिपिशास्त्राचा परिचय, सांस्कृतिक महत्त्व, सचित्र हस्तलिखित या विषयांवर व्याख्यान घेण्यात आले.

डॉ. नन्दा पुरी, नागपूर, डॉ. मधुसूदन पेन्ना, नागपूर, डॉ. विजयकुमार, नागपूर, डॉ. गोपीकृष्णन् रघु, कोलकत्ता, प्रा. पराग जोशी, नागपूर, डॉ. जयवंत चौधरी, नागपूर अश्या तज्ञ व्यक्तिंनी व्याख्यान दिली.

कार्यशाळा –

हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक व्दारा वर्ष 2015–16 साली लिपि कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ग्रन्थ, ब्राह्मी, खरोष्ठी, मोडी लिपींचा समावेश होता.

मॅन्युस्क्रिप्ट दिवस –

समाजात हस्तलिखितांबद्दची जागृती निर्माण व्हावी या दृष्टिकोणातून च हस्तलिखितांची जोपासना करणे ही काळाची गरज या उद्देशाने हा दिवस महत्त्वाचा ठरला.

हस्तलिखित पाठयक्रम –

हस्तलिखितांबद्दलचे ज्ञान व संशोधन व्हावे या दृष्टिकोणातून हस्तलिखितशास्त्रात पदविका अभ्यासक्रम पण वर्ष 2015–16 साली चालविण्यात आला होता. या अभ्यासक्रमाला सुध्दा विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद होता.

❖❖❖❖❖❖

इंद्रधनुष्य – 2015

इंद्रधनुष्य 2015 या 13 वा राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ युवामहोत्सव 2015 कार्यक्रमाचे दि. 22.01.2016 ते 26.01. 2016 या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये आपल्या विश्वविद्यालयाच्या चमूने विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. सदर महोत्सवात विविध कला प्रकारामध्ये एकूर्ण 28 विद्यार्थी आणि 02 प्राध्यापकाचा समावेश होता.

या महोत्सवामध्ये उद्घाटन समारंभामध्ये कार्यक्रमाचे उद्घाटक मा. डॉ. नरेंद्र जाधव अर्थतज्ञ माजी सदस्य राष्ट्रीय योजना आयोग, भारत सरकार प्रमुख उपस्थिती डॉ. वासुदेवराव गाडे कुलगुरु पूणे विद्यापीठ पूणे, डॉ. मोहन खेडकर कुलगुरु संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ.उमा वैद्य, कुलगुरु कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक, अध्यक्ष डॉ. सिध्दार्थविनायक काणे कुलगुरु, मा.डॉ. प्रमोद येवले, प्र. कुलगुरु, मा. डॉ. पुरणचंद्र मेश्राम कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर हे होते. तसेच सदर कार्यक्रमात मा. कुलपती महाराष्ट्र राज्य हयांनी नामनिर्देषीत वित्तीय व्यवस्थापन समितीचे समन्वयक निरीक्षण समितीचे मान्यवर उपस्थित होते.

उपरोक्त युवा महोत्सवात विविध कला व सांस्कृतिक प्रकारा मध्ये खालील प्रमाणे विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

1) नृत्य – पारंपारीक नृत्य

2) साहित्यिक कला प्रकार– अ) प्रश्पमंजुषा ब) वक्तृत्व क) वादविवाद

3)रंगमंच कलाप्रकार – थियेट्र अ) वन एक्ट प्ले ब) स्क्रीप्ट क) माईम

4) फाईन आर्ट– अ) on the spot painting आ) चिकटकला (Collage) इ)पोस्टर मेकिंग (poster making) ई) माती कला (Clay Modeling) उ) व्यंगचित्र (Cartooning) ऊ)रांगोळी (Rangoli) (ए) स्थळ छायाचित्रण (Spot photography) हया मध्ये विश्वविद्यालयाला ललित कला अंतर्गत खालील विद्यार्थ्यांना पारीतोषिक प्राप्त झाले.

1) कु. श्रुती सहस्त्रबुध्दे – द्वितीय क्र. –स्पॉट पेटिंग

2) श्री. प्रतिक मुप्परवार– तृतिय क्र.–माती कला (क्ले मॉडेलिंग)

3) कु. साक्षी आर्या– तृतीय– रांगोळी

सदर युवा महोत्सवात विविध कला व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. दि. 26 जानेवारी 2016 रोजी युवा महोत्सवाचा समारोप सकाळी ध्वजारोहण, परेड सांस्कृतिक कार्यक्रम व रॅली द्वारे सुरु करुन बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला व हया कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्रसिध्द सिने अभिनेता म्हणून मा. विवेक ओबेरॉय, विशेष अतिथी, डॉ सॅमसंग नवी दिल्ली डॉ काणे कुलगुरु, डॉ. प्रमोद येवले प्र. कुलगुरु मा. पुरणचंद्र मेश्राम कुलसचिव डॉ. निहाल शेख संचालक छात्र कल्याण व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

इंद्रधनुष्याचे संघ व्यवस्थापक डॉ. जयवंत चौधरी यांचे सहकार्य लाभले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य, कुलसचिव मा. डॉ. अरविंद जोशी व तसेच वित्त व लेखा अधिकारी मा. डॉ. रामचंद्र जोशी यांचे सहकार्य लाभले व अशा प्रकारे युवा महोत्सव यशस्वीरित्या पार पडले.

शारीरिक शिक्षण विभाग

महाराष्ट्र आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव–2015, दि.26.11.2015 ते 01.12.2015 या कालावधीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित करण्यात आले होते. सदर क्रीडा महोत्सवात विद्ववविद्यालयामार्फत 14 विद्यार्थ्यांची चमू आणि संचालक क्रीडा, डॉ. हृषिकेश दलाई ,संघ व्यवस्थापक डॉ. अमोल मांडेकर व संघ प्रशिषक श्री. सुनिल खरवडे यांच्या नेतृत्वात सहभागी झाली. यामध्ये 1) छत्रवीर राजे संभाजी प्रशासकीय महाविद्यालय, मोरवा. 2) प्रशासकीय महाविद्यालय महाल, नागपूर. 3) रवीकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय,रामटेक.च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या सर्व संलग्नित महाविद्यालयातील सहभागी खेळाडूंनी कबड्डी, विविध मैदानी स्पर्धेत उत्सफूर्तपणे सहभाग घेतला.

❖❖❖❖❖❖

करिअर ॲड कौन्सिलिंग कक्ष

विश्वविद्यालयाच्या Career & Counselling Cell द्वारा तीन दिवसीय Career Advancement कार्यशाळा जानेवारी 20–22, 2016 या कालावधीत आयोजित करण्यात आली. प्रस्तुत कार्यशाळेत पुढील विषयांवर चर्चा करण्यात आली.

1. Empowerment of Inner Power – डॉ. यासिन शेख, संचालक, रायसोनी ॲकेडमी फॉर एक्सलन्स, नागपूर. जानेवारी 20, 2016
2. Resume डॉ. यासिन शेख जानेवारी 21, 2016

गटचर्चा (Group Discussion) डॉ. पद्मनाभ व–हाडपांडे, रायसोनी ॲकेडेमी फॉर एक्सलन्स, नागपूर. जानेवारी 22, 2016

❖❖❖❖❖❖

क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे।

प्राचीन भारतीय पर्यावरण विद्या अभ्यासक्रम

विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या कल्पना व मार्गदर्शनातून शैक्षणिक वर्ष 2015 –16 मध्ये आधुनिक व प्राचीन विज्ञानाची सांगड घालण्याकरिता एक नवीन पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. ' प्राचीन भारतीय पर्यावरण विद्या' नावाने सुरू झालेल्या या पदविका अभ्यासक्रमाचे उद्घाटन विश्वविद्यालयाच्या स्थापना दिनी करण्यात आले. 18 सप्टेंबर 2015 रोजी क.का.सं.वि. च्या रामटेक मुख्यालयात विश्वविद्यालय स्थापना दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने ' प्राचीन भारतीय पर्यावरण विद्या' या पदविका अभ्यासक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी डॉ. सतीष वटे यांच्या हस्ते आधुनिक तंत्रज्ञानसाधनाने करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य उपस्थित होत्या. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांची विशेष उपस्थिती होती.

उद्घाटनापूर्वी या अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती अभ्यासक्रमाचे समन्वयक प्रा.पराग जोशी यांनी दिली. मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या संकल्पना, मार्गदर्शन व प्रेरणेतून हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या पहिल्याच वर्षी पक्षितज्ज्ञ आणि प्रख्यात साहित्यिक मारुती चितमपल्ली, पक्षीसंशोधक डॉ. अनिल पिंपळापुरे, निवृत्त वनविभाग अधिकारी सुरेन्द्र बाली, कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. समित बाली, मुंबईचे डॉ. चंद्रशेखर वैद्य यांच्यासारख्या विविध विषयातील जाणकारांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्याचे सांगितले.एकूण 19 विद्यार्थ्यांनी यात प्रवेशश घेतला.

प्रमुख अतिथी डॉ. सतीश वटे यांनी प्राचीन भारतातील पर्यावरण विचार आधुनिक विचारांशी कशाप्रकारे संलग्न आहेत, हे दाखवून देणारा अभ्यासक्रम सुरू केल्याबद्दल आनंद व्यक्त करून विद्यापीठाचे व मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. या अभ्यासक्रमासाठी कोणतीही मदत लागल्यास ती नीरीतर्फे केली जाईल, असे आश्वासन दिले. संस्कृत विद्यापीठाने हा अभ्यासक्रम सुरू केल्याने प्राचीन काळातील पर्यावरणविषयक संधोधनांचे आधुनिक काळातील पर्यावरण विज्ञानाशी असलेले नाते उलगडण्यास अधिक मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, हा अभ्यासक्रम आम्ही आधुनिक काळाला अनुसरून समाजापर्यंत पोहोचण्याच्या उददेशाने तयार केला आहे. संस्कृत भाषा ही धर्मातीत असल्याने त्यातील पर्यावरणविषयक विचारही धर्मातीत आहेत.आणि हेच नेमके नव्या पिढीपर्यंत पोहोचावे या हेतूने प्राचीन परंतु वैज्ञानिक आयाम असणारा हा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

या पदविका अभ्यासक्रमाचा पहिला वर्ग मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी स्वतः घेतला. व्यस्त कार्यभारातून अध्यापनाकरिता वेळ देणा–या कुलगुरूंच्या प्रभावी व्याख्यानाने प्रवेशित सर्व विद्यार्थी ज्ञानप्राप्तीने तृप्त झाले. व विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादाचा विचार करत मा. कुलगुरूंनी या अभ्यासक्रमातील एक प्रश्नपत्र शिकविण्याचे आश्वासन देऊन ते यशस्वीरित्या पूर्ण केले. या अभ्यासक्रमाकरिता अनेक विद्वान मंडळींचे सहकार्य लाभले.

अ.क्र	व्याख्यात्यांचे नाव	विषय
1	डॉ. उमा वैद्य	कृषिपाराशर, पर्यावरण व्याख्या इ.
2	डॉ. नंदा पुरी	मेघदूत व रघुवंश
3	डॉ. मधुसूदन पेन्ना	उपनिषद् व पर्यावरण
4	डॉ. लीना रस्तोगी	पुराणातील पर्यावरणविचार
5	डॉ.विभा क्षीरसागर	अग्नि व वायु सूक्त
6	डॉ.वीणा गानू	नासदीय व वरुण सूक्त
7	डॉ.दिनकर मराठे	वृक्षायुर्वेद
8	प्रा. पराग जोशी	संस्कृत
9	डॉ.जयवंत चौधरी	संस्कृत
10	डॉ.रेणुका बोकारे	ऋतुसंहार व कादंबरी

या अभ्यासक्रमाकरिता महाराष्ट्र शासनाद्वारे गठित अग्रवाल समितीच्या शिफारशीनुसार नवीन परीक्षा पद्धतीचे अवलंबन करण्यात आले. या अभ्यासक्रमाची परीक्षा 'टेक होम परीक्षा' पद्धतीने घेण्यात आली ज्याचा लाभ अभ्यासक्रमातील ज्येष्ठ व वयोवृद्ध विद्यार्थ्यांना झाला. सप्टेंबर 2015 ते मार्च 2016 पर्यंत प्रत्येक शनिवारी व रविवारी अभ्यासक्रमाचे वर्ग चालले. प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी विविध तज्ज्ञांच्या व्याख्यानांचा लाभ घेऊन यशस्वीरीत्या अभ्यासक्रम पूर्ण केला.

❖❖❖❖❖❖

डिजिटल इंडिया कार्यक्रम

दि.01.07.2015 पासून मा. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते Digital India Week कार्यक्रमाची सुरूवात झाली त्यानंतर केंद्रशासन आणि राज्यशासनाच्या धोरणानुसार सर्व विश्वविद्यालये आणि संलग्नित महाविद्यालयांनी हा कार्यक्रम राबवावा अशा सूचना प्राप्त झाल्या. त्यानुसार विश्वविद्यालय स्तरावर खालील सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली.

1) प्रा. अनघा आंबेकर	समन्वयक
2) श्री. राजीवरंजन मिश्रा	सहसमन्वयक
3) डॉ.हृषिकेश दलाई	सदस्य
4) डॉ. दिनकर मराठे	सदस्य
5) डॉ. राजेंद्र जैन	सदस्य
6) डॉ. जयवंत चौधरी	सदस्य
7) डॉ. जयश्री भगत	सदस्य
8)श्री. योगेश चौधरी	सदस्य

सर्व सदस्यांच्या समन्वयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे असे मा. कुलगुरूंशी झालेल्या चर्चेत ठरले. त्याप्रमाणे दि.15. 08.2015 रोजी रामटेक मुख्यालयी Digital India Week कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ तसेच डॉ. श्याम सोमाणी तसेच डॉ. सुनील गणात्रा यांचे उद्बोधन सत्र सर्व प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचा–यांसाठी मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. कुलसचिव, मा. परीक्षा नियंत्रक, मा. संचालक विद्यापीठ नियोजन व विकास मंडळ सर्व अधिष्ठाते यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला.

त्यानंतर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन पुढील कार्यक्रमांचे आयोजन केले त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांमधून Nodal Officer ची नियुक्ती करण्यात आली. तसेच आयोजित कार्यक्रमाच्या सहकार्यासाठी महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात आले. त्याप्रमाणे वादविवाद स्पर्धा, पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धा, निबंध स्पर्धा, शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचेसाठी कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात आले.

त्यापैकी वादविवाद स्पर्धा छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय, मोरवा, जि. चंद्रपूर येथे दि. 19.12.2015 रोजी आयोजित करण्यात आली. स्पर्धेसाठी ' डिजिटल इंडिया काळाची गरज आहे/नाही. हा विषय ठरविण्यात आला होता. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके अनुक्रमे 1) कु. कोयल नवले 2) इम्रान खान 3) कु. यशश्री कुळकर्णी व शुभम डांगे यांना प्रदान करण्यात आली.सदर संपूर्ण कार्यक्रमांच्या आयोजनात सर्वच समिती सदस्यांचे सहकार्य लाभले.

❖❖❖❖❖❖

Internal Quality Assurance Cell (IQAC)

विश्वविद्यालयामध्ये IQAC कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष 2015—16 मध्ये IQAC द्वारा पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

1. 'आविष्कार' स्पर्धा उदबोधन कार्यक्रमः ऑगस्ट 08, 2015

राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ संशोधन परिषद ''आविष्कार'' या स्पर्धेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. विद्यार्थी आणि शिक्षकांना त्यांची सर्जनशीलता व उच्च विचारसरणीचा आविष्कार करण्याची ही एक संधी आहे. विद्यार्थी व शिक्षक यांच्यात जाणीव जागरुकता निर्माण व्हावी आणि त्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून आविष्कार स्पर्धा उद्‌बोधन कार्यक्रमाचे ऑगस्ट 31, 2015 रोजी आयोजन करण्यात आले. डॉ. इंदुमती भारंबे व डॉ. शिवराम भट यांनी आविष्कार— मूलभूत संकल्पना, ध्येये व उद्दिष्टे, पात्रता नियम, नियमांचे उल्लंघन इत्यादीबाबत मार्गदर्शन केले.

2. आविष्कार 2015— विषय निवड कार्यशाळाः सप्टेंबर 29, 2015

विद्यार्थ्यांना आविष्कार 2015 मध्ये सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी सप्टेंबर 29, 2016 रोजी अविष्कार 2015— विषय निवड कायशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत डॉ. इंदुमती भारंबे, डॉ. शिवराम भटट व प्रा. पराग जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

3 पोस्टर मेकिंग मार्गदर्शन कार्यक्रमः डिसेंबर.15, 2015

दि.15.12.2015 रोजी प्रा. पराग जोशी यांनी आविष्कार स्पर्धेसाठी पोस्टर कसे तयार करावे याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. इंदुमती भारंबे यांनी संशोधन सारांश कसा तयार करावा या विषयी मार्गदर्शन केले.

4 पोस्टर सादरीकरण मार्गदर्शनः डिसेंबर 27, 2015

दि.27.12.2015 रोजी डॉ. इंदुमती भारंबे यांनी आविष्कार स्पर्धेत पोस्टर सादरीकरण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.

5 संशोधन संस्कृती प्रोत्साहन व्याख्यानमाला : फेब्रुवारी 27—मार्च. 04, 2016

फेब्रुवारी 27— मार्च 04, 2016 या कालावधीत संशोधन संस्कृती प्रोत्साहन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात खालील विषयांवर व्याख्याने झाली —

1. संशोधकाचे गुणविशेष : फेब्रुवरी 27, 2016 — डॉ. स्नेहा देशपांडे, नागपूर.
2. संशोधन दृष्टिकोन : फेब्रुवरी 29, 2016 — डॉ. मेधा कानेटकर, नागपूर.
3. संशोधन नवप्रवाह : मार्च 01, 2016— डॉ. आशिष लिंगे, नागपूर.
4. आर्थिक साहय्य — वित्तीय संस्था : मार्च 02, 2016— डॉ इंदुमती भारंबे.
5. संशोधन नीतीः मार्च 03, 2016— डॉ. नंदा पुरी.
6. संशोधनाचे नवप्रारूप : मार्च 04, 2016— डॉ. मधुसूदन पेन्ना.

❖❖❖❖❖❖

संक्रमणोत्सव – 2016

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा सांस्कृतिक कार्यक्रम – 2016 दरवर्षी प्रमाणे यंदाही दि. 13,14,19 जानेवारी रोजी टिळक सभागृह बजाजनगर, नागपूर येथे संपन्न झाला. समापन कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी समाजसेविका मा. सौ. कांचन नितीन गडकरी होत्या तसेच अध्यक्ष स्थानी विश्वविद्यालयाच्या, कुलगुरु मा. डॉ. उमा वैद्य, कुलसचिव मा. डॉ. अरविंद जोशी, अधिष्ठाता डॉ. नंदा पूरी, संचालक छात्र कल्याण तसेच हया कार्यक्रमाच्या समन्वयीका प्रा. राजश्री मेश्राम व सर्व संकायाचे विद्यार्थी प्रतिनिधी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात डॉ. नंदा पुरी यांच्या प्रास्ताविकेने झाले व विद्यार्थी प्रतिनिधीने मनोगत प्रस्तुत केले. त्यानंतर कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात पदव्युत्तर संस्कृत विभाग, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग तसेच कालिदास विद्यापीठाचे अध्यापक महाविद्यालय यांच्या हस्तलिखितांचे अनुक्रमे ' धिषणा, मौक्तिक व तेजस्विनावधित्तमस्तु 'चे प्रकाशन करण्यात आले. तद्नंतर प्रमुख अतिथी मा. सौ. कांचन नितीन गडकरी यांनी मार्गदर्शन केले. संक्रमणोत्सवा दरम्यान आयोजित विविध स्पर्धा तसेच एन.एन.एस द्वारे आयोजित स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. त्यानंतर मा.कुलगुरुंचे अध्यक्षीय भाषण झाले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. रेणूका करंदीकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.राजश्री मेश्राम समन्वयक संक्रमणोत्सव यांनी केले. समापन समारंभाचा शेवट वंदेमातरम् ने झाला.

त्यानंतर योगाचे उत्कृष्ट प्रयोग सादर करण्यात आले व नंतर मिमिक्री(नकला),नृत्य, नाटक, गायन, फॅशन शो असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या मध्ये सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणाचे प्रदर्शन केले.

हया कार्यक्रमात मा. कुलगुरु डॉ. उमा वैद्य, मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, मा. परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, मा. वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी, मा. संचालक बी. पी. डी. डॉ. विजयकुमार, सर्व विभागाचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, आणि डॉ. प्रसाद गोखले, सहसमन्वयक, विद्यार्थी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. अशा प्रकारे सर्वांच्या सहकार्याने संक्रमणोत्सव 2016 यशस्वीरित्या पार पडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १२५ वी जयंती वर्ष २०१५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ जयंती वर्षानिमित्त सर्वशासकीय विभागांनी कार्यक्रम आराखडा तयार करुन, कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे व अनुपालन अहवाल पाठवण्याचे निर्देश शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे (पत्र क्र. उशिसं/२०१५/परिपत्रक/प्रशा-३/१३५, दि.५/१/२०१६) द्वारे विश्वविद्यालयास प्राप्त होते. त्या अनुरुप विश्वविद्यालयाने गठित समितीच्या माध्यमाने विश्वविद्यालयात कार्यक्रम आराखडा तयार करून खालील कार्यक्रमाचे आयोजन केले.

१) विद्यार्थी शैक्षणिक सहल-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भेटी दिलेल्या व त्यांचा संबंध आलेल्या ऐतिहासिक दीक्षाभूमी (नागपूर) ठिकाणी विद्यापीठ विभागीय तथा संचलित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणिक सहलीचे आयोजन केले. दि.०९/०३/२०१६ रोजी सकाळी १०:३० वाजता विद्यापीठातील ३५ विद्यार्थ्यांनी विद्यापीठपरिसरातून पावनभूमी दीक्षाभूमी कडे प्रस्थान केले. सहलीचे आयोजक प्रा.जयवंत चौधरी व सह प्रा.राजेंद्र जैन, डॉ.दिपक मेश्राम, डॉ.राजश्री मेश्राम इ. विद्यार्थ्यांसोबत होते. डॉ.दिपक मेश्राम यांनी दीक्षाभूमी परिसराची सविस्तर माहिती व महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. दीक्षाभूमीत असलेल्या मुख्य स्तूपाचे व चित्र प्रदर्शनाचे सांगोपांग वर्णन केले. तेथील चित्रप्रदर्शनीत डॉ.बाबासाहेबांविषयक प्रेरक माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्याने विद्यार्थी गद्‌गद झाले होते. परिसरातच अल्पोपहार घेऊन परस्पर विचार विनिमय करत विद्यार्थी व प्राध्यापक वृन्द दुपारी २:३० वाजता विद्यापीठ परिसरात पोहचले.

२) १८ तास सलग अभ्यास अभियान-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्या-व्यासंगतेचा परिचय विद्यार्थ्यांशी होवो व ते देखील विद्या-व्यासंग व्हावेत या हेतुने विश्वविद्यालयातील ग्रंथालय परिसरात दि.११/०३/२०१६ रोजी सकाळी ७:०० वाजता पासून रात्री १:०० वाजेपर्यंत सलग १८ तास अभ्यास अभियानाचे आयोजन केले. सदर अभियानात ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. डॉ.बाबासाहेबां संबधित ग्रन्थालयात उपलब्ध साहित्याचे समग्र अध्ययन विद्यार्थ्यांनी केले. सदर कार्यक्रमाचे आयोजक प्रा.जयवंत चौधरी, डॉ.दिपक कापडे तसेच डॉ.राजेन्द्र जैन यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

३) निबंधस्पर्धा -

विश्वविद्यालयातील सर्व पदव्युत्तर विभाग व संचलित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १८ तास अभ्यास अभियानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयक बरेचशे अध्ययन केले होते. त्या केलेल्या अध्ययनास लेखनीने व्यक्त करण्याच्या हेतुने विश्वविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन केले. स्पर्धेचा विषय "डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राज्यघटना" हा होता. वेगवेगळ्या विभागातून दि.१५/३/२०१६ पर्यंत निबंध मागविण्यात आले. आलेल्या दहा निबंधांपैकी परीक्षकांच्या वतीने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर असलेल्यांना क्रमशः रु.५००/-,रु.३००/- व रु.२००/- एवढी रक्कम व प्रमाणपत्रे मुख्य-समारोहात दि.१४/०४/२०१६ रोजी देण्यात आली. निबंधांचे परीक्षण मा.अधिष्ठाता डॉ.नंदा पुरी, समितीअध्यक्षा डॉ.राजश्री मेश्राम तथा समिती सचिव डॉ.राजेंद्र जैन यांनी केले होते. निबंध स्पर्धेचे आयोजन प्रा.डॉ.राजेंद्र जैन यांनी केले.

४) ग्रंथ व छायाचित्र प्रदर्शनी–

कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे दि.१८ व १९मार्च २०१६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संबंधित ग्रंथ व छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली तसेच त्यांना आधारुन लिहिण्यात आलेल्या दुर्मिळ ग्रंथांचा, तसेच छायाचित्रांचा समावेश करण्यात आला होता. सदर ग्रंथ व छायाचित्र प्रदर्शनीचे उद्‌घाटन विद्यापीठाचे मा.परीक्षानियंत्रक डॉ.उमेश शिवहरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी संकायप्रमुख,डॉ.मधुसुदन पेन्ना, प्रा.इंदुमती भारंबे, डॉ.कृष्णकुमार पाण्डे, डॉ.कविता होले तसेच विश्वविद्यालयाचे इतर अधिकारी, प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. प्रदर्शनीत ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. दिपक कापडे, डॉ.रोशन अलोने व श्री रितेश मेश्राम यांनी केले. प्रदर्शनीला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांनी व मान्यवरांनी त्यांचे अभिप्राय अभिप्रायपुस्तिकेत नोंदविले.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर १२५वा जयंती दिवस समारोह –

दि.१४/४/२०१६ रोजी सकाळी ११:०० पासून हा कार्यक्रम टिळक सभागृह, बजाजनगर नागपूर येथे घेण्यात आला. वर्षभरात झालेल्या उपर्युक्त विविध कार्यक्रमांचा समारोप या कार्यक्रमाने झाला. कार्यक्रमाचा आरंभ दीपप्रज्वलन व विद्यापीठ गीताने झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा.कुलगुरु डॉ.उमा वैद्य, प्रमुखातिथी डॉ.सुभाषजी लोहे व विशेषातिथी, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी संस्थेचे सचिव श्री सुनिल पाटील हे उपस्थित होते. विश्वविद्यालयाचे कुलसचिव डॉ.अरविंद जोशी यांची कार्यक्रमात विशेष उपस्थिती होती. वर्षभरात झालेल्या कार्यक्रमांचे प्रास्ताविक बी.पी.डी निर्देशक, डॉ.सी.जी.विजयकुमार यांनी केले. प्रमुखातिथी, डॉ.सुभाषजी लोहे यांनी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर व एक संघ समाजनिर्मिती" या विषयावर उद्‌बोधन केले. मा. कुलगुरु व मान्यवरांच्या वतीने १८ तास सलग अभ्यास कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग–प्रमाणपत्रे व ठराविक रोख रक्कम, तसेच निबंधस्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकप्राप्त विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व ठराविक रोख रक्कम देण्यात आली. अध्यक्षीय भाषणाने मा. कुलगुरु यांनी उपस्थितांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजोपयोगी विचारांशी अवगत केले. ग्रंथालयप्रमुख डॉ.दिपक कापडे यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभारव्यक्त केले. डॉ.राजश्री मेश्राम यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे समापन केले.

❖❖❖❖❖❖

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

प्रकरण तिसरे

प्रशासकीय अहवाल

आस्थापना विभाग

महाराष्ट्र शासनाद्वारे अधिनियम क्र. 33–1997 अन्वये प्रस्तुत विश्वविद्यालयाची स्थापना दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी झाली. शासनाने प्रस्तुत विश्वविद्यालयातील पाच शैक्षणिक विभागांकरिता एकूण 35 शिक्षकीय पदे आकृतीबंधानुसार मंजूर केली आहेत. त्याचप्रमाणे 114 शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

शासनमान्य शिक्षकेतर पदे

एकूण मंजूर पदे					एकूण भरलेली पदे					एकूण रिक्त पदे				
अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण	अ	ब	क	ड	एकूण
22	10	50	32	**114**	15	06	36	27	**84**	07	04	14	05	**30**

शासनमान्य शिक्षकीय पदे

एकूण मंजूर पदे	एकूण भरलेली पदे	एकूण रिक्त पदे
35	**20**	**15**

अहवाल वर्षात पदोन्नती देण्यात आलेल्या पदांचा तपशील

विश्वविद्यालयाच्या आस्थापनेवर मंजूर पदांपैकी पदोन्नतीच्या रिक्त पदांवर पदोन्नतीची कार्यवाही विभागीय पदोन्नती समितीद्वारे पूर्ण करण्यात आली. त्यानुसार खालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर पदोन्नती देण्यात आली.

अ.क्र.	नाव
1	सौ. कल्याणी कि. देशकर
2	श्री. संतोष कि. वाडीकर
3	श्री. प्रविणकुमार सु. सरोदे
4	सौ. प्रिती चं. लाडसे(अहिरकर)
5	श्री. सुनिल ल. बावने
6	श्री. दिपक चं. जोंधळे

अहवाल वर्षात CAS अंतर्गत पदोन्नतीची कार्यवाही करण्यात आली त्याचा तपशील

विश्वविद्यालयाच्या आस्थापनेवर मंजूर शिक्षक पदांवर कार्यरत शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगानुसार अनुज्ञेय असलेली CAS अंतर्गत पदोन्नती देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीची सभा दि. 27 जानेवारी 2016 रोजी संपन्न झाली. खालील शिक्षकांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर पदोन्नती देण्याची शिफारस समितीने केली.

अ.क्र.	नाव	पदनाम
1	डॉ. नंदा ज. पुरी	प्राध्यापक
2	डॉ. मधुसूदन न. पेन्ना	प्राध्यापक
3	डॉ. सी. जी. विजयकुमार	प्राध्यापक
4	डॉ. ललिता प्र. चंद्रात्रे	प्राध्यापक
5	डॉ. कृष्णकुमार सु. पाण्डेय	प्राध्यापक
6	डॉ. कविता सु. होले	सहयोगी प्राध्यापक
7	डॉ. पराग भा. जोशी	सहायक प्राध्यापक (वरिष्ठ श्रेणी)

सेवाज्येष्ठता यादी

कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी प्रतिवर्ष प्रसिध्द करावी असे शासनाचे धोरण असून त्यानुसार प्रस्तुत विश्वविद्यालयाने 2015 ची अद्ययावत सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.

सेवार्थ प्रणालीद्वारे वेतन प्रक्रिया

कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीद्वारे माहे डिसेंबर 2015 पासून करावे असे शासनाचे धोरण असून त्यानुसार प्रस्तुत विश्वविद्यालयाने माहे डिसेंबर 2015 चे वेतन सेवार्थ प्रणालीद्वारे प्रदान केले. ही प्रक्रिया करण्यासाठी आस्थापना विभागाने अथक परिश्रम घेतले.

कर्मचारी हिताचे निर्णय

1) विश्वविद्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांना पदव्युत्तर संस्कृत भाषा व साहित्य विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करता यावा याकरिता व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांकरिता सप्तांत वर्ग (Weekend Batch) सूरू करण्यात आले. 12 कर्मचाऱ्यांनी सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून 06 कर्मचाऱ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

2) विश्वविद्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांना बॅंकेतून कर्ज घेता यावे यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच बॅंक ऑफ महाराष्ट्र सॅलरी गेन स्किम लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

व्यवस्थापन परिषदेच्या सभा

विश्वविद्यालयाच्या व्यवास्थापन परिषदेच्या एकूण 08 सभा संपन्न झाल्या आहेत. 04 नियमित सभा आणि 04 आकस्मिक सभा संपन्न झाल्या आहेत.

विक्रियायै न कल्पन्ते संबन्धाः सदनुष्ठिताः

''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार'' 2014 आणि 2015
–:: अहवाल ::–

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा वैद्य आयुर्वेद प्रतिष्ठान, आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार'' प्रतिवर्ष प्रदान केला जातो. पुरस्कारासोबत रोख रु. 50,000/– पारितोषिक, मानपत्र, देऊन सन्मान केला जातो. ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे.

यासाठी सर्व संस्कृत विद्यापीठे/विद्यापीठे/प्रतिष्ठित संस्कृत संस्था यांचे कडून विश्वविद्यालयातर्फे प्रस्तुत पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येतात. त्यासाठी वर्तमानपत्रात निवेदन देण्यात येते.प्राप्त प्रस्ताव कार्यकारी सभेपुढे सादर करण्यात येतात. कार्यकारी सभा प्राप्त प्रस्तावांचे मूल्यांकन करण्यासाठी 3–5 तज्ञ परीक्षक नियुक्त करते. तज्ञांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर ते पुन्हा कार्यकारी समितीपुढे पुरस्कर्त्याची निवड करण्यासाठी सादर करण्यात येतात. कार्यकारी समिती पुरस्कर्त्याचे नाव निश्चित करते. हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या कालिदास महोत्सवात प्रदान करण्यात येतो.

दि. 17.3.2015 रोजीच्या कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार सन 2014 साठीचा पुरस्कार डॉ के. ई. देवनाथन, तिरुपति यांना आणि दि.29.10.2015 रोजीच्या कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार 2015 साठी चा पुरस्कार डॉ मिथिलाप्रसाद त्रिपाठी, यांना प्रदान करण्याचे निश्चित झाले.

'' कालिदास महोत्सव 2015'' हा समारोह 20 नोव्हेंबर 2015 ते 23 नोव्हेंबर 2015 या कालावधीत आयोजित करण्याचे शासनाने निश्चित केले. त्यामुळे कार्यकारी समिती/विश्वविद्यालयाव्दारे दि. 20 नोव्हेंबर 2015 रोजी रामटेक येथे समारोहाच्या उद्घाटन कार्यक्रमात सदर दोन्ही पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे सुचारु नियोजनाकरिता एक कार्यक्रम समिती गठित करण्यात आली होती. कार्यक्रम समितीचे अध्यक्ष मा. डॉ. अरविंद जोशी, कुलसचिव हे होते, प्रा. पराग जोशी, डॉ. दिनकर मराठे, डॉ प्रसाद गोखले हे सदस्य होते तसेच सचिव श्री. श्रीपाद अभ्यंकर होते. समितीची सभादि. 16.11.2015 रोजी संपन्न झाली कार्यक्रमाचे नियोजन, आवश्यक सुविधा व व्यवस्था आणि संभाव्य खर्च याबाबत विचार–विनिमय करण्यात आला व त्यानुसार कार्यक्रमाची रुपरेषा आखण्यात आली.

उद्घाटन कार्यक्रमात मंचावर मा.ना. चंद्रशेखर बावनकुळे मंत्री तथा पालकमंत्री नागपूर, मा. महेश एलकुचवार, मा. मल्लिकार्जुन रेड्डी, आमदार , रामटेक, श्री मधुकर किंमतकर, माजी मंत्री, श्री. आनंदराव देशमुख माजी आमदार, ॲड. आशिष जयस्वाल, माजी आमदार, श्री अनुपकुमार, विभागीय आयुक्त, डॉ सिद्धार्थ काणे, कुलगुरु, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ श्री. सचिन कुर्वे, जिल्हाधिकारी, श्री राम जोशी उपविभागीय अधिकारी, रामटेक आणि रामटेक येथील स्थानिक मान्यवर उपस्थित होते. कार्यकारी समितीचे डॉ. रमेश शर्मा, प्रतिनिधी, पं. रामनारायण शर्मा वैद्य आयुर्वेद ट्रस्ट,हे कार्यक्रमात उपस्थित होते. दीपप्रज्वलनाउपरांत मान्यवरांचे स्वागतानंतर मा. कुलगुरु महोदयांनी पुरस्काराची माहिती आणि कालिदास महोत्सवात या पुरस्काराचे औचित्य विशद केली. पुरस्कर्त्यांचा परिचय डॉ. नंदा पुरी यांनी करुन दिला प्रमुख अतिथी मा. डॉ. महेश एलकुंचवार यांनी पुरस्कर्त्यांना पुरस्कारराशीचा बटवा सुपूर्द केला आणि मा कुलगुरु महोदयांनी पुरस्कर्त्यांना मानपत्र प्रदान केले. मंचव्यवस्थेसाठी डॉ. पुरी यांना डॉ. कविता होले कार्यक्रम समिती सदस्य आणि विश्वविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

कार्यरत शिक्षक कर्मचारी

अक्र.	नाव	पदनाम
1	डॉ. इंदुमती टि. भारंबे	प्राध्यापक
2	डॉ. नंदा ज. पुरी	सहयोगी प्राध्यापक
3	डॉ. मधुसूदन न. पेन्ना	सहयोगी प्राध्यापक
4	डॉ. सी. जी. विजयकुमार	सहयोगी प्राध्यापक
5	डॉ. ललिता प्र. चंद्रात्रे	सहयोगी प्राध्यापक
6	डॉ. कृष्णकुमार सु. पाण्डेय	सहयोगी प्राध्यापक
7	डॉ. किर्ती भ. सदार	सहयोगी प्राध्यापक
8	डॉ. कविता सु. होले	सहयोगी प्राध्यापक
9	डॉ. हरेकृष्ण शा. अगस्ती	सहायक प्राध्यापक
10	डॉ. कलापिनी ह. अगस्ती	सहायक प्राध्यापक
11	डॉ. दिनकर वि. मराठे	सहायक प्राध्यापक
12	डॉ. प्रसाद श्री. गोखले	सहायक प्राध्यापक
13	डॉ. हृषिकेश स. दलाई	सहायक प्राध्यापक
14	डॉ. अमोल म. मांडेकर	सहायक प्राध्यापक
15	डॉ. राजश्री पू. मेश्राम	सहायक प्राध्यापक
16	सौ. अनघा अ. आंबेकर	सहायक प्राध्यापक
17	डॉ. शिवराम रा. भट्ट	सहायक प्राध्यापक
18	प्रा. पराग भा. जोशी	सहायक प्राध्यापक
19	डॉ. जयवंत ज. चौधरी	सहायक प्राध्यापक
20	डॉ. राजेंद्र चि. जैन	सहायक प्राध्यापक

कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी

अ.क्र.	नाव
1	डॉ. अरविंद द. जोशी
2	डॉ. उमेश ध. शिवहरे
3	डॉ. रामचंद्र ज. जोशी
4	श्रीमती स्मिता म. फडणवीस
5	डॉ. दिपक को. मेश्राम
6	श्री. प्रकाश रू. जैस्वाल
7	डॉ. दिपक ग. कापडे
8	श्री. कैलाश वि. मून
9	डॉ. रोशन भा. अलोने
10	श्री. सुमित म. कठाळे
11	श्री. विजयेंद्र वि. पांडे
12	श्री. राजेंद्र धा. मेश्राम
13	सौ. कल्याणी कि. देशकर
14	श्री. संतोष कि. वाडीकर
15	श्री. श्रीपाद म. अभ्यंकर
16	श्री. संजय प्र. वाते
17	सौ. माधुरी र. येवले
18	श्री. अतुल ज. गाडे

29	श्री. अविनाश ज्ञा. फुसाटे	वरिष्ठ लिपिक
30	श्री. सौरभ र. बाजपेई	वरिष्ठ लिपिक
31	सौ. जान्हवी सु. देऊळगांवकर	वरिष्ठ लिपिक
32	श्री. अरविंद ता. कुचनकर	वरिष्ठ लिपिक
33	श्री. धर्मेश अ. शुक्ला	वरिष्ठ लिपिक
34	श्री. उमेश रा. पाटील	वरिष्ठ लिपिक
35	श्री. अतुल न. खोडे	वरिष्ठ लिपिक
36	श्री. योगेश बा. चौधरी	वरिष्ठ लिपिक
37	श्री. कृणाल नं. कविश्वर	वरिष्ठ लिपिक
38	श्री. धर्मेंद्र वि. भिडे	वरिष्ठ लिपिक
39	श्री. निलेश गो. राठोड	वरिष्ठ लिपिक
40	कु. प्रगती ज. ढेपे	ग्रंथालय सहायक
41	कु. मिनाक्षी डो. मेश्राम	ग्रंथालय सहायक
42	श्री. विनोद वि. बागडे	कनिष्ठ लिपिक
43	श्री. नेमीचंद ता. मेश्राम	कनिष्ठ लिपिक
44	कु. मीना व्यं. पुजारी	कनिष्ठ लिपिक
45	श्री. अनिल र. तिवारी	कनिष्ठ लिपिक
46	श्री. महेश अ. येयेवार	कनिष्ठ लिपिक
47	श्री. अरविंद ह. राठोड	कनिष्ठ लिपिक
48	श्री. नंदकिशोर धा. मेश्राम	कनिष्ठ लिपिक
49	श्री. चेतन वा. पेलने	कनिष्ठ लिपिक
50	सौ. नंदिनी म. बंड	कनिष्ठ लिपिक
51	श्री. मंगेश कृ. आटे	कनिष्ठ लिपिक
52	श्री. प्रविणकुमार सु. सरोदे	कनिष्ठ लिपिक
53	सौ. प्रिती चं. लाडसे(अहिरकर)	कनिष्ठ लिपिक
54	श्री. जावेद र. तुरक	वाहन चालक
55	श्री. मुकेश ध. शहारे	ग्रंथालय परिचर
56	श्री. पुरूषोत्तम प्र. कावळे	ग्रंथालय परिचर
57	श्री. सुभाष वा. गोतमारे	दप्तरी

58	श्री. सुनिल ल. बावने	दप्तरी
59	श्री. दिपक चं. जोंधळे	दप्तरी
60	श्री. पुरूषोत्तम प्र. वझे	तारमार्गतंत्री व तारतंत्री
61	श्री. सुशिल पां. वैद्य	चक्रमुद्रक
62	श्री. अजित मो. पांडे	शिपाई
63	श्री. रूपेश टि. मेश्राम	शिपाई
64	श्री. शैलेश शं. गेडाम	शिपाई
65	श्री. दिलीप ना. राऊत	शिपाई
66	श्री. राजेश रा. दारोडे	शिपाई
67	श्री. ललित रा. धुर्वे	शिपाई
68	श्री. शामसूंदर सा. डोबळे	शिपाई
69	श्री. अविनाश नि. भैसारे	शिपाई
70	श्री. जितेंद्र दे. सुर्यवंशी	शिपाई
71	श्री. पंकज र. पेठकर	शिपाई
72	श्री. तात्याराव रा. वाघमारे	शिपाई
73	श्री. हनुमंत अं. सिडाम	शिपाई
74	कु. छाया शं. मसारकर	शिपाई
75	कु. प्रणाली अ. ठाकरे	शिपाई
76	सौ. मंजुषा प्र. कुकडे	शिपाई
77	कु. सुरेखा वा. तिजारे	शिपाई
78	श्री. रोशन पु. कुनघाटकर	शिपाई
79	सौ. नलिनी सं. इंगळे	शिपाई
80	श्री. ज्ञानेश्वर रा. साबळे	शिपाई
81	श्री. अशोक तु. हटवार	पहारेकरी
82	श्री. आकाश के. मडावी	पहारेकरी
83	श्री. अमित पां. वैद्य	माळी

❖❖❖❖❖❖

विद्या विभाग

(1) अध्ययन मंडळ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 33 (2) तरतूदीनुसार सत्र 2015–16 साठी तदर्थ अकरा अध्ययन मंडळांचे गठण करण्यात आले आहे. अध्ययन मंडळाची नावे खाली नमूद केल्यानुसार आहेत –

1. तदर्थ संस्कृत तथा संस्कृतेत्तर भाषा अभ्यास मंडळ
2. तदर्थ वेदविद्या अभ्यास मंडळ
3. तदर्थ शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ
4. तदर्थ वेदांग ज्योतिष व वास्तुशास्त्र अभ्यास मंडळ
5. तदर्थ ललितकला अभ्यास मंडळ
6. तदर्थ प्रशासकीय सेवा अभ्यास मंडळ
7. तदर्थ दर्शनशास्त्र अभ्यास मंडळ
8. तदर्थ कीर्तनशास्त्र अभ्यास मंडळ
9. तदर्थ ग्रंथालय वार्ताशास्त्र अभ्यास मंडळ
10. तदर्थ हॉस्पिटॅलिटी स्टडीज व पर्यायी चिकित्सा पद्धती अभ्यास मंडळ
11. तदर्थ मानव्यशास्त्र अभ्यास मंडळ

(2) संकाय

विश्वविद्यालयाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 31 (5) प्रमाणे पाच संकाय स्थापन करण्यात आले आहे. स्थापन करण्यात आलेल्या पाच संकायाची नावे व संकाय अधिष्ठातांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	संकायाचे नाव		अधिष्ठाताचे नाव
1.	तदर्थ वेदविद्या संकाय,	–	डॉ.सी.जी. विजयकुमार
2.	तदर्थ संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय,	–	डॉ. नंदा ज. पुरी
3.	तदर्थ भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय,	–	डॉ.मधुसूदन पेन्ना
4.	तदर्थ प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे संकाय,	–	डॉ. कृष्णकुमार पाण्डेय
5.	तदर्थ शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय,	–	डॉ.ललिता चंद्रात्रे

3) विद्वत् परिषद

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 27 (2) च्या तरतुदीनुसार विद्वत् परिषदेचे गठण करण्यात आले. सत्र 2015–16 मध्ये विद्वत् परिषदेच्या एकूण दोन सभा अनुक्रमे (1) दि. 25.06.2015 व (2) दि. 19.02.2016 रोजी संपन्न झाल्या.

अभ्यासक्रमांची यादी

अ. क्र.	अभ्यासक्रमांचे नाव	अ.क्र.	अभ्यासक्रमांचे नाव
	पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम		**पदविका अभ्यासक्रम**
1	एम. ए. (शिक्षण)	37	वास्तुशास्त्र पदविका
2	एम. ए. (संस्कृत दर्शन)	38	संस्कृत साधना पदविका
3	एम. ए. (संस्कृत साहित्या)	39	संस्कृत परिचय पदविका
4	एम. ए. (वेद)	40	संस्कृत आगम पदविका
5	एम. ए. (संस्कृत व्याकरण)	41	संस्कृत प्रवेश पदविका
6	एम. ए. (वेदांग ज्योतिष)	40	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका
7	एम. संस्कृत (वेदांत)	42	योग, निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
8	एम. ए. (योगशास्त्र)	43	योग पदविका
9	एम. ए. (कीर्तनशास्त्र)	44	जर्मन भाषा पदविका
10	एम. ए. (नृत्य)	45	वेदशास्त्र कनिष्ठ पदविका
11	एम. एड्.	46	पौरोहित्य उच्च पदविका
12	एम. एफ.ए.	47	वेदशास्त्र ज्येष्ठ पदविका
13	एम. फिल. (शिक्षण)	48	कीर्तनशास्त्र कनिष्ठ पदविका
14	एम. फिल. (संस्कृत)	49	कीर्तनशास्त्र ज्येष्ठ पदविका
15	एम. फिल. (संस्कृत दर्शन)	50	जनसंवाद आणि पत्रकारीता अभ्यासक्रम पदविका
16	एम. फिल. (संस्कृत वेदांग ज्योतिष)	51	डिप्लोमा इन थेटर ॲण्ड परफॉरमींग आर्ट
17	एम. फिल. (संस्कृत व्याकरण)	52	नृत्य उच्च पदविका
18	एम. फिल. (योगा)	53	नृत्य कनिष्ठ पदविका
19	एम. फिल. (संस्कृत वेदा)	54	नृत्य ज्येष्ठ पदविका
	पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम	55	डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेन्ट
20	वेदांग ज्योतिष पदव्युत्तर पदविका	56	नृत्य पूर्व पदवी (पदविका)
21	पी.जी.डी.सी.सी.ए.	57	डिप्लोमा इन मॅन्युस्क्रीप्टॉलॉजी ॲण्ड पॅलिओग्राफी
22	पी.जी.डिप्लोमा इन योगिक सायंसेस	58	डिप्लोमा इन क्रिएटीव्ह राइटींग
23	आग्ल भाषेतून संस्कृतचे अध्ययन	59	प्रि डिग्री डिप्लोमा इन डान्स
24	पी. जी. डिप्लोमा इन वास्तुशास्त्र	60	डिप्लोमा इन एन्शड इंडियन सायंसेस
	पदवी अभ्यासक्रम	61	डिप्लोमा इन एन्शड इंडियन एन्व्हायरमेन्टल स्टडीज.
25	बी. ए. (शिक्षण)	62	डिप्लोमा इन वैदिक मॅथेमॅटीक्स
26	बी. ए. (वेदांग ज्योतिष)	63	डिप्लोमा इन संस्कृत लर्निंग
27	बी. एड्.		**प्रमाणपत्र अभ्यासक्रम**
28	बी. ए. (संस्कृत विशारद)	64	नृत्य प्रमाणपत्र
29	बी. ए. (प्रशासकीय सेवा)	65	वैदिक मॅथेमॅटीक्स प्रमाणपत्र
30	बी. ए. (योगशास्त्र)	66	संस्कृत सेतू (बीएड् प्रवेशाकरिता संस्कृत नसणाऱ्या विद्यार्थ्या करिता)
31	बी. एफ. ए.	67	आयुर्वेद फार फॉरेन स्टुडन्टस्
32	बी एससी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज)	68	गीता प्रमाणपत्र

विश्वविद्यालयाशी संलग्न महाविद्यालयांची यादी.
(सत्र 2015—16 करिता)

अ. क.	अभ्यासक्रम सुरु असलेल्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता	सुरु असलेले अभ्यासक्रम
1	त्रिस्कंध सोसायटी, नागपूर द्वारा संचालित **त्रिस्कंध वेदांग महाविद्यालय,** द्वारा श्री मंगेश प्रकाशन, 23, नवी रामदासपेठ, नागपूर—27.	बी.ए. (वेदांग ज्योतिष) एम्.ए. (वेदांग ज्योतिष)
2	क.जे.सोमैय्या भारतीय संस्कृती पीठम्, मुंबई द्वारा संचालित **क.जे. सोमैय्या भारतीय संस्कृती पीठम्,** मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, तिसरा मजला, सोमैय्या कॅम्पस, विद्याविहार, मुंबई—77	एम्.ए. (संस्कृत) भारतीय संस्कृती आणि नीतिमूल्ये पदविका बी.ए. (योगशास्त्र) योगशास्त्र पदविका संस्कृत परिचय पदविका जर्मन भाषा पदविका एम्.ए. (योगशास्त्र)
3	ग्रामीण आरोग्य व शिक्षण विकास संस्था द्वारा संचालित, **डॉ. पंजाबराव देशमुख योगशास्त्र महाविद्यालय,** उदय कॉलनी, चांदूर बाजार, जि. अमरावती.	बी.ए. योगशास्त्र योग निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
4	दिशा बहुउद्देशीय शिक्षण, पर्यटन व पर्यावरण विकास संस्था, रामटेक द्वारा संचालित **रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय,** मौदा रोड, रामटेक, जि. नागपूर	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
5	मराठवाडा संस्कृत प्रचार सभा, श्री एकनाथ संशोधन मदिर द्वारा संचालित **श्रीनाथ वेदाभ्यास केंद्र,** खडकेश्वर, औरंगाबाद—431001	बी.ए. (संस्कृत) एम्.ए. (संस्कृत)
6	ज्योतिषशास्त्र व परामानसशास्त्र अकादमी, औरंगाबाद द्वारा संचालित **वेदांग ज्योतिष महाविद्यालय,** गुरु तेजबहादुर हायस्कूल, उस्मानपुरा, औरंगाबाद	बी.ए. (वेदांग ज्योतिष्य) वास्तुशास्त्र पदविका
7	वैदर्भीय हरिकीर्तन संस्था, नागपूर द्वारा संचालित **वैदर्भीय हरिकिर्तन महाविद्यालय,** रजत महोत्सव धरमपेठ मुलांची शाळा, धरमपेठ, नागपूर.	बी.ए. (कीर्तनशास्त्र) एम्.ए. (कीर्तनशास्त्र)
8	समर्थ इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, अचलपूर द्वारा संचालित **कीर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर शिक्षाशास्त्री बी.एड. महाविद्यालय,** परतवाडा, जि.अमरावती.	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)

9	श्री सरस्वती एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित **श्री कृष्णाजी जोशी महाविद्यालय,** श्री तिरुपती तत्रनिकेतन परिसर, केशवनगर, अकोला	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
10	दृष्टी बहुउद्देशीय शिक्षण, पर्यटन व पर्यावरण विकास संस्था, रामटेक द्वारा संचालित **दमयंतीताई देशमुख बी.एड. कॉलेज,** मौदा रोड, रामटेक	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
11	श्री समर्थ वेद विद्यालय (महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान, पुणे) द्वारा संचालित **श्री समर्थ वेद विद्यालय**, गीता भवन, मु. ढालेगाव, पो. रामपुरी, ता. पाथरी, जि.परभणी	वेदविद्या पदविका (कनिष्ठ) वेदविद्या पदविका (ज्येष्ठ)
12	शरद समग्र ग्रामीण विकास संस्था, वर्धा द्वारा संचालित **चिंतामणी वास्तुशास्त्र पदविका महाविद्यालय,** सेलु (काटे), वायगांव रोड, ता.जि.वर्धा	वास्तुशास्त्र पदविका
13	श्री सरफोजी राजे भोसले भरत नाटयम् ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, मुंबई द्वारा संचालित **भरत कॉलेज ऑफ फाईन आर्टस् ॲण्ड कल्चर,** 1 माया को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. 5 कॉलेज पथ, प्रभादेवी, मुंबई	प्रमाणपत्र (नृत्य) कनिष्ठ पदविका (नृत्य) ज्येष्ठ पदविका (नृत्य) बी.ए. (नृत्य) एम्.ए. (नृत्य) उच्च पदविका (नृत्य)
14	श्री ब्रम्हचैतन्य धार्मिक सद्विचार सेवा प्रतिष्ठान, अकोला द्वारा संचालित **श्री नाईकवाडे कीर्तन महाविद्यालय,** द्वारा प्रा. वामनराव नाईकवाडे, शास्त्रीनगर, अकोला	बी.ए. (कीर्तनशास्त्र)
15	सुरभि जनकल्याण संस्था, नागपूर द्वारा संचालित **ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिग्री कॉलेज,** नाईक रोड, महाल, नागपूर	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
16	दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित **रामकृष्ण शिक्षणशास्त्र (बी.एड्.) महाविद्यालय,** दारापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
17	महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे **शिक्षाशास्त्री महाविद्यालय,** नरगुंदकर शैक्षणिक संकुल, खामला रोड, नागपूर	बी.एड्. शिक्षाशास्त्री

18	ॲंग्लो व्हर्न्याक्युलर एज्युकेशन सोसायटी, दारव्हा जि. यवतमाळ संचालित **कै. स्व. रामरावजी दुधे अध्यापक महाविद्यालय, दारव्हा, ता.दारव्हा. जि. यवतमाळ.**	बी.एड. (शिक्षाशास्त्री)
19	मुंडले एज्युकेशन ट्रस्ट, नागपूर द्वारा संचालित **सेंट्रल इंडिया स्कूल ऑफ फाईन आर्टस्,** सहारा सिटी जवळ, वर्धा रोड, नागपूर	बी.एफ्.ए. एम्.एफ्.ए.
20	देवाजीभाऊ बुद्धे मेमोरिअल शिक्षण संस्था, गोंदिया खुर्द द्वारा संचालित **एल्.के. पदविका योगशास्त्र महाविद्यालय,** गोंदिया	योगशास्त्र पदविका
21	वैनगंगा बहुद्देशीय विकास संस्था, नागपूर द्वारा संचालित **स्वामी विवेकानंद शिक्षण व योग महाविद्यालय,** नागझिरा मार्ग, साकोली, जि. भंडारा–441 802	योगशास्त्र पदविका
22	विद्याभारती संस्था, वर्धा द्वारा संचालित **एस्.पी. भोयर कॉलेज,** बॅचलर रोड, नालवाडी, वर्धा, जि. वर्धा	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
23	विद्याभारती संस्था, वर्धा द्वारा संचालित **श्रीमती कांचनताई भोयर महाविद्यालय,** बालाजी सभागृह, राष्ट्रीय महामार्ग क्र.7, हिंगणघाट	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
24	विद्याभारती संस्था, वर्धा द्वारा संचालित **प्रियदर्शनी कॉलेज,** छत्रपती नगर, एस्.टी. लॉ कॉलेजच्या मागे, चंद्रपूर	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
25	श्री गणेश शिक्षण मंडळ, नागपूर द्वारा संचालित **नगाजी महाराज महाविद्यालय,** ग्रेट नागरोड, रेशिमबाग चौक, नागपूर–440002	योगशास्त्र पदविका

26	दि. हर्बल इंडिया डेव्हलपमेंट सोसायटी, नागपूर द्वारा संचालित **चक्रपाणी पंचकर्म योग व निसर्गोपचार महाविद्यालय,** ओंकार नगर, नागपूर–440 027	बी.ए. (योगशास्त्र) योग, निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
27	भोंडेकर सांस्कृतिक क्रीडा व सामाजिक शिक्षण विकास संस्था द्वारा संचालित **मंजूळाबाई भोंडेकर कॉलेज**, सहकार नगर, पांढराबोडी, भंडारा	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
28	योग आयुर्वेद संशोधन केन्द्र, कोल्हापूर द्वारा संचालित **स्वामी कुवलयानंद महाविद्यालय**, एस्.टी. कामगार हाऊसिंग सोसायटी हॉल, सायबर महाविद्यालयाजवळ, कोल्हापूर	संस्कृत परिचय पदविका
29	राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, मोरवा द्वारा संचालित **छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय,** शनि मंदीराजवळ, मोरवा, ता.जि. चंद्रपूर	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
30	श्री सदाशिवराव पाटील शिक्षण संस्था, कामठी द्वारा संचालित **श्री सुरेश योगशास्त्र महाविद्यालय,** न्यू कामठी रेल्वे स्टेशनजवळ, कामठी, जि. नागपूर–441 002	योगशास्त्र पदविका
31	विश्वसखा फाऊंडेशन, पुणे द्वारा संचालित **कीर्तन महाविद्यालय,** 1/8, तपोवन सोसायटी, जिजाई गार्डन जवळ, वारजे, पुणे	बी.ए. (कीर्तनशास्त्र)
32	स्व. आबासाहेब खेडकर शिक्षण संस्था द्वारा संचालित **गुरुकृपा महाविद्यालय,** "चिरंजीव", पार्वती सदनजवळ, राऊतवाडी, अकोला.	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
33	श्री. अलकनंदा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, द्वारा संचालित, (**ज्ञानदिप कॉलेज ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन**, वडधामना, ता. हिंगणा, जि. नागपूर), 10 ठवरे कॉलनी, नवीन सुभेदार ले–आऊट, पोस्ट अयोध्यानगर, नागपूर–24,	बी.ए. (प्रशासकीय सेवा)

❖❖❖❖❖❖

विद्यापीठ नियोजन विकास मंडळ

1. विद्यापीठाच्या तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. केएसयु–1101/(78/01) विशि – 2 दि. 11.09.2003 नुसार विद्यापीठाच्या नियोजन व विकास मंडळ समितीचे गठन करण्यात आलेले आहेत.

2. शैक्षणिक सत्र 2015–16 मध्ये 20 वेगवेगळया शैक्षणिक संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत.

3. नियोजन व विकास मंडळ विभागाद्वारे विद्यार्थी व शिक्षक यांच्याकरिता संस्कृत रिसर्च प्रमोशन प्रकल्प सुरू करण्यात आलेले आहे. त्यात विद्यापीठीय शिक्षकांद्वारे सादर केलेल्या प्रस्तावामधून पाच प्रस्तावांची निवड करण्यात आलेली आहे.

4. शैक्षणिक सत्र 2016–17 आणि 2017–18 करिता बृहत् आराखडा अद्ययावत् करून शासनाला पाठविण्यात आलेला आहे व त्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

5. डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारसीच्या अंतर्गत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाला विशेष ज्ञान स्रोत स्थापित करण्याकरिता निवडण्यात आलेले आहेत. केंद्र स्थापनेचे कार्य सुरू आहे.

6. डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारसीच्या अंतर्गत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाला इतर विद्यापीठ/महाविद्यालये यांच्यासोबत संयुक्त प्रमाणपत्र/पदविका/पद्व्युत्तर पदविका अभ्यासक्रम आंतरविद्याशाखीय स्तरावर राबविण्याकरिता शासनाकडून मान्यता प्राप्त झाली आहे.

******

सांख्यिकी विभाग

1) सन 2009–10 ते 2015–16 पर्यंतच्या विद्यार्थ्यांची सांख्यिकीय माहिती तयार करण्यात आली.

2) सन 2012–13 ते 2015–16 पर्यंतची संबधित सांख्यिकीय माहिती, विशवविद्यालयाने AISHE portal वर अपलोडिंगचे कार्य पूर्ण केले आहे. 100 टक्के सांख्यिकीय माहिती अपलोडिंग करणा–या मोजक्या विद्यापीठांमध्ये क.का.सं.वि. चा अतंर्भाव आहे.

3) विश्वविद्यालयाला, AISHE कडून, सन 2012–13 पासून दरवर्षी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. तसेच 2015–16 मध्ये MHRD आणि मा.संचालक, उ.शि. यांनी विश्वविद्यालयाने यामध्ये केलेले कार्य हे इतर विद्यापीठांना अनुकरणीय आणि मार्गदर्शक असल्याबाबतचे विद्यापीठाचे नोडल अधिकारी म्हणून विशेष प्रमाणपत्र दिलेले आहे.

4) सन 2015–16 मध्ये एमआयएस चे अपलोडींग 100 टक्के पूर्ण झाले आहे.

❖❖❖❖❖❖

वित्त विभाग

वित्त विभागाची माहिती खालीलप्रमाणे –

सन 2015–16 पर्यंत विश्वविद्यालयाचे अंतर्गत अंकेक्षण पूर्ण झालेले आहे. आणि याची प्रत आगामी अधिवेशनात सादर करण्यात येणार आहे. यासाठी माहे जून – 2016 मध्ये पूर्वमान्यतेस्तव शासनाकडे मसूदा प्रत अग्रेषित करण्यात आलेली आहे. शासनाकडून याबाबत आदेश प्राप्त होताच सन 2015–16 चे वार्षिक लेखे स्वतंत्रपणे प्रकाशित करुन विधी मंडळाच्या कामकाजात समाविष्ट करण्यासाठी पटलावर ठेवण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. विश्वविद्यालयाचे वेतन अनुदान मूल्य निर्धारणाचे कार्य संचालक, उच्च शिक्षण, पूणे यांच्याकडून सन 2012 पर्यंत पूर्ण केले आहे. याचा अहवाल विश्वविद्यालयास प्राप्त आहे. महालेखाकार कार्यालयाने दि.03 ते 19 ऑक्टोबर 2013 यादरम्यान सन 2005–06 ते 2009–10 या कालावधीचे अंकेक्षण पूर्ण केले असून याचा अहवाल विश्वविद्यालयास प्राप्त झाला आहे. महालेखाकार कार्यालयाने पुर्वी केलेल्या अंकेक्षणातील बहुतांश परिच्छेद वगळण्यात आले असून यासाठीची योग्य ती प्रक्रिया विश्वविद्यालयाने पूर्ण केलेली आहे. उर्वरित परिच्छेद वगळण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

प्रस्तुत विश्वविद्यालयाच्या सहाव्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना प्रदान करावयाचे पदके तयार करण्याकरिता नियमानुसार निविदा प्रक्रिया करुन न्युनतम दर असलेल्या प्रतिष्ठानाकडून चांदी खरेदी करण्यात आली असून यासाठी रक्कम रु.66,913/– चा खर्च करण्यात आला असून दि.20.02.2016 रोजी आयोजित दीक्षांत समारंभात सन 2012–13 व सन 2013–14 मधील एकूण 16 गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रु.21,750/– चे रोख पारितोषिके देण्यात आली आहेत.

		आय सन 2014–15 प्रत्यक्ष	व्यय सन 2014–15 प्रत्यक्ष	आय सन 2015–16 प्रत्यक्ष सुरु मार्च –15 पर्यंत
ग – 1	अ) साधारण निधी	23375967	7907423	11549981
	ब) वेतन अनुदान	51897706	50155769	35434624
ग – 2	विकास कार्यक्रम	25775000	2310901	420000
ग – 3	निधी	206200	625629	126531
	एकूण रक्कम रु	101254873	60999722	47531136

❖❖❖❖❖❖

सा लक्ष्मीः उपकुरुते यया परेषाम्

(1)

प्रकल्पाचे नाव : अतिथीगृह इमारत बांधकाम
बांधकामाचे क्षेत्रफळ : 412.00 स्के. मि.
प्राथमिक अंदाज : रू. 49.64 लक्ष
सुधारित अंदाज : रू. 73.13 लक्ष
अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 49.64 लक्ष
अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : .....
कार्यवाही : ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाद्वारे काम पूर्ण करण्यात आले.
सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. 49.64 लक्ष
सद्यःस्थिती : इमारतीची उपयोजिता सुरू करण्यात आली आहे.
अतिरिक्त खर्च रू. 23.49 लक्ष शासनाकडून प्राप्त करण्यासाठी शासनाकडे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. अद्याप मान्यता अप्राप्त.

(2)

प्रकल्पाचे नाव : रिक्रीऐशन सेंटर इमारत बांधकाम
बांधकामाचे क्षेत्रफळ : 515.47 स्के. मि.
प्राथमिक अंदाज : रू. 88.796 लक्ष
सुधारित अंदाज : रू. 122.90 लक्ष
अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 122.90 लक्ष
अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : .....
कार्यवाही : शासनाकडून तीन टप्प्यात प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे खालीलप्रमाणे जमा केला आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/दिनांक
रू. 63,71,000.00/वर्ष 2008–09	रू. 63,71,000.00/दि. 26.03.2009
रू. 25,08,600.00/वर्ष 2009–10	रू. 25,08,600.00/दि. 23.03.2010
रू. 34,11,000.00 / वर्ष 2012–13	रू. 30,50,366.00 /दि.31.05.2013

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. 119.30 लक्ष
सद्यःस्थिती : इमारतीचेबांधकाम सा. बां. विभागाकडून सुरू असून अंतिम टप्प्यात आहे.

(3)

प्रकल्पाचे नाव : ॲकडमिक रिसर्च सेंटर इमारत बांधकाम
बांधकामाचे क्षेत्रफळ : 2943.27 स्के. मि.
प्राथमिक अंदाज : रू. 513.66 लक्ष
अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 3,39,44,400/–
कार्यवाही : प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे जमा केली आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/ पावती दिनांक

रू. 44,91,400.00 /वर्ष 2009–10	रू. 44,91,400.00 /दि. 20.03.2010
रू. 23,33,000.00 /वर्ष 2010–11	रू. 23,33,000.00 /दि. 23.12.2010
रू. 12,50,000.00 /वर्ष 2010–11	रू. 12,50,000.00 /दि. 23.12.2010
रू. 10,00,000.00 /वर्ष 2010–11	रू. 10,00,000.00/ दि. 23.09.2011
रू. 6,80,000.00 / वर्ष 2014–15	रू. 6,80,000.00 /दि. 08.04.2015
रू. 4,20,000.00/ वर्ष 2015–16	रू. 4,20,000.00 / दि.13.01.2016
रू. 2,00,00,000.00 वर्ष 2015–16	रू. 2,00,00,000.00 दि. 29.03.2016
रू. 37,70,000.00 वर्ष 2015–16	रू. 37,70,000.00 दि. 11.05.2016
सा. बां. विभागाकडे जमा रक्कम	: रू. 3,39,44,400/–
सद्यःस्थिती	: सा. बां. विभागाने सदर इमारत बांधकामाची निविदा प्रकिया करून कामाचे देण्याची कार्यवाही सुरू आहे विश्वविद्यालयाने शासनाकडे उर्वरित रक्कमेच्या मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे.

(4)

प्रकल्पाचे नाव	: युजीसी वन टाईम कॅच अप ग्रॅट योजने अंतर्गत विकास कामे 1) ॲकडमिक स्कुल इमारत बांधकाम 2) परिसर विकास कामे
बांधकामाचे क्षेत्रफळ	: 4813.60 स्के. मि.
प्राथमिक अंदाज	: रू. 10.00 कोटी शासन वाटा रू. 5.00 कोटी युजीसी वाटा रू. 5.00 कोटी
अहवाल वर्षापर्यत प्राप्त अनुदान	: रू. 2.50 कोटी (युजीसी कडुन प्राप्त) : रू. 5.00 कोटी (महाराष्ट्र शासनाकडुन प्राप्त)
कार्यवाही	: ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे प्राप्त रक्कम जमा करण्यात आली.
प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा
रक्कम/ दिनांक	युजीसी कडून प्राप्त
	रू. 2.50 कोटी/वर्ष 2011–12 रू. 2.50 कोटी/ दि. 21.03.12
शासनकडून प्राप्त	रू. 2.50 कोटी/वर्ष 2012–13 रू. 2.50 कोटी/दि.05.09.12
शासनकडून प्राप्त	रू. 2.50 कोटी/वर्ष 2015–16 रू. 96,50,000.00/ दि. 11.05.2016 रू. 1,53,50,000.00 /दि. 11.05.2016
सा. बां. विभागाकडे जमा रक्कम	: रू. 7.50 कोटी
सद्यःस्थिती	: ॲकेडमिक स्कुल्स इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

(5)

प्रकल्पाचे नाव	: युजीसी च्या 12 व्या प्लान अंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधकाम
बांधकामाचे क्षेत्रफळ	: 1426.64 स्के. मि.
प्राथमिक अंदाज	: रू. 2.68 कोटी
अहवाल वर्षापर्यत प्राप्त अनुदान	: .....
सद्यःस्थिती	: इमारतीचा आराखडा व अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही सा. बां. विभागात सुरू आहे. युजीसीच्या 12 व्या प्लान अंतर्गत एकुण मान्यता प्राप्त निधी रक्कम रू. 7.00 कोटी पैकी सदर इमारत बांधकामासाठी आवश्यक निधी युजीसी निधीमधून आवंटीत करावयाचा आहे.

(6)

प्रकल्पाचे नाव	: छडम्ब्ज्प्रकल्प
प्रकल्प किंमत	: रू. 2.05 कोटी भारत संचार निगम लि. चा वाटा रू. 20.00 लक्ष केंद्र सरकार चा वाटा रू. 135.00 लक्ष राज्य शासनाचा वाटा रू. 50.00 लक्ष
अहवाल वर्षापर्यतप्राप्त अनुदान	: रू. 50.00 लक्ष(महाराष्ट्र शासनाकडुन)

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : रू. 10.00 लक्ष (महाराष्ट्र शासनाकडुन)
कार्यवाही : शासनाकडुन प्राप्त अनुदान भारत संचार निगम लि. यांना अदा करण्यात आला.
सद्यःस्थिती : छडम्ब्ब्ज्प्रकल्प अंतर्गत विश्वविद्यालयास 1 ळठचै ब्वददमबजपअपजल ची सुविधा भारत संचार निगम लि. यांनी उपलब्ध करून दिलेली आहे व सदर सुविधा कार्यान्वित आहे.

(7)

प्रकल्पाचे नाव : विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या शिफारसीनुसार शासनाकडून प्राप्त निधीतून विकास कामे
प्रशासकीय मान्यता : रू. 240.95 लक्ष
अहवाल वर्षापर्यत प्राप्त अनुदान : रू. 240.95 लक्ष
कार्यवाही : ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभाग, जि.प. ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, नागपूर यांचेकडे प्राप्त रक्कम रू.240.95 लक्ष जमा करण्यात आली.
सद्यःस्थिती :1. संरक्षण भिंत बांधकाम– सा.बां. विभागाकडून सदर काम सुरू आहे.
अंदाजित खर्च :–59.25 लक्ष
2. जलव्यवस्था करणे.– जिल्हा परिषद ग्रामिण पाणी पुरवठा विभागाकडून सदर कामाची निविदा प्रकिया सुरू आहे.
अंदाजित खर्च :–49.60 लक्ष
3. अंतर्गत रस्ते बांधकाम करणे.– सा. बां. विभागाकडून सदर कामाची निविदा प्रकिया पूर्ण केली असून कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहे.
अंदाजित खर्च :–79.25 लक्ष
4. विद्युत व्यवस्था करणे.– सा. बां. (विद्युत्) विभागाकडून सदर काम सुरू आहे.
अंदाजित खर्च :–52.85 लक्ष

(अ) विश्वविद्यालयाची स्थावर मालमत्ता –

1) रामटेक, मौजा परसोडा येथे 3.92 हेक्टर जमीन विश्वविद्यालयाने दि. 02.04.1998 रोजी संपादीत केली. किंमत रू. 15,65,241/–
2) नागपूर येथे सीताबर्डी येथील नागपूर सुधार प्रन्यास संकुलमध्ये 4 था माळा 2 गाळे (क्र. 401 व 402) तसेच 5 वा व 6 वा माळा (क्र. 501 ते 510 आणि 601 ते 610) एकुण क्षेत्रफळ 834.977 स्के. मि. वर्ष 2007 –08 मध्ये संपादित केली. किंमत रू. 2,16,82,000/–
3) रामटेक परिसरातील इमारती –

1) प्रशासकीय इमारत

तळ मजला	– 564.34 स्के. मि.	खर्च रू. 45.74 लक्ष
पहिला मजला	– 561.12 स्के. मि.	खर्च रू. 56.65 लक्ष
2) अतिथीगृह इमारत बांधकाम	– 412.00 स्के. मि.	खर्च रू. 73.13 लक्ष

(ब) रामटेक येथे भूसंपादन

महाराष्ट्र शासनाने विश्वविद्यालय स्थापनेवेळी विश्वविद्यालयाकरीता मौजा परसोडा ता. रामटेक जि. नागपूर येथे एकुण 31.77 हे. आर. जागा उपलब्ध करून देण्यास वर्ष 1997मध्ये मान्यता दिली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात वर्ष 1998 मध्ये विश्वविद्यालयास उपरोक्त ठिकाणी 3.92 हे. आर. जागा उपलब्ध करून दिली. उर्वरित 27.85 हे. आर. जमिन मिळण्याबाबत विश्वविद्यालयाने शासनाकडे सतत पाठपुरावा केला आहे. सदर भूसंपादनाची बाब शासनाकडे प्रलंबित आहे.

(ड) कालाडोंगरी, नागपूर येथे भूसंपादन

महाराष्ट्र शासनाने मौजा काळडोंगरी ता. नागपूर (ग्रा.) येथील स.क्र.123 मधील आराजी 54.17 हे.आर. पैकी 50 एकर शासकीय जमीन कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाकरीता मंजूर केलेली आहे व सदर जागेचा ताबा विश्वविद्यालयाने घेतलेला आहे.

शैक्षणिक परिसर नागपूर :–

सीताबर्डी, नागपूर येथे एन. आय. टी. संकुलामध्येशैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामूळे विश्वविद्यालयाचे पाचही शैक्षणिक विभाग अहवाल वर्षातयाठिकाणी कार्यरत आहेत.

❖❖❖❖❖❖

परीक्षा विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या परीक्षा विभागातर्फे उन्हाळी आणि हिवाळी 2015 परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. हिवाळी परीक्षा मध्ये एकूण 65 परीक्षांना 2427 विद्यार्थी बसले होते. तर उन्हाळी परीक्षांमध्ये एकूण 140 परीक्षांना 3875 विद्यार्थी बसले होते. सर्व परीक्षांचे निकाल विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाच्या आत घोषित करण्यात आले. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. शैक्षणिक **सत्र 2015–16 पासून पर्यावरण विज्ञान पदविका ही परीक्षा टेक होम पध्दतीने सुरु करण्यात आली. परीक्षा घेण्यासंबंधीची पूर्वतयारी व निकाल घोषित करण्यापर्यंतची पूर्ण कार्यवाही ही ऑन लाईन पध्दतीने करण्यात येते.**

सहावा दीक्षांत समारंभ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा **सहावा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. 20 फेब्रुवारी 2016 रोजी किट्स इंजिनिअरींग कॉलेज, रामटेक** येथे संपन्न झाला. राष्ट्रीय संस्कृत संस्थानचे सन्माननीय कुलगुरू प्रोफेसर डॉ. परमेश्वर नारायण शास्त्री प्रमुख अतिथी म्हणून तर राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. संतोष पांडा विशेष अतिथी या नात्याने उपस्थित होते. विश्वविद्यालयाच्या कुलगुरू मा. डॉ. उमा वैद्य या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होत्या. उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक डॉ. अंजली रहाटगावकर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. कमल सिंग या व्यासपीठावर विशेषत्वाने उपस्थित होत्या. व्यवस्थापन परिषद्, विद्वत् परिषदेचे सदस्य, सर्व संकायांचे अधिष्ठाता आणि पदकदान–दाते याप्रसंगी विशेषत्वाने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या वेदमंत्रोच्चारणाने झाला. सरस्वतीवंदना आणि विश्वविद्यालयगीतानंतर भारतीय धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृती संकायाचे प्रमुख डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी यांनी विश्वविद्यालयाचा विकास व प्रगतीविषयक अहवाल प्रास्ताविकाद्वारे सादर केला.

कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी याप्रसंगी विविध संकायांतर्गत 359 पदव्युत्तर पदवी, 730 पदवी, 1038 पदविका, 276 प्रमाणपत्र अभ्यासक्रम व 64 पदव्युत्तर पदविका प्रदान केल्या. यानंतर मा. कुलगुरू महोदयांनी विद्यार्थ्यांना दीक्षान्त उपदेश प्रदान केला.

